कर्नाटक राज्याइतकाच प्राचीन इतिहास बेंगळूर विभागाचासुद्धा आहे. या विभागातील प्रथम राज्यकर्ते म्हणजे कुवलालपुर ही राजधानी (सध्याचे कोलार) बनविलेले गंग घराण्यातील राजे होय. त्यांचा कार्यकाल संपल्यानंतर या प्रदेशावर चोळ, होयसळ, विजयनगर, मराठा, मैसुरू वडेयर व विजयपूरचे आदिलशहा यांनी राज्य केले. विजयनगर साम्राज्यातील राजांच्या काळात अनेक पाळेगारांनी विविध भागात राज्य केले होते.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

हे पाळेगार राज्य करीत असलेल्या प्रदेशाला पाळेपट्टू म्हणून ओळखले जात असे. या पाळेगारांना नायक असे नाव होते. हे पाळेगार विजयनगर राजांचे मांडलिक होते. प्रमुख पाळेगार (पाळेपट्टु) म्हणजे केळदी, चित्रदुर्ग, यलहंका, चिक्कबळ्ळापूर इत्यादी होत.



बेंगळूरू विभागाचा जिल्हावार नकाशा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.1.2 नैसर्गिक स्त्रोत

नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या विविध बाबींना नैसर्गिक स्त्रोत असे म्हणतात. नद्या, अरण्ये, दऱ्या, धबधबे, खनिजे, जंगली प्राणी व माती इत्यादी आपल्याला मिळालेली नैसर्गिक संपत्ती आहे. या विभागात उष्णकटीबंधातील मान्सून हवामान आढळते. पण विभागातील प्रत्येक जिल्ह्यात एकाच प्रकारचे हवामान आढळत नाही. कोलार जिल्ह्यात अतीउष्ण हवामान आहे तर शिवमोग्गा (मलनाड प्रदेश), हा सर्वात जास्त पाऊस पडणारा प्रदेश आहे. पण चित्रदुर्ग हा सर्वात कमी पाऊस पडणारा जिल्हा आहे. बाकी तुमकूरु, दावणगेरे, बेंगलूरु दक्षिण (रामनगर) व चिक्कबळ्ळापूर हे साधारण पाऊस पडणारे जिल्हे आहेत.

या विभागातील अनेक नद्या पश्चिम घाटात उगम पावतात. या विभागातील प्रमुख नद्या म्हणजे उत्तर पिनाकिनी, दक्षिण पिनाकिनी, वेदावती, शिंषा, तुंगभद्रा, शरावती, वरदा इत्यादी. शरावती ही पश्चिमेकडे वाहणारी नदी आहे. यामुळे निर्माण झालेला जगप्रसिद्ध जोग धबधबा शिवमोगा जिल्ह्यात आहे. मुत्यालमडु हे जलाशय बेंगळूरू नगर जिल्ह्यात आहे. गाजनूरू (तुंगा) ही धरणे शिवमोगा जिल्ह्यात आहेत. या विभागात शेकडो प्रसिद्ध जलाशये आहेत. मैसुरु राजानी अनेक धरणे बांधली. वाणीविलास सागर धरण नावाची एक पाणीपुरवठा योजना आहे. ही चित्रदुर्ग जिल्ह्यातील हिरियूरु तालुक्यात आहे. अशाच प्रकारचा मार्कोनहळळी जलाशय तुमकुरु जिल्ह्यातील कुणीगल तालुक्यात आहे.

प्रदूषण, अरण्यनाश, अफाट शहरीकरण इत्यादी कारणामुळे आपल्या अनेक नद्या ओसाड पडत आहेत. बेंगळूरु नगर जिल्ह्यातील अनेक नद्या नाश होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक जलाशय भू-अतिक्रमणामुळे नाश पावत आहेत. यामुळे पाण्याची तीव्र कमतरता भासत आहे. जलाशय, जलस्रोत व अंतर्जल पातळी रक्षणासाठी आपण सर्वांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

या विभागात अनेक खनिजांच्या खाणी आहेत. संपूर्ण देशातील सर्वात समृद्ध सोन्याच्या खाणी कर्नाटक राज्यात असून कोलार येथील सोन्याची खाण प्रसिद्ध होती. पण तेथील सोन्याचा साठा संपलेला आहे. चित्रदुर्ग आणि तुमकूरू जिल्ह्यात लोखंडाच्या खनिजाचा साठा आहे. आणि चित्रदुर्ग येथे ताब्यांच्या खाणी आहेत.

1.1.3 अरण्ये, वन्यप्राणी, राष्ट्रीय उद्याने

बेंगळूरू विभागातील शिवमोगा जिल्ह्यात दाट अरण्ये आढळतात. बेंगळूरू नगर जिल्ह्यात अरण्यप्रदेशाचा विस्तार कमी आहे. या विभागातील जिल्ह्यामध्ये सदाहरीत अरण्यापासून ते पानझडी अरण्यापर्यंत विविध प्रकारची अरण्ये आढळतात. सहयाद्रीच्या पर्वत रांगा शिवमोगा जिल्ह्याच्या सीमाभागातून पुढे जातात. बांबू, वटवृक्ष, चिंच, चंदन, सागवान, बाभूळ, आंबा, कडूनिंब इत्यादी वृक्ष येथे वाढतात. येथील उपअरण्यातील संपत्ती अनेकांसाठी उत्पादनाचे

© DSERT NOT TO BE REPUBLISHED

साधन बनले आहे. या विभागातील सर्वात उंच पर्वत म्हणजे चित्रदुर्ग जिल्ह्यातील हालुरामेश्वर पर्वत होय. इतर प्रसिद्ध शिखरे म्हणजे कवलेदुर्ग, चंद्रगुत्ती, कोडचाद्री, नंदीदुर्ग इत्यादी.

या विभागामध्ये विविध प्रकारचे वन्यप्राणी आढळतात. रानमांजर, वाघ, चित्ते, गवीरेडे, रानडुक्कर, हरिण, अस्वल, कोल्हा इत्यादी. अरण्य रक्षणासाठी व वन्यप्राण्यांच्या पोषणासाठी अनेक अरण्यधाम, अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने यांची स्थापना करण्यात आली आहे. बेंगळूरू विभागातील प्रमुख अरण्यधाम व अभयारण्ये पुढील प्रमाणे आहेत.

जोगिमट्टी अभयारण्य - चित्रदुर्ग, बन्नेरुघट्ट राष्ट्रीय उद्यान-बेंगळूरु नगर जिल्हा, भद्रा अभयारण्य-शिवमोगा, शरावती अभयारण्य - शिवमोगा, शेट्टीहळ्ळी अभयारण्य - शिवमोगा जिल्हा, गुडवी पक्षीधाम - शिवमोगा जिल्हा, मंडगद्दे पक्षीधाम - शिवमोगा जिल्हा, कग्गलडु पक्षीधाम - तुमकुरु जिल्हा, रामदेवरबेट्ट रणहद्दु संरक्षणाधांम - बेंगलूरु दक्षिण (रामनगर), जयमंगली कृष्णमृग अभयारण्य तुमकूरु.



बन्नेरुघट्ट राष्ट्रीय अभयारण्यातील वाघ

मुलांनो तुम्हाला वाघ, अस्वल, चित्ता, हत्ती, हरिण इत्यादी प्राण्यांना अरण्य प्रदेशात पाहण्याची इच्छा आहे का? असे असल्यास आपल्या विभागातील अभयारण्यांना, पक्षीधामांना भेट द्या व अरण्यातील प्राण्यांना पाहून आनंदीत व्हा.

© KTBS NOT TO BE PUBLISHED

1.1.4 कृषी आणि उद्योगांची प्रगती

बेंगळूरू विभागातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. या विभागात कोरड्या जमिनीत जास्त शेती व्यवसाय केला जातो. पावसावर अवलंबून येथील व्यवसाय चालतो. शिवमोग्गा जिल्ह्यात खुप जलाशय आहेत. या विभागामध्ये वाळुमिश्रीत लालमातीचे प्रमाण जास्त आहे. काळी माती कांही भागामध्ये आढळून येते. या विभागातील प्रमुख पिके म्हणजे नाचणा, मका, जोंधळा, भात, वाटाणा, हरभरा, कडधान्ये इत्यादी होय. येथील प्रमुख व्यापारी पिके म्हणजे नारळ, सुपारी, कापूस, ऊस ही होय. रेशीम उत्पादनाला आवश्यक कच्चा माल तुतीची पाने बेंगळूरू ग्रामांत्तर,बेंगळूरू जिल्हा, नगर, व बेंगलूरु दक्षिण (रामनगर), कोलार चिक्कबळ्ळापुर जिल्ह्यात वाढवितात चिक्कू, पपई, फणस, संत्री, केळी इत्यादी फळांचे उत्पादन येथे घेतले जाते.

या विभागातील लोक आहारासाठी नाचणा व भात यांचा प्रामुख्याने वापर करतात. नाचणा व तांदळाच्या भाकऱ्या खातात. अलिकडच्या काळात गव्हाच्या चपाती रुढीगत करून घेतले आहेत. सणासुदीच्या काळात पायस, पोळी, गोडखिचडी, शेवया असे गोड पदार्थ काही सणांना मांसाहार सेवन करतात.

प्रत्येक जिल्हा व तालुक्यामध्ये सरकारने कृषी उत्पादन व्यापाराची केंद्रे स्थापन केली आहेत. येथे शेतकरी आपल्या कृषी उत्पादनाचा व्यापार करू शकतात. सरकारने जिल्हा व तालुका केंद्रात धान्याची कोठारे निर्माण केली आहेत. तेथे शेतकरी आपले पिक उत्पन्न कोठारात ठेवू शकतात.

उद्योगधंदे:



सर. एम. विश्वेश्वरय्या



नाल्वडी कृष्णराज वडेयर

NOT TO BE @CTBS REPUBLISHED

आपल्या विविध राजे दिवाणाच्या काळात उद्योगधंद्याची भरभराट झाली. के शेषाद्री अय्यर यांच्या दिवाणगिरी काळात शिवसमुद्र जलविद्युत्त शक्ती प्रकल्प होती घेण्यात आला त्यीमुळे के.जी.एफ. मधील सुवर्ण खाण उद्योगधंद्याना अनुकूल झाले. नंतर विश्वेश्वरय्या,मिर्झा इस्माईल यांनी आपल्या काळात अनेक उद्योग सुरु केले. विशेषकरुन सर एम् विश्वेश्वरय्या यांचे योगदान मोठे आहे. ते राज्याच्या औद्योगिक क्षेत्राचे निर्माते आहेत. सर एम. विश्वेश्वरय्या यांनी नाल्वडी वडेयर यांची धोरणे आमलात आणली. बेंगळूरु हे देशातील एक प्रमुख औद्योगिक केंद्र आहे. शिवमोग्गा जिल्ह्यातील भद्रावती येथे पोलाद व लोखंडाचे कारखाने आहेत. यांची स्थापना 1923 साली करण्यात आली आहे. त्याला आज विश्वेश्वरय्या लोखंड आणि पोलाद नियमित कारखाना असे संबोधतात. तेथे कागद कारखानासुद्धा आहे. याची स्थापना 1936 साली करण्यात आली आहे. राज्यातील प्रथम सिमेंटचा कारखाना भद्रावती येथे स्थापन करण्यात आला आहे.

बेंगळूरू हे माहिती तंत्रज्ञान व जैविक तंत्रज्ञान व्यवसायासाठी प्रसिद्ध आहे. उद्योगधंदे ही रोजगारीची मूळे आहेत. बेंगळूरु विभागात विविध ठिकाणी मोठ मोठे. उद्योगधंदे स्थापन झाले आहेत.

कापड निर्यात करण्यात कर्नाटक राज्य देशामध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. आपल्या विभागातील दोड्डबळ्ळापूर, आनेकल इत्यादी शहरांमध्ये सरकारने तयार कपड्यांची केंद्रे स्थापन केली आहेत. बेंगळूरु येथे विमान निर्मिती कारखाने, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान हे उद्योग मोठ्या प्रमाणात चालतात. काही उद्योग सार्वजनिक क्षेत्रात आहेत तर इतर उद्योग खाजगीरित्या केले जातात.

1.1.5 कला, साहित्य, लोककला, नाटक, नृत्य

प्राचीन काळापासून हा विभाग कला, साहित्य क्षेत्रात नावाजलेला आहे. बाराव्या शतकात वचन साहित्यासाठी मोठे योगदान दिलेल्या अक्कमहादेवी व

© KSTBS NOT TO BE REPUBLISHED

अल्लमप्रभू हे शिवमोग्गा जिल्ह्यातील बळळीगावेचे होत. त्याच प्रमाणे दास परंपरेशी संबंधीत श्रीपादराय इत्यादी बेंगळूरू विभागातीलच होय.



मास्ती व्यंकटेश अय्यंगार



कुवेंपू




यू. आर. अनंतमूर्ती



जी.एस. शिवरुद्रप्पा



निसार अहमद



पी. लंकेश



डी.व्ही. गुंडप्पा



अनुपमा निरंजन



एम. के. इंदिरा



ना. डीसोज



सीद्दलिंगय्या

आधुनिक काळातील राष्ट्रकवी आणि ज्ञानपीठ पुरस्कृत साहित्यिक कुवेंपू हे याच विभागातील होय. या विभागातील इतर दोन ज्ञानपीठ पुरस्कृत साहित्यिक म्हणजे: मास्ती वेंकटेश अय्यंगार व यू. आर. अनंतमूर्ती, हे होत. पी. लंकेश. डी.व्ही. गुंडप्प, निसार अहमंद, टी.पी. कैलासम्, एम. के. इंदिरा, त.रा.सु, डॉ. अनूपमा निरंजन, हा.मा. नायक, व्ही सीतारामय्या, बी. जी. एल. स्वामी, एम. व्ही. सितारामय्या, के. व्ही. सुब्बण्णा, जी. वेंकटसुब्बय्या, जी.एस. शिवरूद्रप्पा, बरगूरू रामचंद्रप्पा, डॉ. डी. आर. नागराज, डॉ. सीद्दलिंगय्या, ना. डिसोज, दोड्डुरंगेगौड, प्रतिभानंदकुमार इत्यादी कन्नड साहित्य समृद्ध करणारे साहित्यिक आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

साहित्याइतकेच नाटक क्षेत्रात या विभागाने महत्व प्राप्त केले आहे. गुब्बीवीरण्णा यांचे नाव कन्नड नाट्य इतिहासात अजरामर आहे. त्यांना नाटकरत्न, नाटक सार्वभौम अशा पदव्या दिलेल्या होत्या. ते तुमकुरु जिल्हयातील गुब्बीगावचे आहेत. कन्नड रंगभूमीच्या इतिहासात आठवण्यासारखे आणखी एक नाव सुब्बय्या नायडू हे होय. यांनी कन्नड पहिला बोलपट 'सती सुलोचना' यात नायकाची भूमिका केली. एक सभ्य विनोदी कलाकार म्हणुन नाव कमविणारे के. हिरण्णय्या आणि त्यांचा मुलगा मास्टर हिरण्णय्या यांचे नाटक क्षेत्रातील योगदान प्रशंसनीय आहे. नृत्यकलेला अपार योगदान दिलेल्या श्रीमती मायाराव या बेंगळरूच्याच होय. बेंगळूर हे आता चित्रपट सृष्टीचे प्रमुख केंद्र बनले आहे. बेंगलुरु येथील साहित्य मेळावा येथे होतो. डॉ. राजकुमार, डॉ. विष्णुवर्धन, शंकरनाग, अंबरीष हे अभिनेते चित्रपटसृष्टी क्षेत्राच्या प्रगतीला कारणीभूत झाले आहेत. लोककला साहित्य व कलेसाठी हा विभाग प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध लोककला तज्ञ असलेले साहित्यिक एच्. एल. नागेगौडा यांनी स्थापन केलेली 'जानपद लोक' ही संस्था रामनगर जिल्ह्यात आहे.



राजकुमार



विष्णूवर्धन



शंकरनाग



मायाराव



सुब्बय्या नायडू



एच्. एल. नागेगौडा



गुब्बी वीरण्णा

© MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE. NOT TO BE REPUBLISHED

बेंगळूरू विभागातील प्रसिद्ध लोककला: बेंगळूरू येथे प्रत्येक वर्षी चालणारा करग उत्सव एक लोककलेचा प्रकार आहे. दक्षिण कर्नाटकात प्रसिद्ध असलेला सोमन कुणीत हा आणखी एक लोककलेचा प्रकार आहे. या विभागातील विशेष लोककला नाटक म्हणजे मूडलपाय यक्षगान होय. गारुडी कुणीत, डोळ्ळूकुणीत, कंसाले कुणीत इत्यादी लोककला आहेत. चित्रकलेत आर. एस. नायडू, रूमाले चन्नबसवय्या, व्यंकटप्पा इत्यादींचे योगदान अनन्य आहे.



लोकनृत्य



करग उत्सव



वेंकटप्पा आर्ट गॅलरी

@KSEEB NOT TO BE REPUBLISHED

1.1.6 शिक्षण आणि आरोग्य

बेंगळूरू विभागाने शिक्षणाशी संबंधित क्षेत्रात श्रेष्ठ स्थान मिळविले आहे. भारतरत्न प्रशस्ती मिळविणारे दोघे या विभागातील चिक्कबळ्ळापुर जिल्ह्यातील आहेत. त्यापैकी एक सर. एम. विश्वेश्वरय्या आणि दुसरे वैज्ञानिक सी. एन. आर. राव हे होत. नोबेल पारितोषिक मिळविलेल्या सर. सी. व्ही. रामन यांनी बेंगळूरूमध्ये संशोधन केले.



सिद्धगंगा मठ



श्री शिवकुमार स्वामीजी

बेंगळूरू हे एक प्रसिद्ध शिक्षण केंद्र आहे. बेंगळूरू विभागात अनेक प्रसिद्ध सार्वजनिक आणि खाजगी विश्वविद्यालये आहेत. त्याशिवाय येथे केंद्रसरकारच्या संशोधन संस्था आणि वैज्ञानिक प्रयोगालये आहेत. बेंगळूरु, तुमकुरु, शिवमोग्गा, दावणगेरी येथे विश्वविद्यालये आहेत. बेंगळूरु येथे कृषी विश्वविद्यालय आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सरकार प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य देत आले आहे. अनेक धार्मिक संस्थामध्ये शिक्षण देण्याचे कार्य चालते. सिद्धगंगा मठाचे श्री शिवकुमार स्वामीजींच्या नेतृत्वाखाली सिध्दगंगामठामध्ये हजारो गरीब विद्यार्थ्यांसाठी अन्न आणि शिक्षणाची व्यवस्था करण्यात येत आहे. बेंगलूरु दक्षिण (रामनगर) जिल्ह्यात जन्मलेल्या आणि श्री बाळगंगाधर स्वामीजींच्या नेतृत्वाखाली वाढलेल्या आदीचुंचनगिरी मठाची शैक्षणिक सेवा अद्वितीय आहे, येथे निरंतरपणे मूलभूत शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण महाविद्यालयातून देत आहेत. चित्रदुर्ग येथील मुरुघराजेंद्र मठ आणि सिरीगेरे तरळबाळू मठ यांची शैक्षणिक सेवाही उल्लेखनीय आहे.



श्री बालगंगा धरनाथ स्वामीजी

आरोग्याशी संबंधितसुध्दा या विभागाने महत्वाची साधना केलेली आहे. नैसर्गिक रोगांना आळा घातला आहे. शिशुमरण प्रमाण कमी झाले आहे. पोलीओ, प्लेग इत्यादी रोगांचे पूर्णपणे उच्चाटन केले आहे. ग्रामीण भागातील महिला आणि बालक अपौष्टिकतेच्या समस्येला सामोरे जात आहेत. ग्रामीण प्रदेशातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व आरोग्य उपकेंद्रे लोकांना वैद्यकीय सुविधा पुरवित आहेत. प्रत्येक जिल्हा केंद्रात सुसज्जीत जिल्हा दवाखाने आहेत. मोठ्या गावात समुदाय आरोग्य केंद्रे आहेत. तालुक्याच्या ठिकाणी तालुका आरोग्य केंद्रे आहेत. प्रसुती व सुश्रुषा बाबतीत उत्तम सुविधा देण्यासाठी सरकारने अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांना 24/7 (दिवसपूर्ण चालू) केंद्रे म्हणून घोषीत केलेले आहे. ग्रामीण भागातील गर्भवती, महिलांना सेवा देण्यासाठी फिरत्या वाहनांची (Mobile Health Van) सोय केली आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.1.7 सांस्कृतिक संपत्ती

बेंगळूरू विभाग सांस्कृतिक संपत्तीने समृद्ध आहे. तेथे अरण्य आणि प्राणी संपत्ती आहे. नद्या, दऱ्या, धार्मिक स्थळे, प्रवासी केंद्रे, सांस्कृतिक उत्सव जत्रा, सण इत्यादीमुळे या विभागाला समृद्धी प्राप्त झाली आहे.

राजकीय नेत्यांनी राज्य निर्माण करण्यासाठी अपार योगदान दिले आहे. कर्नाटक एकीकरणाचे मूळपुरूष केंगल हनुमंतय्या हे याच विभागातील होते. ते मुख्यमंत्री असताना आपल्या विधानसभा इमारतीचे बांधकाम झाले. आणखी एक एकीकरण चळवळीतील नायक एस. निजलिंगप्पा यांनी मुख्यमंत्री असताना अनेक निर्माण कार्ये हाती घेतली. परिसर रक्षणासाठी सालुमरद तिम्मक्का यांचे नाव घेतले जाते. आपल्या देशाच्या क्रिकेट खेळासाठी आमची देणगी म्हणजे अनिल कुंबळे, योग साधनेसाठी असाधारण योगदान दिलेले बी. के. एस अय्यंगार आणि मल्लाडीहळ्ळीचे श्रीराघवेंद्र स्वामीजी हे याच विभागातील होत. या विभागात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत.




विधानसौध



लालबाग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.1.8 स्वातंत्र्य चळवळीकार




केंगल हनुमंतय्या



एस. निजलिंगप्पा

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत या विभागातील अनेक मुत्सद्दींनी भाग घेतला. मैसुरू राज्याचे प्रथम मुख्यमंत्री के सी. रेड्डी, दुसरे मुख्यमंत्री केंगल हनुमंतय्या सहीत विशाल मैसूर राज्याचे मुख्यमंत्री एस. निजलिंगप्पा, समाजवादी नेते शांतवेरी गोपालगौडा, दुसरे-मुख्यमंत्री कडिदाळ मंजप्पा, ति. ता. शर्मा, एच् एस् दोरेस्वामी, भागिरथम्मा यांनी कर्नाटक स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. केंगल हनुमंतय्या आणि एस् निजलिंगप्पा हे कर्नाटक एकीकरण घडवून आणणारे नेते होते.


शंतवेरी गोपालगौड

शंतवेरी गोपालगौड हे कन्नड भूमीने पाहिलेले महान आदर्शवादी राजकारणी होय. त्यांचा जन्म 14 मार्च 1923 ला शिवमोग्गा जिल्ह्यातील तिर्यहळ्ळी तालुक्यातील आरग या गावी झाला. गोपाळगौडा या 28 वर्षाच्या तरुणाने 1951 मध्ये कागोडू भूचळवळीत उडी घेतली त्यामुळे त्यांना अटक झाली. गोपाळगौडा यांच्यामुळे भाडेकरुंचा जमीन संघर्ष म्हणूनही ओळखला गेला. कन्नड भाषिक प्रदेशांचे एकीकरण आणि म्हैसूर हे कर्नाटक राज्याचे नामकरण करण्याच्या लढ्यातही गोपाळगौडा प्रमुख होते. विधानसभेतील त्यांनी केलेली भाषणे आणि त्यांच्या जीवनशैलीमुळे त्यांना कर्नाटकाने पाहिलेल्या राजकारण्यांपैकी एक बनवले आहे.

© KSBSE NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. बेंगळूरु विभागात _____ जिल्हे आहेत.
2. बेंगळूरू विभागातील सर्वात जास्त पाऊस पडणारा जिल्हा _____.
3. बन्नेरूघट्ट हे राष्ट्रीय उद्यान _____ जिल्ह्यात आहे.
4. तुतीची पाने ही _____ उद्योगासाठी कच्चा माल ठरतात.
5. प्रसिद्ध लोककला म्यूझियम 'जानपद लोक' याची स्थापना _____ यांनी केली.
6. बेंगळूरू शहरात प्रत्येक वर्षी साजरा होणारा प्रसिद्ध उत्सव _____.
7. मैसुरू राज्याचे पहिले मुख्यमंत्री _____.
8. बेंगलूरु दक्षिण (रामनगर) जिल्ह्यातील पक्षीधामामध्ये _____ पक्षांचे रक्षण केले जाते.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

9. प्राचीनकाळी कर्नाटकात राज्य केलेली तीन राजघराणे कोणती?
10. या विभागात राज्य केलेल्या दोन पाळेगारांची नावे लिहा.
11. नैसर्गिक स्रोत म्हणजे काय? उदाहरणे द्या.
12. बेंगळूरू विभागात पिण्याच्या पाण्याची कमतरता भासण्याची कारणे कोणती?
13. बेंगळूरू विभागातील दोन धबधब्यांची नावे लिहा.
14. बेंगळूरू विभागातील अती उंच पर्वत शिखराचे नाव लिहा.
15. बेंगळूरू विभागातील दोन पक्षीधामांची नावे सुचवा.
16. बेंगळूरू विभागातील प्रमुख आहार पिके कोणती?
17. बेंगळूरू विभागातील कोणत्या ठिकाणी तयार कपड्यांचे केंद्र निर्माण केलेले आहेत?
18. बेंगळूरू विभागातील ज्ञानपीठ प्रशस्ती मिळविलेल्या तीन साहित्यिकांची नावे लिहा.



उपक्रम:

- बन्नेरूघट्ट राष्ट्रीय उद्यानाला भेट देऊन तेथील प्राण्यांची यादी तयार करा. त्यांची चित्रे संग्रह करा व याविषयी एक अहवाल तयार करा.
- बेंगळूरू शहरातील प्रमुख कारखान्यांची यादी करा. त्यांची चित्रे संग्रह करून एक अहवाल तयार करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.2 म्हैसूरु विभाग



म्हैसूरु विभागाचा जिल्हावार नकाशा

आपल्या कर्नाटकातील आणखी एक प्रशासकीय विभाग म्हणजे म्हैसूरु विभाग होय. म्हैसूरु ही सुरुवातीला वडेयर राज्याची राजधानी होती. या विभागात आठ जिल्हे आहेत ते म्हणजे म्हैसूरु, मंड्या, हासन, चिक्कमगळूरू, उडूपी, दक्षिण कन्नड, चामराजनगर आणि कोडगू होय. या विभागाचे प्रशासन केंद्र म्हैसूरु हे होय. हा विभाग नद्या, पर्वत श्रेणी, अरण्ये, वनस्पती, वन्याप्राणी, कॉफीचे मळे किनारपट्टी व बंदरे यासाठी प्रसिद्ध आहे.

1.2.1 ऐतिहासिक पार्श्वभूमी



चिक्कदेवराज वडेयर

गंग घराण्याच्या काळापासून म्हैसूरु राज्याचा इतिहास स्पष्टपणे दिसून येतो. तलकाडू ही गंग घराण्याची राजधानी होती. त्यानंतर चोळ, होयसळ आणि विजयनगरच्या राजांनी म्हैसूरु प्रदेशात राज्यभार केला.

म्हैसूरु हे अनेक शतकापासून वडेयर घराण्याच्या अधिपत्याखाली होते. काही वर्षे त्यावर हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान यांची राजवट होती. ऐतिहासिक आणि पौराणिकदृष्ट्या

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

म्हैसूरला महिषनाडू (महिषभूमी) असे म्हणून संबोधतात. पुराण कथेनुसार देवी पार्वतीनेच चामुंडेश्वरीचे रूप धारण करून महिषासुराला ठार मारले. महिषासुराला ठार मारलेल्या स्थळालाच म्हैसूरु हे नाव पडले यदुराय हा वडेयर घराण्याचा पहिला राजा होय. चिक्कदेवराय वडेयर प्रसिद्ध राजा होता.त्याच्या नंतर सिंहासनावर आलेले राजे दुर्बल होते. यावेळी सेनापनी असलेल्या हैदर अलीने या भागावर राज्य केले त्याने व त्याचा मुलगा टिपू सुलतानने सा.श. 1761 ते सा.श. 1799 पर्यंत त्यावर राज्यभार केला. टिपुने ब्रिटीशांविरुद अनेक युध्दे केली. त्यांने फ्रेंचाशी हातमिळवणी करुन ब्रिटीशांना देशाबाहेर घालविण्याचा प्रयत्न केला. सा.श. 1799 मध्ये ब्रिटीशांबरोबर झालेल्या युध्दात टिपू सुलतानने आपला जीव गमावला.



टिपू सुलतान

टिपू सुलतानच्या निधनानंतर म्हैसूरचा कारभार पुन्हा वडेयरांच्या हाती आला. ब्रिटिशांनी सा.श. 1831 साली शासन आपल्या ताब्यात घेतले. पण सा.श. 1881 ला त्यांनी राज्यभार वडेयरांच्याकडे सोपविला. मागील 20 व्या शतकाच्या सुरुवातीच्या आवधीत नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या राजवटीत अनेक लोककल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. विशेषतः शिक्षण, संस्कृती व जल निगम इत्यादीना त्यांनी प्रामुख्यता दिली. सर. एम. विश्वेश्वरय्या आणि सर. मिर्जा इस्माईल यांच्या दिवाणगिरीच्या काळात म्हैसूरने अपूर्व यश संपादन केले. सा.श. 1947 मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म्हैसूरु संस्थानसुध्दा भारतीय गणराज्यात विलीन झाले.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS



नाल्वडी कृष्णराज वडेयर



सर. एम. विश्वेश्वरय्या



सर. मिर्जा इस्माईल



राणी अब्बक्का

या विभागातील वेगवेगळ्या जिल्ह्यात विविध राज घराण्यांनी राजकारभार केल्याचा इतिहास आहे. कोडगू या प्रदेशावर अनेक राजघराव्यांनी राज्यकारभार केला. हालेरी या घराण्याने 17 व्या शतकात आपले राज्य स्थापन केले. बिदनुर ही त्यांची राजधानी होती. हालेरी राजांपैकी दोड्डवीरप्पा हा प्रसिद्ध राजा होय. चिक्कवीरराज हा शेवटचा राजा होता. तो दुर्बल राजा होता. त्याचा वापर करून ब्रिटिशांनी राज्यकारभार आपल्या ताब्यात घेतला. स्वातंत्र्यानंतर कोडगू हे स्वतंत्र राज्य झाले. पण सा.श. 1956 साली ते कर्नाटकात विलीन झाले. केळदी हे संस्थान आणखी एक राजघराणे आहे. उल्लाळची राणी अब्बक्का हिने पोर्तुगिजां विरूध्द दिलेला लढा उल्लेखनीय आहे.

कर्नाटकातील किनारपट्टीच्या प्रदेशाला तुळूनाडू असे संबोधत असत. दक्षिण कन्नड आणि उडूपी जिल्ह्यासहीत तुळूनाडू येथे 7 व्या शतकापासून 14 व्या शतकापर्यंत अळुप घराण्यातील राजांनी राज्यकारभार केला. वेगवेगळ्या कालखंडात उद्यावर, मंगलपूर, हुंच आणि बनवासी या अळुपांच्या राजधान्या होत्या. तुळूनाडूम ध्ये अनेक पाळेगारांनी राज्यकारभार केला. त्यापैकी प्रसिद्ध म्हणजे पुत्तिगेय चौटरू, बंगवाडीचे बंग, कार्कळचे भैरव, कासरगोडचे कुंबळे इत्यादी राजे होत.

किनारपट्टीच्या प्रदेशाला ब्रिटिशांनी कॅनरा असे संबोधले. हा प्रदेश त्यांनी सा.श. 1801 मध्ये ताब्यात घेतला. ब्रिटिशांनी किनारपट्टीचा प्रदेश सा.श. 1860 साली उत्तर कन्नड आणि दक्षिण कन्नड असा विभागला. दक्षिण कन्नड जिल्हा विभागून सा.श. 1997 मध्ये उडूपी जिल्ह्याची रचना करण्यात आली.

1.2.2 नैसर्गिक संपती

हा विभाग विविध हवामान असलेला प्रदेश आहे. या विभागाला जोडलेल्या उडूपी आणि दक्षिण कन्नड जिल्ह्यांना विशाल अशी किनारपट्टी लाभलेली आहे. पर्वत श्रेणी, घनदाट अरण्ये आणि किनारपट्टीचा प्रदेश येथे एकत्र असल्याने येथील हवामान उष्ण कटिबंधातील पावसाळी प्रदेश म्हणून ओळखला जातो.

© ITSL NOT TO BE REPUBLISHED

या विभागातील हवामान अति थंड आणि सरासरी उष्ण वलयाप्रमाणे आहे. मंड्या आणि म्हैसूर जिल्ह्यातील हवामान कोरडे आहे. या विभागातील उडूपी जिल्ह्यात जास्त पाऊस पडतो. तर मंड्या जिल्ह्यात कमी पाऊस पडतो. विभिन्न प्रकारचे हवामान, विविध प्रमाणाचा पाऊस, पर्वत, अरण्ये यांच्या वेगळेपणामुळे येथे विविध प्रकारची पिके पिकविली जातात. येथील प्रमुख कृषी पिके म्हणजे नाचणा, भात, उडीद, मूग, कुळीथ, जोंधळा ही होत. येथील व्यापारी पिके म्हणजे कॉफी, ऊस, तंबाखू, सुपारी, वेलदोडे, मोसंबी, अननस व काजू इत्यादी होत. भारतामध्ये सर्वप्रथम चिक्कमंगळूरु जिल्हयात कॉफी पिकविली होती. या विभागातील अनेक प्रदेशात खायच्या पानांची लागवड केली जाते.

नैसर्गिक संपन्नतेच्या दृष्टीकोनातून हा विभाग समृद्ध आहे. कोडगू, दक्षिण कन्नड, म्हैसूरु, चिक्कमंगळूरु इत्यादी जिल्ह्यामध्ये विविध प्रकारची अरण्ये आहेत. तेथे सागवान, श्रीगंध (चंदन), होंगे, नंदी, मत्ती इत्यादी वृक्ष वाढतात. ही अरण्ये अनेक प्रकारच्या अरण्य उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. डिंक, मध, मेण, जंगली फळे ही किरकोळ जंगली उत्पादने आहेत.


या विभागात अनेक लहान व मोठे पर्वत वसलेले आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे सुब्रम्हण्य पर्वत, गोपालस्वामी पर्वत, मलैमहादेश्वर पर्वत, बिळिगिरीरंगन बेट्ट, मुळळय्यनगिरी, केम्मनगुंडी, चामुंडीबेट्ट, श्रवणबेळगोळ, चंद्रगिरी, इंद्रगिरी इत्यादी प्रसिद्ध पर्वत आहेत.

घनदाट अरण्यांसाठी प्रसिद्ध असलेला म्हैसूरु विभाग जैव विविधतेसाठीसुद्धा प्रसिद्ध आहे. वाघ, चित्ता, जंगली कुत्रा, हरिण, कोल्हा, गवारेडा, विविध प्रकारचे साप इत्यादी जंगली प्राणी येथील अरण्यात वास करतात मंड्या जिल्ह्यातील बन्नूरु उत्तम प्रतिच्या मेंढयांसाठी प्रसिद्ध आहे.

या विभागातील प्रसिद्ध नद्या: कावेरी, हेमावती, हारंगी, नेत्रावती, कुमारधारा, वेदावती, कपिल, यगची, गंग्गोळळी इत्यादी होत. येथे अनेक प्रसिद्ध धबधबे आहेत. त्यापैकी गगनचुक्की, भरचुक्की, अब्बे घबधबा, इर्पु धबधबा, हेब्बे धबधबा इ.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

म्हैसूरु विभागतील जिल्ह्यामध्ये सापडणारी मुख्य खनिजे म्हणजे बॉक्साईट फेल्साईट, क्रोमाईट, चुनखडी, ग्रॅनाईट, मँगनीज इत्यादी होत. आपल्या देशात फेल्साईट हे खनिज फक्त म्हैसूरु जिल्ह्यामध्ये सापडते. या विभागातील दक्षिण कन्नड आणि उडूपी हे किनारपट्टीचे जिल्हे आहेत. येथे बंदरे आहेत. हे जिल्हे समुद्र माच्छिमारीसाठी प्रसिद्ध आहेत. येथे संग्रहित मासे प्रक्रिया करून निर्यात करतात. हजारो मच्छिमार कुटुंबाना हा मुख्य व्यवसाय झाला आहे. कोडगू, चिक्कमंगळूरू, म्हैसूरु जिल्हे हे लाकूड व्यवसायाचे केंद्र आहेत.



गगनचुक्की - भरचुक्की धबधबा



किनारपट्टीवरील मासेमारी

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

1.2.3 अरण्ये, वन्यप्राणी, राष्ट्रीय उद्याने



आदिवासी समाज

म्हैसूरु ही अरण्याची भूमी आहे. म्हैसूरु, कोडगू, चिक्कमंगळूरू, हासन इत्यादी जिल्ह्यात वैविध्यमय घनदाट अरण्याचा प्रदेश आहे. बंडीपूर, नागरहोळे, मलैमहादेश्वर, पुष्पगिरी इत्यादी प्रसिद्ध अरण्यप्रदेश आहेत. येथे अनेक प्रकारची किरकोळ अरण्य उत्पादने मिळतात. हजारो गरीब रानटी लोकांना ती उपजिविकेची व आहाराची साधने ठरली आहेत. म्हैसूरु विभागातील जिल्हे अनेक आदिवासी समुदायाचे निवासस्थळ आहे. जेनुकुरूब हा जास्त लोकसंख्या असलेला आदिवासी समुदाय आहे. म्हैसूरु चामराजनगर जिल्ह्यात ते जास्त प्रमाणात राहतात. दक्षिण कन्नड आणि उडूपी जिल्ह्यामध्ये कोरग हा आदिवासी समुदाय आहे. हा अत्यंत मागासलेला समाज आहे. कोडगू जिल्ह्यात दिसून येणारा प्रमुख

आदिवासी समुदाय म्हणजे मलेकुडियरू. हे दक्षिण कन्नड जिल्ह्यातसुद्धा दिसून येतात. चामराजनगर जिल्ह्यात राहणारे सोलिगरू हा आणखी एक आदिवासी समुदाय आहे. एवढेच नव्हे तर यरवरू, हक्कीपिक्की, हलसरू व मेदार हे सुध्दा आदिवासी समुदाय आहेत.


वाघ


हत्ती


गवारेडा


रंगनतिट्टू पक्षीधाम

वाघ हा आमचा राष्ट्रीय प्राणी आहे. व्याघ्र (वाघ) संरक्षण योजना राज्यात लागू आहे. राज्यात असलेल्या पाच वाघ संरक्षण अभयारण्यापैकी तीन म्हैसूरु विभागात आहेत. बंडीपूर, नागरहोळे, भद्रा हे वाघाच्या संरक्षणासाठी आरक्षित प्रदेश आहेत. त्याचप्रमाणे हत्तीच्या संरक्षणासाठीचा कायदा येथे लागू आहे. हत्तींच्या दातासाठी (सुळ्यासाठी) वाघाच्या कातड्यांसाठी त्यांना मारले जाते. ते थांबवून त्यांच्या पिढीच्या संरक्षणासाठी वाघ संरक्षण योजना व हत्ती रक्षण योजना लागू केलेली आहे. देशामध्ये वाघांची संख्या जास्त असलेला राज्य म्हणजे कर्नाटक होय.

आपल्या राज्यात जास्तीतजास्त अभयारण्ये आणि पक्षी संरक्षण केंद्रे (पक्षीधाम) हे म्हैसूरु विभागात आहेत. रंगनतिट्टू पक्षीधाम, गुडवी पक्षीधाम, कोक्करेबेळ्ळूरु हे प्रमुख पक्षीधाम तर मेलूकोटे प्राणी संग्रहालय कावेरी प्राणी संग्रहालय, मलैमहादेश्वर प्राणी संग्रहालय, पुष्पगीरी प्राणी संग्रहालय ही म्हैसूरु विभागातील प्रसिद्ध अभयारण्ये आहेत. म्हैसूरु आणि कोडगु जिल्ह्यात राजीव गांधी, नागरहोळे राष्ट्रीय अभयारण्ये आहेत व चामराजनगर जिल्ह्यात बंडीपूर राष्ट्रीय अभयारण्य आहे. खेड्डु या कार्यक्रमांतर्गत जंगली हत्तींचे पालन केले जाते.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

1.2.4 कृषी आणि उद्योग



दुग्धव्यवसाय

शेती हा आमच्या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. याला म्हैसूरु विभागातील जिल्हेसुध्दा अपवाद ठरत नाहीत. म्हैसूरु जिल्हा रेशीम उद्योग, कोडगू, हासन आणि चिक्कमंगळूर जिल्हें कॉफीचे मळे, मंड्या जिल्हा उसाच्या पिकासाठी, दक्षिण कन्नड जिल्हा, उडुपी जिल्हा हे काजू, मिरी, वेलदोडे आणि रबर पिकांसाठी प्रसिद्ध आहेत. देशात चिकमंगळूरू जिल्ह्यात जास्त कॉफीचे पिक घेतात. शेती ही केवळ आहार पदार्थ मिळविण्याचे साधन राहिली नाही. या विभागातील जिल्ह्यामध्ये शेती पिकाबरोबरच दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन आणि बागायत ही कामे केली जातात. या विभागातील प्रमुख पिके म्हणजे भात, नाचणा, जोंधळा, आवरे, मूग, उडीद इत्यादी होत. येथील व्यापारी पिके म्हणजे तंबाखू, कॉफी, काजू, सुपारी, बटाटे, ऊस, कापूस, मोसंबी, नारळ इत्यादी होत.

या विभागातील शेतीला चार योजनेतून पाण्याची सोय मिळते. ते म्हणजे कृष्णराजसागर, हारंगी, हेमावती आणि कबिनी जलयोजना होय. या विभागातील शेतीच्या विकासाला चालना देण्यासाठी अनेक शेती फार्म आणि कृषी कॉलेजांची स्थापना केलेली आहे.

या विभागातील म्हैसूरु, मंगळूरू, हासन, चिक्कमंगळूरू, मंड्या मडिकेरी ही कारखानदारीची केंद्रे आहेत. औषधांचे कारखाने, कॉफी क्यूरींग कारखाने, आहार प्रक्रिया घटक, रासायनिक खतांचे कारखाने, पेट्रोलियम कारखाने, कँपको चॉकलेट कारखाना, साखर कारखाना, सिमेंट कारखाना हे म्हैसूरु विभागात असणाऱ्या जिल्ह्यातील उद्योगधंदे आहेत. या विभागात मोठ्या उद्योगधंद्यांची संख्या कमी आहे. पण हजारो लहान व मध्यम प्रतिचे उद्योगधंदे येथे आहेत.

© DSERT NOT TO BE REPUBLISHED

1.2.5 कला, साहित्य, संगीत, लोककला, नाटक, नृत्य

हा विभाग कला, साहित्य, नाटक, नृत्याच्या बाबतीत श्रीमंत आहे. म्हैसूरु या शहराला कलेचे माहेरघर असे म्हणतात. किनारपट्टीचे जिल्हे यक्षगान व खुल्या नाट्यगृहासाठी प्रसिद्ध आहेत. यक्षगानने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळवलेली आहे. कंसाळे कुणीत, चौडीके कला, वीरगासे कुणीत, पट कुणीत, नंदीकोलू इत्यादी लोकप्रिय लोककलेचे प्रकार आहेत. कोडवांचा पुत्तरी हा सण, किनारपट्टीच्या जिल्ह्यामधील भूत आराधना व कंबळ हे विशिष्ट व लोकप्रिय आचरण प्रकार आहेत.

म्हैसूरु राजवाड्याने कला, नृत्य, संगीत यांना प्रोत्साहन दिले, त्यामुळे म्हैसूरु संप्रदायाची वैशिष्टयपूर्ण नृत्य, संगीत, वर्णकला उदयाला आली. भरतनाट्य, नाटक, संगीत, नाटकांना राजवाड्यात प्रोत्साहन मिळत होते. म्हैसूरु शहरात सरकारी अनुदानित नाटक गट रंगायन (रेपर्टरी) ची स्थापना झालेली आहे. ही संस्था वर्षभर नाटकाची तयारी करून त्याचे प्रदर्शन करते. आता राज्याच्या वेगवेगळ्या भागात रंगायन (रंगमंच) केंद्रांची सुरुवात झाली आहे. म्हैसूरुमध्ये मोठे कलामंदिर बांधलेले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



म्हैसूरचा राजवाडा

म्हैसूरु विभागातील जिल्हे अनेक प्रसिद्ध साहित्यिकांची ठिकाणे बनली आहेत. हासनमधील राजाराव हे प्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार, आर. के. नारायण हे दुसरे एक प्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार होते. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त शिवराम कारंत हे दक्षिण कन्नड जिल्ह्याचे होत. कन्नड भावगीतामध्ये प्राण ओतणारे के. एस. नरसिंहस्वामी हे म्हैसूरु शहरातील होत. गोरुरु रामस्वामी अय्यंगार, डॉ. एस. एल. भैरप्पा, एम. गोपालकृष्ण अडीग, बी. एम. श्रीकंठय्या, ए.एन. मुर्तीराव, देवनूरू महादेव, अकबर अली, सारा अबूबकर, आलनहळ्ळी कृष्ण, पूर्णचंद्रतेजस्वी, कोडगूची गौरम्मा, तिरूमलांबा, त्रिवेणी, निरंजन इत्यादी कन्नड साहित्याला समृद्ध केलेले या विभागातील महनीय आहेत. आर. के. श्रीकंठन, वीणे शेषण्णा, पिटील चौडय्या, वीणे दोरेस्वामी अय्यंगार, कद्री गोपालनाथ हे संगीत क्षेत्रातील दिग्गज आहेत. व्यंग चित्रकार आर. के. लक्ष्मण, रंगभूमीचे महमद पीर, चित्रकलेचे के. के. हेब्बार, रंगभूमी व चलनचित्र क्षेत्रातील बी. व्ही. कारंत, आधुनिक पूर्व साहित्यिक संची होन्नम्मा, रत्नाकरवर्णी, सिंगारार्य हे म्हैसूरु विभागातील सांस्कृतिक दिग्गज आहेत. फिल्ड् मार्षल के. एम. करियप्पा, जनरल के. एस. तिम्मय्या हे राष्ट्रीय कीर्ती मिळवून दिलेले सैन्याधिकारी आहेत. वैज्ञानिक असलेले राजारामण्णा, यु. आर. राव यांची साधना उल्लेखनीय आहे. सामाजिक न्यायाची वाचा फोडणारे देवराज अरस हे म्हैसूरु विभागातील होत.



आर. के. नारायण



बी. एम. श्री



पिटीलू चौडय्या



के एस. नरसिंहस्वामी



राजारामण्णा

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



के.के. हेब्बार



देवनुर महादेव



फिल्ड् मार्षल के.एम. करियप्पा



देवराज अरस

1.2.6 शिक्षण आणि आरोग्य

म्हैसूरु हे एक शिक्षणाचे केंद्र झाले आहे. या विभागातील साक्षरतेचे प्रमाण उत्तम आहे. म्हैसूरु वडेयरांच्या राजवटीत शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले. शतमानोत्सव साजरा केलेले म्हैसूरु विश्वाविद्यालय सा.श. 1916 मध्ये सुरु झाले. या विभागात अनेक जिल्ह्यामध्ये वैद्यकीय आणि इंजिनियरिंग कॉलेज आहेत. या विभागातील प्रमुख जिल्हा दक्षिण कन्नड जिल्ह्यात मंगळूरू विश्वविद्यालय आहे. तसेच अनेक खासगी विश्वविद्यालये आहेत. म्हैसूरु शहरामध्ये केंद्रीय आहार तांत्रिक संशोधन संस्था सी.एफ्.टी.आर.आय (सेंट्रल फुड् टेकनॉलॉजी रिसर्च इन्स्टिट्यूट) आहे.

शिक्षण क्षेत्राला सुत्तूरु मठाचे योगदान अपार आहे. या विभागात शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राला धर्मस्थळ आणि मणिपाल संस्थांचे योगदान लक्षवेधी आहे. या विभागातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रुग्णालये आहेत. ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य उपकेंद्रे आहेत. येथे मुलांना रोग निरोधक इंजेक्शन देण्यात येतात. गर्भिणी आणि बाळंतिणींची सेवा करण्यास आरोग्य सहायक, आशा कार्यकर्त्या आहेत. तसेच येथे शिशूमरण प्रमाण अत्यल्प आहे. लोकांचे जीवनमान उत्तम आहे. मातांचे मरण प्रमाणही खूप कमी आहे. या सर्व बाबी जनतेचे आरोग्य सुचवितात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.2.7 विभागातील सांस्कृतिक संपत्ती



गोमटेश्वर मूर्ती- श्रवणबेळगोळ



देशाचे माजी पंतप्रधान
(श्री.एच्. डी. देवेगौडा या विभागातील हासन जिल्ह्यामधील आहेत)



हुत्तरी सण, कोडगू



सुत्तूरू मठ, म्हैसुरु

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सांस्कृतिक दृष्ट्या म्हैसूरु विभाग श्रीमंत आहे. येथील सर्व जिल्ह्यात नैसर्गिक खजिना अपार आहे. समृद्ध नद्या, घनदाट अरण्ये, विविध वन्यप्राणी, विस्मयकारक धबधबे, कला-वास्तू वैभव, साहित्य कलांचे माहेरघर म्हणजे म्हैसूरु विभागातील जिल्हे होत. मंड्या जिल्हा साखरेसाठी प्रसिद्ध तर हासन व चिक्कमंगळूरू कॉफीसाठी प्रसिद्ध आहेत. यक्षगानसाठी किनारपट्टीचे जिल्हे प्रसिद्ध आहेत. तर कंसाळे नृत्यासाठी चामराजनगर प्रसिद्ध आहे. सोमनाथपूर, बेलूरू चन्नकेशव देवालयातील मदनिकांच्या प्रतिमा, श्रवणबेळगोळच्या गोमटेश्वराची एकशिला मूर्ती, हळेबिडू, मुडुबिद्रे इत्यादी विश्वविख्यात कलाकुसर असलेली देवालये प्रसिद्ध आहेत. म्हैसूरु विभागातील सर्व जिल्हे पर्यटन व्यवसायाला उत्तेजन देणारी क्षेत्रे आहेत.

कावेरी नदी ही आपल्या राज्याची जीवनदायी नदी आहे. ती कोडगू जिल्ह्यातील तलकावेरी येथे उगम पावते. 320 किलोमीटर लांब किनारपट्टी येथे लाभली आहे. मत्स्य व्यवसाय, बंदरे समुद्राच्या लाटावरील साहसी क्रीडा, शैक्षणिक केंद्रे येथे आहेत. त्यामुळे सांस्कृतिक दृष्ट्या हा विभाग संपन्न आहे.

1.2.8 विभागातील स्वातंत्र्य सैनिक

या विभागातील जिल्हे स्वातंत्र्य लढ्यातसुद्धा अग्रणी होते. गांधीजींना प्रिय असलेली खादी केंद्रे व गृह कुटिरोद्योगसुद्धा येथे मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. मंगळूरचे कुदमल रंगराव यानी अस्पृश्यता निवारणासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले होते. तगडूरू रामचंद्रराव हे गांधीजींचे अनुयायी होते. त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी लढा उभारला. एच. सी. दासप्पा, यशोधरम्मा दासप्पा, कर्नाड सदाशिवराव, एच. के. वीरण्णगौड, के.टी. भाषम्, कमलादेवी चट्टोपाध्याय के. व्ही. शंकरेगौडा, के. रामकृष्ण कारंत, सी. एम. पूणच्च इत्यादीनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला होता. अनेकांनी कर्नाटक एकीकरण लढ्यातसुद्धा भाग घेतला होता. अशा तऱ्हेने म्हैसूरु विभागातील हे जिल्हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त जिल्हे होते. म्हैसूरुचा दसरा उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय महोत्सव आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. दक्षिण कन्नड जिल्ह्याची विभागणी करून _____ साली उडूपी जिल्ह्याची रचना करण्यात आली.
2. म्हैसूरु विभागात _____ आणि _____ हे किनारपट्टीचे जिल्हे आहेत.
3. आमचा राष्ट्रीय प्राणी _____ हा आहे.

4. जंगली हत्तींना पाळण्याच्या पद्धतीला _____ म्हणतात.

5. म्हैसूरु विभागातील _____ या जिल्ह्यामध्ये जास्त कॉफीचे उत्पादन घेतले जाते.

6. कोडगू जिल्ह्यातील _____ येथे कावेरी नदीचा उगम होतो.

7. कुदमल रंगराव यांनी _____ याच्या निवारणासाठी आंदोलन केले.

8. म्हैसूरु येथे होणाऱ्या जगप्रसिद्ध उत्सवाचे नाव _____ हे होय.

9. म्हैसूरु विभागातील _____ आणि _____ जिल्ह्यामध्ये बंदरे आहेत.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

10. म्हैसूरु विभागामध्ये सध्या किती जिल्हे आहेत?

11. म्हैसूरु हे नाव येण्याचे कारण सांगा.

12. म्हैसूरु संस्थानाच्या प्रगतीसाठी 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात कारणीभूत ठरलेल्या वडेयरांची नावे लिहा.

13. किनारपट्टीच्या प्रदेशाला ब्रिटिशांनी सुरुवातीला कोणत्या नावाने संबोधले?

14. म्हैसूरु विभागातील दोन प्रसिद्ध नद्यांची नावे लिहा.

15. म्हैसूरु विभागातील जिल्ह्यापैकी अती जास्त व अती कमी पाऊस पडणारे जिल्हे कोणते?

16. म्हैसूरु विभागातील जिल्ह्यामध्ये सापडणाऱ्या दोन खनिजांची नावे लिहा.

17. म्हैसूरु विभागाच्या किनारपट्टीवरील जिल्ह्यातील लोकांचा प्रमुख व्यवसाय कोणता?

18. म्हैसूरु विभागातील दोन प्रसिद्ध अरण्य प्रदेश कोणते?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

19. म्हैसूरु विभागातील जिल्ह्यात राहणाऱ्या दोन आदिवासी समुदायांची नावे लिहा.

20. दोन पक्षीधाम आणि दोन वन्यप्राणी अभयारण्यांची नावे लिहा.

21. म्हैसूरु विभागातील दोन राष्ट्रीय उद्यानांची नावे सांगा.

22. म्हैसूरु विभागातील निवडक सहा प्रमुख पिके सांगा.

23. म्हैसूरु विभागात शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या दोन जलयोजना कोणत्या?

24. म्हैसूरु विभागात असणाऱ्या तीन प्रमुख उद्योगधंद्यांची नावे सांगा.

25. कोडव साजरा करत असलेल्या सुग्गी उत्सवाचे नाव काय?

26. कर्नाटक सरकारची नाटकसंस्था रंगायणाचे केंद्रस्थान कोणत्या शहरात आहे?

27. कन्नडच्या दोन प्रसिद्ध कादंबरीकारांची नावे लिहा.

28. म्हैसूरुमधील शतमानोत्सव साजरा केलेल्या विश्वविद्यालयाचे नाव लिहा.

29. ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा देणाऱ्या केंद्रांचे नाव काय?

30. दोन आरोग्य सूचींची नावे सांगा.

31. मैसूरु विभागात समाविष्ट झालेल्या दोन प्रसिध्द इंग्लिश कादंबरीकारांची नावे लिहा.

32. स्वातंत्र्य लढयांबरोबर अस्पृश्यता निवारण चळवळीत सहभागी असलेल्या दोन समाजसुधारकांची नावे लिहा.

33. श्रवणबेळगोळ कशासाठी प्रसिध्द आहे?

34. या जिल्ह्यातील चार स्वातंत्र्य सैनिकांची नावे लिहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- म्हैसूरु विभागातील जिल्ह्यामध्ये आढळणारी देवालये व त्यांचे निर्माणकर्त्या राजघराण्यांची यादी करून चित्र संग्रह करा.
- या विभागातील वेगवेगळ्या जिल्ह्यात असलेल्या गोमटेश्वरांची मूर्ती असलेल्या ठिकाणांची यादी करा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

1.3 कलबुरगी विभाग (कलबुर्गी)

कलबुर्गी विभागामध्ये सात जिल्हे आहेत. ते म्हणजे कलबुर्गी, बिदर, बळ्ळारी, विजयनगर, रायचूर कोप्पळ आणि यादगीरी. सुरवातीला या विभागात चार जिल्हें होते. सा.श. 1997 मध्ये रायचूर जिल्ह्यातून कोप्पळ जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. 31 डिसेंबर 2009 रोजी कलबुर्गी जिल्ह्यातून यादगीर जिल्हा नव्याने निर्माण करण्यात आला. 2 ऑक्टोंबर 2021 रोजी बळ्ळारी जिल्ह्याचे विभाजन करून विजयनगर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली.



कलबुर्गी विभागाचा जिल्हावार नकाशा

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

1.3.1 ऐतिहासिक पार्श्वभूमी



शिलालेख



सन्नती

या विभागातील जिल्ह्यांना अत्यंत श्रेष्ठ असा प्राचीन इतिहास आहे. इतिहासपूर्व अवशेषामधून हे दिसून येते. आरंभी हा प्रदेश मौर्य साम्राज्यात होता. नंतर तो सातवाहनांच्या साम्राज्यात सामील झाला. अशोकाच्या अनेक शिल्पकला येथे पहावयास मिळतात. या भागात प्राचीन बौध्द स्तूप आहेत. अशोकाचे भावविमोचन शिल्प हे या भूमीचे खास आकर्षण आहे. तसेच प्राचीन बौध्द स्तूप व शिलालेख येथील आणाखी एक आकर्षण आहे. सा. श. 8 व्या शतकात राष्ट्रकूट राजे कारभार करीत होते. त्यांची राजधानी कलबुरगी जिल्ह्यातील मान्यकेट (आजची मुळखेड) ही होती. नंतर कल्याणच्या चालुक्यानी राज्यकारभार केला. बसवकल्याण ही त्यांची राजधानी होती. विजयनगर जिल्ह्यातील हंपी ही विजयनगर राज्याची राजधानी होती. प्रसिद्ध वचनकार बसवेश्वरांच्या नेत्वृत्वाखाली चाललेल्या वचन चळवळीचे केंद्र कल्याण हे कलबुरगी विभागात येते. पुढे मध्ययुगात बहामनी राजे अधिकारावर आले. त्यांची राजधानी कलबुरगी होती. बहामनी आणि विजयनगर साम्राज्यांचे पतन झाल्यानंतर कलबुरगीचा प्रदेश हैदराबादच्या निजामांच्या अधिपत्याखाली आला. पुढे सा.श. 1948 मध्ये हैदराबाद निजाम संस्थान भारतीय गणराज्यामध्ये विलीन झाले. राज्य पुनर्रचना योजनेनुसार निजाम संस्थानाच्या अधिपत्याखाली असलेले बिदर, कलबुरगी आणि रायचूरु जिल्हे सा.श. 1956 मध्ये कर्नाटकात सामील झाले. कलबुरगी हे विभागीय केंद्र आहे. मद्रास प्रांतात असलेला बळ्ळारी जिल्हा कर्नाटकात सामील झाला.

NOT TO BE REPUBLISHED © KSTBP

बहामनी आणि विजयनगर साम्राज्याच्या राजकारभारानंतर अनेक संस्थानिक स्वतंत्र झाले. त्यांच्यामध्ये हरपनहळ्ळी, जरीमले, संडूरु आणि सुरपूर नायक प्रसिध्द होत. सुरपुर संस्थानाचा नायक कृष्णप्पनायक याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा वेंकटप्पा नायक अधिकारावर आला. पहिल्या स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या वेंकटप्पानायकने ब्रिटिशांच्या विरूद्ध लढा दिला. परंतु त्याचा लढा अयशस्वी झाला. वेंकटप्पा नायकाला ब्रिटीशानी कैद करून कैदखान्यात डांबून ठेवले. ब्रिटिशांनी सूरपूर हे हैद्राबाद निजामाला दिले. अशात-हेने बिदर कलबुरगी आणि रायचूरु जिल्हे निजाम संस्थानाचा भाग झाले. हे जिल्हे सा.श. 1956 साली कर्नाटकात सामील झाले.

हैद्राबाद कर्नाटक प्रदेश मुक्ती संग्राम

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करण्यास तयार नव्हते. यामुळे चिडलेल्या लोकानी निजामशाही विरूद्ध बंड पुकारले. या भागातील स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व स्वामी रमानंदतीर्थ यानी केले. निजामाच्या अधिपत्याखाली असलेले हैद्राबाद कर्नाटक प्रदेशाच्या मुक्ती संग्रामामध्ये पुढाकार घेतलेल्यामध्ये सरदार शरणगौडा इनामदार, शिवमूर्ती अळवंडी, शिरूर विरभद्रप्पा, प्रभूराज पाटील संगनाळ, पुंडलिकप्पा इत्यादी नेते होते. यांनी निजामशाही विरूद्ध सत्याग्रह केला. निजाम सरकारने नागरिकांच्यावर हिंसाचार केला. रजाकार या निजामाच्या खाजगी सैन्याविरूद्ध लोकानी तीव्र लढा सुरू केला. केंद्र सरकारने योग्य क्रम घेऊन निजामसंस्थान भारत गणराज्यात 17 सप्टेंबर सा.श. 1948 मध्ये विलीन केले. त्यावेळी या कार्याचे प्रमुख नेते गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल हे होते.

ऐतिहासिकदृष्ट्या कलबुर्गी प्रदेशातील लोकांचे विविध राज्य प्रशासनामार्फत विविध प्रकारचे शोषण झाले होते. त्यांनी त्यांचे राजकीय व आर्थिक स्वावलंबन हिरावुन घेतले होते. हा ऐतिहासिक अन्याय दुर करण्यासाठी सा.श. 2012 मध्ये 98 व्या घटना दुरुस्तीने लोकांना शिक्षण आणि रोजगारात प्राधान्य देवुन सक्षम ीकरणाचा एक नवीन मार्ग सरकारने तयार केला. आता या प्रदेशाला कल्याण कर्नाटक प्रदेश म्हणुन ओळखले जाते.


1.3.2 नैसर्गिक संपत्ती

या विभागातील प्रमुख नद्या म्हणजे भिमा, तुंगभद्रा, कृष्णा, मुल्लामारी, बेण्णेतोर इत्यादी होत. कारंजा धरण बीदर जिल्हयाला वरदान ठरले आहे. लालमाती, काळी माती आणि चिकण माती या विभागात आढळते. कोप्पळ आणि

NOT TO BE REPUBLISHED

रायचूरु जिल्ह्यामध्ये भात हे प्रमुख पीक पिकवितात. ऊस हे प्रमुख आर्थिक पीक आहे. कापूस, तीळ, करडई, जोंधळा, कुळीथ, तूर इत्यादी या भागातील पिके आहेत. या विभागात अरण्याचा प्रदेश क्वचितच आढळतो. बळ्ळारी जिल्ह्यातील संडूर तालुक्यामध्ये दाट जंगली प्रदेश आहे. बीदर जिल्ह्यात विरळ जंगली प्रदेश आहे. कोप्पळ जिल्ह्यामध्ये जंगली प्रदेशाचा भाग अत्यंत कमी प्रमाणात आहे.

या विभागातील जिल्ह्यामध्ये मिळणारी प्रमुख खनिजे म्हणजे चांदी, सिलीकॉन, सोने (रायचूरु जिल्हा), लोखंडाचे खनिज, चुन्याचा दगड, मँगनीज खनिज (बळ्ळारी, विजयनगर). ग्रॅनाईटचे दगड या विभागातील सर्व जिल्ह्यामध्ये मिळतात.



तुंगभद्रा धरण



लोखंडाची खाण

या विभागातील रायचूरु, विजयनगर आणि बळ्ळारी जिल्ह्यांना तुंगभद्रा धरणाचा पाणीपुरवठा होतो. कृष्णा नदीला अडवून बांधलेल्या बसवसागर धरणातून रायचूरु, कलबुरगी जिल्ह्यातील शेतीला पाणी पुरवठा करतात. कारंज्या योजनेतून बिदर जिल्ह्यातील कृषी कामाला पाणीपुरवठा करतात.

1.3.3 अरण्ये आणि अरण्यधाम

हा विभाग, अरण्यांची कमतरता असणारा भाग आहे. मोठे प्राणी येथे आढळत नाहीत. लंगूर (माकडा सारखा प्राणी) हरिण, कोल्हा, माकड, अस्वल, लांडगा, रानटी कुत्रा इत्यादी प्रमुख जंगली प्राणी येथे आढळतात. बळ्ळारी जिल्हयामध्ये दरोजी अस्वल धाम आहे. रायचूर जिल्हयात हरीण आढळून येतात.



दरोजी अस्वल अभयारण्य

© RTP NOT TO BE REPUBLISHED

1.3.4 कृषी आणि उद्योग



हट्टी सोन्याची खाण

या विभागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. येथे पावसाचे प्रमाण कमी आहे. पावसावर अवलंबून असणारी पिके येथे पिकवितात. पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असल्यामुळे येथे वरचेवर दुष्काळ लोकांना सतावतो. या विभागातील प्रमुख उद्योग म्हणजे लोखंड आणि पोलाद, साखर, सिमेंट, दगडी कोळसा या पासून तयार होणारी विद्युत केंद्रे इत्यादी होत. उद्योगधंद्यानी या विभागातील जनतेला उद्योग मिळवून दिला आहे. बळ्ळारी, जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणातील लोखंड आणि पोलादाचे कारखाने आहेत. यादगिरी आणि कलबुरगी जिल्ह्यामध्ये भरपूर सिमेंट कारखाने आहेत. बिदर जिल्ह्याची बिदरी कला प्रसिध्द आहे. या विभागात प्रेक्षणीय स्थळांची प्रगती होत आहे. या विभागातील प्रमुख प्रवासी (प्रेक्षणीय) केंद्रे म्हणजे विजयनगर जिल्ह्यातील हंपी, तुंगभद्रा धरण, कलबुर्गी जिल्ह्यातील सन्नती, ख्वाजा बंदेनवाज दर्गा, बिदर जिल्ह्यातील किल्ला, बसवकल्याण येथील सोन्याची खाण ही होत. संपूर्ण भारतात जास्त प्रमाणात सोन्याचे उत्पादन करण्याची खाण, रायचूरु जिल्ह्यातील हट्टी येथे आहे.

1.3.5 कला, साहित्य, संगीत लोककला, नाटक, नृत्य

कलबुरगी विभागातील जिल्हे आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतील परंतु कला, साहित्य, संगीत, लोककला, नृत्य इत्यादी विषयामध्ये समृद्ध आहेत. साहित्य क्षेत्रात कलबुरगी विभागाला इतिहासात महत्व आहे. कन्नड भाषेतील 'कविराज मार्ग' ची रचना राष्ट्रकुटांच्या काळात झाली. आदि कवी पंप यांने आरीकेसरी राजाच्या आश्रयात आसताना 'विक्रमार्जुन विजय' या महत्वपूर्ण काव्याची रचना केली. पंप, पोन्न आणि रन्न यांना कन्नडमधील तीन रत्ने असे संबोधले जाते. हे तिघेही कलबुरगी विभागातील आहेत. कन्नडमधील प्रथम व्याकरण ग्रंथ 'शब्दमणीदर्पण' चे रचनाकार केशीराज हे सुद्धा कलबुरगी विभागातीलच होत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

वचन - चळवळ: 12 व्या शतकात कर्नाटकात उदयास आलेली महत्वाची समाज सुधारणा चळवळ वचन चळवळ कबलुरगी विभागातील कल्याण नगरामध्ये चालली होती. बसवण्णा, अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, जेडर दासीमय्या, सिद्धराम इत्यादी शिवशरणानी केलेल्या सिद्धी साधनेचे कार्यक्षेत्र कलबुरगी विभागातील होते. या चळवळीचा एक भाग म्हणून धार्मिक आणि सामाजिक वर्तुळातील अनेक पुरुष व महिलांनी वचने लिहिली.



बसवण्णा



पुरंदरदास

दास साहित्य: कलबुरगी विभागातील रायचूर जिल्हा दास साहित्याचे माहेर घर होय. श्रीव्यासरायांच्या नेतृत्वाखाली दास संघाची स्थापना झाली. पुरंदरदास, कनकदास, राघवेंद्रतीर्थ इत्यादीनी किर्तनांची रचना केली. दाससाहीत्याने पुढील काळात कर्नाटक संगीत परंपरेला अपार देणगी दिली. अनेक दासानी रचलेल्या कृती, किर्तने, सूळादी (पद्याचा एक प्रकार) अनेक गीतगायन पदे, प्रबंध, नामावळी इत्यादी संगीत रचना माध्यमातून कन्नड साहित्याची श्रीमंती वाढविली.

तत्वपदे रचनाकार: वचन साहित्य, दास साहित्य प्राचीन काव्य इत्यादी विचारांनी प्रभावित झालेल्या लोकांनी तत्वपदे लिहिली. लोक-कलाकार आणि साधूसंत, फकिरांनी रचलेल्या गाण्यांना तत्वपदे म्हणता येईल. 18 व्या आणि 19 व्या शतकात अनेक तत्वपदे रचनाकारांनी लिंग असमानते विरुद्ध, अस्पृश्यतेविरुद्ध खोटे बोलणाऱ्या विरुद्ध, गैरमार्गाने पैसे कमविणाऱ्यांच्या विरोधात आपल्या तीक्ष्ण शब्दात उपहास केला आहे. चेन्नूर जलाल साहेब, हनुमंतव्वा इत्यादिंनी तत्वपदे रचलेली आहेत. अनेक निरक्षरांनी तत्वपदे रचून गायली आहेत.

आधुनिक काळात कलबुर्गी विभागाने साहित्य क्षेत्र समृद्ध केलेले म्हणजे: सिद्दय्या पुराणिक, जयतीर्थ, राजपुरोहित, शांतरस, पंडित तारानाथ, बी.ची, मुदेनुरसंगण्ण. सिंपिलिंगण्णा, श्रीमती शैलजा चडचण, जयदेवीताई लिगाडे, चेन्नन वालिकार, जंबण्णा अमरचिंत इत्यादीनी कलबुर्गी विभागामध्ये संगित क्षेत्रामध्ये मोठे योगदान दिले आहे. सिद्धराम जंबलदिन्नी, पंडित. तारानाथ, गजल गुंडम्मा, सुभद्राम्मा मन्सूर यांनी संगीत क्षेत्रात योगदान दिले आहे. चित्रकलेसाठी प्रसिद्ध

© KSEEB NOT TO BE REPUBLISHED

असलेले एस. एम. पंडित यांचे नांव समोर येते. लोकनाट्याचा विचार केला तर कलबुर्गी विभागात त्यांच्या दोड्डाट, सन्नाट आणि चामड्याच्या बाहुल्यांचा खेळ हे प्रदर्शन प्रचलित आहेत. चामड्याच्या बाहुल्यांच्या खेळात बेळगल वीरण्ण हे प्रसिध्द आहेत.

नंदी कुणीत, अलावी कुणीत, चौडम्माचे कुणीत, लम्माणी कुणीत, कोलाट, वीरगासे, दुरगमुरगी इत्यादी लोककला प्रकार आहेत. करडीमजलू (वाद्यप्रकार), शिट्टी वाजवण्याचा खेळ, मोहरम कुणीत, सोंगाड्यांचा खेळ हे सुध्दा लोककला प्रकार आहेत. बिदर जिल्ह्यातील बिदरी कला. किन्नाळच्या बाहुल्या कोप्पळ जिल्ह्यातील कवंदी या पारंपारिक कला प्रचलित आहेत.

1.3.6 शिक्षण-आरोग्य

आपल्या राज्यातील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले जिल्हे म्हणजे यादगीरी, रायचूर हे कलबुर्गी विभागात आहेत. शैक्षणिक प्रगतीत साक्षरतेची पातळी येथे कमी आहे. अलिकडील साक्षरता प्रमाण उत्कृष्ठ आहे. या विभागातील कलबुर्गी शहरात गुलबर्गा विद्यापीठ आणि कर्नाटकाचे केंद्रीय विद्यापीठ आहे. रायचूर जिल्ह्यात कृषी विद्यापीठ आणि बळ्ळारी येथे श्रीकृष्णदेवराय विद्यापीठ आणि विजयनगर जिल्ह्यातील हंपी येथे कन्नड विद्यापीठ आहे. बिदर येथे पशुवैद्यकिय पशु आणि मत्स्य मालन विज्ञान विश्वाविद्यालय आहे. बिदर येथे नरसिंह झरणी देवालय प्रसिध्द आहे. कलबुर्गी येथे प्रसिद्ध बौद्धविहार आहे.

बळ्ळारी, कलबुर्गी, रायचूर आणि बिदर येथे वैद्यकीय विद्यालये आहेत. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रुग्णालये आहेत. ग्रामीण भागात लोकांना आरोग्यसेवा देणारी आरोग्य उपकेंद्रे असून, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात वेगाने प्रगती होत आहे. येथे मोठे ई. एस. आय. रुग्णालय आहे.



कोप्पळ मधील गवीसिध्देश्वर मठाचा रथ

या विभागातील कोप्पळयेथील गवीसिद्धेश्वर मठ राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना विद्यादान आणि अन्नदान पुरवितात येथे होणारी जत्रा ही लोक प्रसिद्ध आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



बौद्ध विहार



गुलबर्गा विश्वविद्यालय



बंदेनवाज दर्गा



नानक झरा



कर्नाटक केंद्रिय विश्वविद्यालय



नरसिंह झरणी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.3.7 सांस्कृतिक संपती



किन्नाळातील बाहुल्या

संगीत, साहित्य, चित्रकला, लोककला, नाटक, नृत्य इत्यादी क्षेत्रात कलबुर्गी विभागातील जिल्ह्यांनी मोठे योगदान दिले आहे. कर्नाटकातील प्राचीन चार घराण्यांनी याला आश्रय दिला होता. ती चार घराणी म्हणजे राष्ट्रकूट, कल्याणचे चालुक्य, बहमनी आणि विजयनगर साम्राज्य होय. या राजघराण्यांच्या काळात साहित्य, कला, संगीत, यांना प्रोत्साहन मिळाले. हा विभाग नाटक व्यावसाय रंगभूमीलासुध्दा प्रसिध्द आहे.

बिदरची बिदरीकला, किन्नाळच्या खेळण्या आणि कवंदी इत्यादी गृहउद्योग येथे आहेत. प्राचीन वास्तुशिल्पकलेला हा भाग प्रसिद्ध आहे. बीदरचा किल्ला, हंपीतील स्मारके, बसवकल्याणचे बसवस्मारके, कलबुर्गीचा खॉजा बंदेनवाज दर्गा, सन्नतीची स्मारके इत्यादी येथील वास्तुशिल्पाची आश्चर्ये आहेत.

1.3.8 स्वातंत्र्य चळवळीकार

कर्नाटकातील इतर भागात भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि कर्नाटकाच्या एकीकरणासाठी संघर्ष केला असला तरी, कलबुर्गी विभागातील लोकांना स्वातंत्र्यासाठीच्या चळवळीमध्ये निजाम संस्थानाच्या मुक्ती संघर्षाच्या चळवळी मध्ये आणि कर्नाटक एकिकरण चळवळीमध्ये भाग घ्यावे लागले. स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित असलेल्या कलबुर्गी विभागातील दोन बाबींचा उल्लेख केला पाहिजे. एक म्हणजे राष्ट्रीय चळवळी बद्धल लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी वाचनालय चळवळ आणि दुसरी म्हणजे मुलांना शिक्षण देण्यासाठी आणि स्वातंत्र्य चळवळीबद्दल माहिती देण्यासाठी राष्ट्रीय शाळा स्थापन केल्या. त्या चार राष्ट्रीय शाळा.

म्हणजे,

1. नूतन विद्यालय कलबुर्गी (1907)
2. उस्मानिया राष्ट्रीय शाळा (चिंचोळी)
3. विद्यानंद गुरुकुल, कुक्कनूर (1922)
4. हमदर्द राष्ट्रीय शाळा, रायचुरू (1922)

या विभागामध्ये स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा ही आर्यसमाजातून आणि वंदेमातरम चळवळीतून आली. महागावच्या कल्याण शेट्टी यांनी स्वातंत्र्याची चळवळ करण्यासाठी तरुण संघाची संघटना केली. महागावच्या चंद्रशेखर पाटील यांनी अध्यक्ष म्हणून हे कार्य पुढे चालविले. श्री रमानंदतीर्थ हे या विभागातील प्रमुख स्वातंत्र्य सैनिक होते. त्याशिवाय शेकडो लोकांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला होता.

निजामशाही मुक्तीच्या चळवळीमध्ये मुख्य भूमिका बजावलेले सरदार शरणगौड इनामदार हे प्रमुख होते. निजामांच्या खाजगी सैन्याच्या रजाकारांनी कलबुर्गी विभागातील नागरिकांवर अनेक अत्याचार केले.

त्यांच्याविरोधात लोकांनी तीव्र विरोध व्यक्त केला. भारताला 15 ऑगष्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले पण निजाम संस्थान 17 सप्टेंबर 1948 रोजी भारतात विलीन करण्यात आले.

© DSERT NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागा भरा.

1. कलबुर्गी विभागातील जिल्ह्यांना _____ साली स्वातंत्र्य मिळाले.
2. कलबुर्गी विभागातील _____ येथे सोन्याची खाण आहे.
3. बळ्ळारी जिल्ह्यामध्ये _____ प्राणिसंग्रहालय आहे.
4. कर्नाटक केंद्रीय विश्वविद्यालय _____ येथे आहे.
5. विजयनगर जिल्ह्यामधील हंपीमधील विश्वविद्यालयाचे नांव _____ आहे.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

6. निजाम संस्थान भारतात कोणत्या साली विलीन झाले?
7. विजयनगर जिल्ह्यातील हंपी ही कोणत्या राजवंशाची राजधानी होती?
8. विजयनगर आणि बहामनी राज्यांच्या पतनानंतर राज्यकारभार केलेल्या दोन पाळेगारांची नांवे लिहा?
9. कलबुर्गी विभागातील दोन प्रमुख नद्या कोणत्या?
10. बिदर जिल्ह्यातील एका धरणाचे नांव लिहा?
11. बळ्ळारी आणि विजयनगर जिल्ह्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या धरणाचे नांव लिहा?
12. कलबुर्गी विभागाच्या प्रमुख उद्योगांची नावे सांगा?
13. कलबुर्गी विभागातील कोणत्या जिल्ह्यात लोह खनिजांचा आणि मँगनिजया मोठा साठा आहे?
14. कलबुर्गी मधील प्रसिद्ध दर्ग्याचे नांव काय?
15. कलबुर्गी विभागातील प्राचीन काळात रचलेल्या दोन काव्यांची नांवे लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

16. वचन चळवळीवर टीपा लिहा.
17. दास साहित्यामधील साधना केलेल्या दोन श्रेष्ठ दासांची नांवे लिहा.
18. कलबुर्गी विभागातील लोकनृत्यांची नांवे लिहा.
19. कलबुर्गी विभागातील रायचुरु जिल्ह्यात असलेली विश्वविद्यालये कोणती?
20. बळ्ळारी जिल्ह्यातील विश्वविद्यालय कोणते?
21. कन्नड विश्वविद्यालय कोणत्या ठिकाणी आहे?
22. कलबुर्गी विभागातील स्वातंत्र्य चळवळीबरोबर आणखीन दोन चळवळी सुरु होत्या त्या कोणत्या?
23. निजामांच्या खाजगी सेनेचे नांव काय?
24. कलबुर्गी विभागात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून सुरु झालेल्या दोन राष्ट्रीय शाळांची नावे लिहा?
25. हैद्राबाद निजाम संस्थान कोणत्या तारखेस भारतात विलीन झाले?
26. कलबुर्गी विभागातील प्रमुख स्वातंत्र्य चळवळीकारांची नांवे लिहा?



उपक्रम:

- कलबुर्गी विभागातील जिल्ह्यामध्ये असलेल्या लोखंडाच्या खाणी आणि पोलाद कारखान्यांची यादी करा. त्यांच्या चित्रांचा संग्रह करून माहिती लिहून अहवाल तयार करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.4 बेळगावी विभाग

या विभागातील चारही जिल्हे सा.श. 1956 पर्यंत मुंबई प्रांतामध्ये होते. राज्य पुर्नरचनेवेळी ते कर्नाटकात समाविष्ट करण्यात आले. या विभागातील धारवाड जिल्ह्याची बिभागणी करून सा.श. 1997 मध्ये हावेरी आणि गदग जिल्ह्यांची रचना केली गेली. तसेच विजयपूर जिल्ह्याची विभागणी करून बागलकोट या जिल्ह्याची रचना केली गेली. या विभागात आता सात जिल्हे आहेत. ते म्हणजे बेळगावी, धारवाड, हावेरी, गदग, विजयपूर, बागलकोट आणि उत्तर कन्नड जिल्हा हे होत.



बेळगावी विभागाचा जिल्हावार नकाशा


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1.4.1 ऐतिहासिक पार्श्वभूमी

या विभागातील प्रदेश सातवाहन आणि मौर्य यांच्या अधिपत्याखाली होता. बनवासी ही कदंबांची राजधानी होती. चालुक्याची राजधानी बदामी येथेच आहे. बदामी, पट्टदकल्लु, ऐहोळे येथे जगप्रसिद्ध मंदिरे आहेत. बदामीच्या गुहेमध्येशिल्पकलेचे वैभव पहायला मिळते. या विभागातील बसवण बागेवाडी, कुडलसंगम इ. वचन चळवळीची केंद्रे आहेत. समाज सुधारणेचे प्रणेते श्री बसवेश्वर यांचे समाधी स्थळ (ऐक्य स्थळ) कुडलसंगम येथे आहे. बेळगावी विभागावर राष्ट्रकूट त्यानंतर बहामनी राज्यांनी राज्य केले.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये बेळगावी विभागातील जिल्ह्यांनी अतुलनीय कामगिरी केली आहे. कित्तूर राणी चन्नम्माने सा.श. 1824 मध्ये ब्रिटीशांविरुद्ध ऐतिहासिक लढा पुकारला. त्यानंतर संगोळळी रायण्णांचा लढा स्मरणीय होता. बेळगावीमध्ये सा.श. 1924 साली महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस अधिवेशन भरविले होते. उत्तर कन्नड जिल्ह्यामध्ये अन्यायकारक कर व्यवस्थेच्या विरोधात सत्याग्रह सुरु झाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



कित्तूर राणी चन्नम्मा



संगोळळी रायण्णा

या विभागातील जिल्हे मुंबई प्रांतात होते. कर्नाटक एकीकरणावेळी सा.श. 1956 मध्ये ते कर्नाटकात समाविष्ट करण्यात आले. सुरुवातीला या विभागात बेळगावी, उत्तर कन्नड़, बिजापूर (विजयपूर) आणि धारवाड हे चार जिल्हे होते. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे धारवाड आणि बिजपूर जिल्ह्यांची विभागणी केल्याने आज या विभागात सात जिल्हे आहेत. या विभागातील उत्तर कन्नड, विजयपूर आणि बेळगावी हे सीमेवरील जिल्हे आहेत.

1.4.2 नैसर्गिक संपत्ती



बदामी गुहेतील शिल्पकला

हा विभाग नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये समृद्ध आहे. येथे भरुन वाहणाऱ्या नद्या घनदाट जंगले, अनेक खनिज संपत्ती, सुपीक माती व वीज निर्मिती केंद्रे आहेत. या विभागातून वाहणाऱ्या प्रमुख नद्या म्हणजे कृष्णा, मलप्रभा, घटप्रभा, भिमा, काळी, तुंगभद्रा इ. या नद्यांच्या मार्गात अनेक नयनरम्य सुंदर धबधबे आहेत. गोकाकचा धबधबा अतिशय आकर्षक आहे. दांडेली जवळील मागोडू धबधबा, कारवार जवळील देवमाला धबधबा, मुर्डेश्वर जवळील अप्सरकोंड धबधबा इ. नैसर्गिक सौंदर्याची जीवंत उदाहरणे आहेत. प्रवाशांसाठी उत्तम वातावरण येथे आहे. काळीनदीच्या काठावर अंशी राष्ट्रीय उद्यान आहे. दांडेली येथे अभयारण्य आहे 'अत्तीवेरी पक्षीधाम' हे देखील निसर्गामधील मनमोहक ठिकाण आहे.

या विभागातील बागलकोट जिल्ह्यामध्ये लोखंडाची खनिजे मिळतात. येथे मिळणारा आणखीन एक कच्चामाल म्हणजे चुनखडी, या विभागातील जिल्ह्यांमध्ये तीक्ष्णदगड मुबलक प्रमाणात मिळतात. इळकल्लू भागामध्ये ग्रॅनाईट मुबलक प्रमाणात मिळतो. येथून ग्रॅनाईटची निर्यात केली जाते.



इळकल्लू ग्रॅनाईट उद्योग

© ITBS NOT TO BE REPUBLISHED

1.4.3 अरण्य संपत्ती अभयारण्ये

या विभागातील बेळगावी, उत्तर कन्नड, धारवाड जिल्ह्यामध्ये घनदाट सदाहरित अरण्ये आहेत. उष्ण कटिबंधातील घनदाट जंगले तसेच वर्षभर हिरवीगार असणाऱ्या अरण्यांना 'सदाहरित अरण्ये' असे म्हणतात. येथे राखीव अरण्ये, राखीव जंगले आणि अभयारण्ये आहेत. उत्तर कन्नड जिल्ह्याच्या एकूण विस्तारापैकी शेकडा 80% अरण्य प्रदेश येथे आहे. यामध्ये हत्ती, जंगली म्हैस, हरिण, वाघ, चित्ता, अस्वल, मोर, रान मांजर इत्यादी वन्यजीव आढळतात.



घनदाट अरण्ये

या अरण्यामध्ये रोझवूड, चंदनाचे झाड, मत्ती सागवान आणि नंदी इत्यादी मौल्यवान वृक्ष आढळतात. काही लहान अरण्यप्रदेश हे आदीवासी समाजासाठी उपजीविकेचे साधन झाले आहेत.

NOT TO BE

1.4.4 शेती, व्यवसाय

या विभागात जास्तीतजास्त काळी आणि लाल माती आहे. या मातीत भात, कापूस, मक्का, कडधान्ये, गहू, शेंगा, बाजरी, मिरची ही मुख्य पिके पिकवितात. महालिंगपूर येथे गूळ उत्पादन, बॅडगी येथे मिरची, काजू इ. येथील प्रमुख उत्पादने आहेत. मलप्रभा पाणीपुरवठा योजना (नविलतीर्थ) कृष्णा अप्पर योजना (कृष्णा मेल्दंडे योजना) (आलमट्टी आणि नारायणपुर) इत्यादी पाणीपुरवठ्याच्या प्रमुख योजना आहेत. काळी, वरदा, शरावती, डोणी, भीमा इ. येथील प्रमुख नद्या आहेत.



आलमट्टी धरण

मासेमारी हा उत्तर कन्नड जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय आहे. येथे अनेक मत्स्यप्रक्रिया घटक आहेत. काजू हे एक दूसरे व्यापारी पीक आहे. येथे अनेक काजू कारखाने आहेत. उत्तर कन्नड जिल्ह्यामध्ये कद्रा, सूपा, कोडसळळी, नागझरी आणि कैगा विद्युत्त उत्पादन केंद्र आहे. सुपारी, ऊस, कापूस, मसाल्याचे पदार्थ येथील प्रमुख व्यापारी पिके आहेत. विजयपूर आणि बागलकोट जिल्हा बागायतीसाठी प्रसिद्ध आहे. तेथील हवामान आणि मातीतील पोषक घटक फळांच्या वाढीसाठी उपयुक्त आहे. या जिल्ह्यात द्राक्षे भरपूर प्रमाणात पिकवितात. येथे द्राक्षे संस्करण केंद्रे निर्माण होत आहेत. डाळिंब, लिंबू, चिक्कू, संत्री, मोसंबी इ. फळांची झाडे वाढविली जातात. हावेरी जिल्हा हा संकरित बियाणांच्या उत्पादनाचा प्रमुख केंद्रबिंदू आहे. येथे अनेक राष्ट्रीय बीज उत्पादन केंद्रे आहेत. गुळेदगुड्डु चोळी खण उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.

औद्योगिक क्षेत्रामध्ये हुब्बळळी, बेळगावी, बागलकोट, गदग, हावेरी ही प्रमुख केंद्रे म्हणून वाढत आहेत. इळकल्लमध्ये अनेक ग्रॅनाईट शुद्धीकरण कारखाने आहेत.

1.4.5 कला, साहित्य, संगीत, लोककला, नाटक

या विभागातील जिल्हे अनेक प्रकारच्या ललित कलेत प्रसिद्ध आहेत. धारवाड राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय हिंदुस्थानी संगीतकारांचे माहेरघर आहे. भारतरत्न पंडित भिमसेन जोशी, पंडित मल्लीकार्जुन मन्सुर, बालेखान (सतार), विदूषी गंगूबाई हानगल,पंडित वेंकटेश कुमार, पं. बसवराज राजगुरु एनगी बाळप्पा. ब अप्पालाल जमखंडी इ. अनेक संगीतकार धारवाडचे आहेत.


NOT TO BE REPUBLISHED © KTBS




कुमारव्यास



कनकदास



चंद्रशेखर कंबार



फा. फर्डिनंड किटेल




द.रा.बेंद्रे



डी. सी. पावटे



मोहरे हणमंतराव



दिनकर देसाई



शिशुनाल शरीफ

मध्ययुगामध्ये अनेक कन्नड काव्य रचना केलेले रन्न, नागचंद्र, नयसेन, कुमारव्यास, चामरस, बसवण्णा, कनकदास, शिशूनाळ शरिफ इत्यादी अनेक रचनाकार बेळगाव विभागातील वेगवेगळ्या ठिकाणचे आहेत. वचन पितामह डॉ फ.गु. हळकट्टी, रेवरेंड किट्टेल, भूसनूरमठ, दिनकर देसाई, बसवराज कट्टीमनी, एम.एम. कलबुर्गी, आद्यरंगाचार्य (श्रीरंग) ज्ञानपीठ पुरस्कार विजेते द.रा.बेंद्रे, गिरिश कार्नाड, चंद्रशेखर कंबार, वि. कृ. गोकाक यांनी या आधुनिक युगात कन्नड साहित्य श्रीमंत बनविले. कन्नड शब्दकोशाचे चार खंड काढलेले रेवरंड किटेल यांची कर्मभूमी धारवाड आहे. लोकगीत गारुडी हुक्केरी बाळप्पा, नाडोज सुक्री बोम्मगौडा यांनी लोकगीतात आपला ठसा उमटविला. श्रीकृष्ण पारिजात, बडगतिट्टू, यक्षगान, सन्नाट, दोड्डाट इ. नाटक प्रकारांचा विकास येथे झाला. आप्पालाल जमखंडी, कौंजलगी निंगम्मा, लोकापूर देशपांडे हे नाटक कलेत निपुण होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED




कर्नाटक विश्वविद्यालय



कर्नाटक विद्यावर्धक संघ

1.4.6 शिक्षण, आरोग्य

धारवाड, बेळगावी, विजयपूर (बिजापूर) ही शिक्षणाची प्रमुख केंद्रे आहेत. धारवाडमध्ये सा.श. 1949 मध्ये स्थापन झालेले कर्नाटक विश्वविद्यालय आहे. हुब्बळळीमध्ये कर्नाटक राज्य कायदा विश्वविद्यालय आहे. बेळगावीमध्ये राणी चन्नम्मा विश्वविद्यालय आणि विश्वेश्वरय्या तांत्रिक विश्वविद्यालय आहे. तर विजयपूरम ध्ये कर्नाटक राज्य अक्कमहादेवी महिला विश्वविद्यालय आहे. तसेच बागलकोटमध्ये कृषी (बागकाम) विज्ञान विश्वविद्यालय आहे.



श्री सिध्देश्वर स्वामी

विजयपुर जिल्ह्यातील नंदीहळी येथे ओगेप्प बिरादार आणि संगव्वा बिरादार यांच्या पोटी 5 सप्टेंबर 1940 रोजी सिध्देश्वर स्वामींचा जन्म झाला. त्यांचे मुळ गाव बिज्जरगी आहे. सिध्देश्वर स्वामी संत आणि आध्यात्मिक विचारवंत होते. यांना कायकयोगी या नावाने ओळखले जाते. आपल्या प्रवचनातून अनेकांना प्रकाशमान करणारे स्वामी सिध्देश्वर हे विजापूर येथील ज्ञानयोगश्रमाचे प्रमुख होते.

या विभागातील जिल्ह्यांनी साक्षरतेमध्ये उत्तम स्थान मिळविले आहे. बेळगावी, हुब्बळी, विजयपूर, बागलकोट येथे वैद्यकीय महाविद्यालय तसेच तांत्रिक (इंजिनिअरिंग) महाविद्यालये आहेत. 19 व्या शतकाच्या शेवटी डेप्युटी चन्नबसप्पा यांच्या नेतृत्वाखाली कन्नड शाळा या विभागात प्रारंभ करण्यात आल्या. अनेक

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

खाजगी शिक्षण संस्था शिक्षण क्षेत्रात आपले योगदान देत आहेत. तसेच खिश्चन संस्था ही शिक्षण प्रसारात अमूल्य योगदान देत आहेत. कन्नड शब्दकोशाचे चार खंड काढलेले रेवरंड किटल यांची कर्मभूमी धारवाड आहे.

आरोग्य क्षेत्रामध्येही बेळगावी विभागातील जिल्ह्यांनी उत्तम प्रगती साधली आहे. जनसंख्या वाढीचे प्रमाणही कमी आहे. परंतु बालमृत्यू प्रमाण, बाळंतीनी मरण प्रमाण वाढलेले आहे. या विभागात अनेक आरोग्य केंद्रे आहेत. खेडेगावात आरोग्य उपकेंद्रे आहेत. वैद्यकीय महाविद्यालये स्वतःचे दवाखाने चालवित आहेत.

1.4.7 सांस्कृतिक संपत्ती

सांस्कृतिक संपत्तीने समृद्ध असा हा विभाग आहे. कला, संगीत, नाटक, साहित्य इ. क्षेत्रात या विभागातील जिल्ह्यांचे योगदान अपार आहे. येथील संगीतकार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळविलेले आहेत. गानयोगी पंचाक्षरी गवाई यांनी अंध मुलांना आश्रय देऊन संगीत कलेला प्रोत्साहन दिले आहे. हुब्बळ्ळीला कर्नाटकचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते. बॅडगी, महालिंगपूर, विजयपूर अनुक्रमे मिरची, गूळ आणि द्राक्षे यांची व्यापारी केंद्रे आहेत. व्यवसायिक रंगभूमीमध्ये बेळगाव विभागाने उत्तम स्थान प्राप्त केले आहे.



भारतरत्न पं. भिमसेन जोशी



मल्लीकार्जुन मन्सूर



गंगूबाई हानगल



पंचाक्षरी गायक

या विभागात जगप्रसिद्ध ऐतिहासिक स्मारके आहेत. बदामी, पट्टदकल्लु, ऐहोळे येथील ऐतिहासिक स्मारके कर्नाटक संस्कृतीची उत्तम उदाहरणे आहेत. प्रवासीस्थळे तीव्र गतीने वाढत आहेत. उत्तर कन्नड जिल्ह्यातील कारवार येथे INS कदंब नौका सुरक्षादलाची प्रमुख नौकादल केंद्र म्हणून प्रगती होत आहे. या जिल्ह्यातील

© RIGHTS RESERVED

घनदाट अरण्ये ही वन्यजीवांचे आश्रयस्थान आहेत. अनेक नद्यांचे उगम येथे झाले आहेत. येथील नयनरम्य धबधबे प्रवाशांना आकर्षित करून घेतात. काही समुद्र किनाऱ्यावरील चौपाट्या (बीच) ही प्रेक्षणिय स्थळे झाली आहेत.

1.4.8 स्वातंत्र्य सत्याग्रही



पाटील पुट्टप्पा



डॉ. फ.गु. हळकट्टी

19 च्या शतकात बेळगावी विभागातील कित्तूरमध्ये ब्रिटीशांच्या विरुद्ध लढा सुरु झाला. स्वातंत्र्यासाठी मैलार महादेवप्पा यांनी आपले प्राण गमावले. स्वातंत्र्य संग्रमात बेळगावी विभागाचे पात्र उल्लेखनीय आहे. या विभागातील हजारो लोकांनी स्वातंत्र्य संग्रामामध्ये सहभागी होऊन तुरुंगवासही भोगला. स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या हजारो लोकांमध्ये काही प्रमुख म्हणजे सिद्धप्पा कंबळी, आलूरु वेंकटराव, ना. सु. हर्डीकर, हर्डीकर मंजप्पा, गंगाधर राव देशपांडे, यांनी प्रथम कन्नडांबे चित्रपट तयार केला मुनवळळी वकीलांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या रामदुर्ग संस्थान मूक्ती संग्रामात आठ जणांना फाशी देण्यात आली. आर. आर. दिवाकर, नाडोज पाटील पुट्टप्पा इत्यादी. या सर्वांनी स्वातंत्र्य संग्रामाबरोबरच कर्नाटक एकीकरणासाठी चळवळ चालविली. स्वातंत्र्यसंग्राम, कर्नाटक एकीकरण चळवळ याबरोबरच अनेकांनी समाज सुधारणेमध्ये आपल्याला वाहून घेतले. रा.ह. देशपांडे यांनी समस्त कन्नडीगांना आत्माभिमान वृद्धीसाठी ''सिरीगन्नडम गेल्गे'' हा सप्ताक्षरी मंत्र दिला. **वचन साहित्य पितामह** ही पदवी मिळविलेले डॉ. फ.गु. हळकट्टी यांनी पत्रकारीकेचेही काम केले. मोहरे हनुमंतराय, पाटील पुट्टप्पा यांनी स्वातंत्र्य संग्रामाबद्दल वर्तमानपत्रातून लोकांना प्रेरित केले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागा भरा.

1. बेळगावी विभागातील जिल्हे _____ साली कर्नाटकात समाविष्ट करण्यात आले.
2. ब्रिटीशां विरुध्द लढा पुकारलेल्या राणीचे नांव _____.
3. हावेरी, गदग आणि बागलकोट या नविन जिल्हयांची रचना _____ साली झाली.
4. बदामी _____ राज घराण्याची राजधानी होनी.
5. इळकल्लमध्ये _____ नैसर्गिक साधन संपनी मिळते.
6. बेळगावी विभागानील बॅडगी हे गाव _____ शेती उत्पादनामुळे नावारुपास आले आहे.
7. बेळगावी विभागातील _____ जिल्हयात बागायत विश्वविद्यालय आहे.
8. कर्नाटक राज्यातील प्रथम महिला विश्वविद्यालय _____ येथे आहे.
9. मुनवळळी वकीलांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या _____ संस्थानाच्या मुक्ती संग्रामात आठ जणांना फाशी देण्यात आली.
10. बेळगावी विभागातील _____ जिल्हयात बीजोत्पादन केंद्रे आहेत.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

11. म. गांधींच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस अधिवेशन या विभागातील कोणत्या जिल्ह्यात व किती साली झाले?
12. बेळगावी विभागातील प्रमुख दोन नद्यांची नावे लिहा.
13. बेळगावी विभागातील प्रमुख अभयारण्याची नावे लिहा.
14. सदाहरित जंगले म्हणजे काय?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

15. बेळगावी विभागातील प्रमुख धबधब्यांची नावे लिहा.
16. बेळगावी विभागातील कोणत्या जिल्ह्यात लोखंडाची खनिजे मिळतात?
17. बेळगावी विभागातील प्रमुख पिके कोणकोणती?
18. बेळगावी विभागातील कोणत्या जिल्ह्यातील लोकांचा मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे?
19. बेळगावी विभागातील चार ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांची नावे लिहा.
20. बेळगावी विभागातील तीन प्रसिद्ध संगीतकारांची नावे लिहा.
21. बेळगावी विभागातील दोन प्रसिद्ध नाटक प्रकारांची नावे लिहा.
22. बेळगावी विभागातील कोणत्या जिल्ह्यात कायदा महाविद्यालय आहे?
23. बेळगावी विभागातील प्रमुख तीन स्वातंत्र्य वीरांची नांवे लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- कर्नाटकातील एकतीस जिल्ह्यांची यादी करा. जिल्ह्यानुसार कर्नाटकाचा नकाशा संग्रह करा. प्रत्येक जिल्ह्यातील प्रवासी केंद्रांची यादी करा. हे सर्व मिळून अहवाल तयार करा.
- प्रमुख वचनकारांची यादी करा. त्यांना संबंधित विविध जिल्ह्यातील प्रदेशांची माहिती संग्रहित करा.

पाठ 4 वेदकालीन संस्कृती

F6D8A4

पाठाचा परिचय:

या पाठात वेदांचा परिचय करून दिला आहे. पूर्व वेदकाळ आणि उत्तर वेदकाळातील समाज, आर्थिक स्थिती, राजकीय आणि धार्मिक व्यवस्थेमधील फरक समजाविला आहे.

सामर्थ्ये:

1. चार वेदांची नांवे समजून घेणे.
2. पूर्व वेदकाळ आणि उत्तर वेदकाळात समाजात झालेले बदल ओळखतील.
3. वेद काळातील राजकीय संस्था जाणणे.
4. वेदांमधील संदेशांचा अर्थ समजून घेणे.
5. भारतीय महाकाव्यांची नीवे सांगणे.

© MKBS NOT TO BE REPUBLISHED

मध्य आशियातून आलेल्या आर्य लोकांच्या आगमनाने भारतात एका नवीन संस्कृतीचा उगम झाला. त्या संस्कृतीना वेद कालीन संस्कृती असे म्हणतात. वैदिक संस्कृतीचा उगम सर्व प्रथम सरस्वती नदीच्या मैदानी प्रदेशात नंतर गंगा नदीच्या मैदानी प्रदेशात झाला. वेद साहित्याची रचना ज्या काळात झाली. त्या काळाला वैदिककाळ असे म्हणतात.

'वेद' म्हणजे ज्ञान. वेद चार आहेत:

1. ऋग्वेद,
2. यजुर्वेद,
3. सामवेद
4. अथर्ववेद

यातील ऋग्वेद हा प्राचीन वेद आहे. संस्कृत भाषेत असणारे हे वेद हजारो वर्षे मौखिक स्वरुपात होते. ऋग्वेदामध्ये सरस्वती या नदीचा उल्लेख अधिक आहे. सध्याच्या राजस्थानातील थरच्या वाळवंटात लुप्त झालेल्या 'घग्गर-हकरा' याच नदीला सरस्वती नदी म्हणून ओळखले जाते. परंतु अफगाणिस्थानात वाहणारी हेल्मंड (Helmand) नदीच प्राचीन सरस्वती नदी असा मतप्रवाहही आहे.

आर्यांच्या काळात चार वेद तसेच त्या संबंधीच्या साहित्याची रचना झाली. वेदकालीन इतिहास जाणून घ्यावयाचा असल्यास वैदिक साहित्याचा आधार फार महत्वाचा आहे. ऋग्वेद काळाला पूर्व वेदकाळ म्हणून, तसेच त्यानंतरच्या काळाला उत्तर वेदकाळ असे म्हटले जाते.

पूर्व वेदकाळ

सामाजिक जीवन: पूर्व वेदकाळात कुटुंब हाच समाजाचा मुख्य घटक होता. वडील हे कुटुंब प्रमुख असत. समाजात अविभक्त कुटुंब पद्धती रूढ होती. युद्धामध्ये आपण जिंकलेल्या सैनिकांना दास, गुलामासारखे वागवत होते.

स्त्रियांचे स्थान: या काळामध्ये स्त्रियांना मानाचे स्थान होते. त्या काळातील स्त्रिया राजकीय संस्थांमध्येसुद्धा सहभागी होत होत्या. विधवा विवाहाचे आचरण त्याकाळी होते. मुलीही वेदांचे अध्ययन करत होत्या. घोषा, अपाला, लोपमुद्रा, इंद्राणी, विश्ववरा इत्यादी तत्कालीन थोर विद्वान महिला होत. सभा, समिती अशा राजकीय संस्थामध्येही स्त्रियांचा सहभाग होता. बालविवाह, सतीची पद्धत अशा चालिरिती त्या काळात नव्हत्या.

आर्थिक जीवन: पशुपालन आणि शेती हे आर्यांचे प्रमुख उद्योग होते. अनेक प्रकारची धान्ये ते पिकवित असत. बार्ली, तांदूळ, मासे, मांस यांचा आहारासाठी वापर करत असत. लोखंड व इतर धातूंचा वापर करण्याचे तंत्र त्यांना अवगत होते. कापूस आणि लोकर विणणारे, सुतार, लोहार आणि कुंभार असे उद्योग

NOT TO BE REPUBLISHED @KSBS

करणारे कारागीर समाजात होते. शेती, वैद्य आणि पुरोहित हे व्यवसाय प्रमुख होते. परंतु कोणीही कोणताही व्यवसाय करू शकत असत. गाईना संपती (धन) असे म्हणत असत. गोधनासाठी युद्धे होत होती.

राजकीय जीवन: आर्य समाजाच्या प्रमुखाला 'राजन' असे म्हणत. अशतः राजन हा सर्वाधिकारी नव्हता आणि राजपद हे सुध्दा वंश परंपरेने मिळत नसे. सभा, समिती आणि 'विधाता' अशा राजकीय संस्था राज्यकारभारात महत्वाची भूमिका बजावत होत्या. राजन हा अनुभवी लोकांचा सल्ला घेऊन निर्णय घेणारा न्यायाधिश होता. युद्धात लढणे, लोकांचे जीवन, संपतीचे रक्षण आणि गोधनाचे रक्षण करणे ही राजाची कर्तव्ये होती.

धार्मिक जीवन: आर्य लोक इंद्र, सूर्य, सोम, वरूण, मित्र, यम, अश्विनी इत्यादी देवतांची आराधना ते करीत असत. आर्यलोक देवतांची आराधना यज्ञांच्या रूपाने करीत असत. सत्य हे एकच आहे, हे ज्याना समजले ते विविध रितीने त्याचे वर्णन करतात. विश्वाच्या सर्व बाजूनी उत्तम विचार आपल्याकडे येऊ देत. ही वेदांतील शिकवण आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

उत्तर वेदकाळ


बऱ्याच शतकाच्या कालावधीनंतर सप्तसिंधु प्रदेशातील लोकसंख्या वाढली. लोकांच्या जीवन क्रमात बदल झाले. वैदिककालीन लोक टप्प्याटप्याने गंगा, यमुना नद्याच्या मैदानात स्थलांतरीत झाले. काही लोक विंध्यपर्वत ओलाडूंन दक्षिणेकडे गेले.

राजकीय बदल: उत्तर वेदकालीन राजन बलीष्ठ झाले. या काळात राज्यकारभारात विधाताचे अस्तित्व पूर्णपणे नाहीसे झाले. सभा आणि समित्या यांनी आपले महत्व गमविले होते. राजानी आपल्या राज्याचा विस्तार वाढविण्यास सुरुवात केली. राजपद हे वंशपरंपरागत झाले. राजांनी आपल्या राज्याच्या विस्तारासाठी अश्वमेध, राजसूय इत्यादी यज्ञयाग करावयास सुरूवात केली.

सामाजिक बदल: उत्तर वेदकाळामध्ये गोत्र पद्धती सुरुवात झाली. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम (चातुराश्रम) व्यवस्था सुरूवात झाली. समाजात स्त्रियांचे स्थान अत्यंत कमी झाले. स्त्रिया शिक्षणापासून वंचित झाल्या. राजकीय संस्थापासून दूर झाल्या. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्गांची वर्णव्यवस्था समाजामध्ये निर्माण झाली. सतीची, बालविवाह इत्यादी पद्धतींना सुरूवात झाली. राजे आणि इतर उच्च वर्गामध्ये बहुपत्नीत्व प्रथा रूढ होती.




ब्रम्हचर्य



गृहस्थ



वानप्रस्थ



संन्यास

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

धार्मिक जीवन: उत्तर वेदकाळात धार्मिक आचरणांचे पालन करणे कठीण झाले.

महाकाव्ये: भारतीयामध्ये अत्यंत लोकप्रिय अशी दोन महाकाव्ये आहेत. वाल्मिकींचे रामायण आणि व्यासांचे महाभारत. या महाकाव्यानी हजारो भारतीयांचे जनजीवन, साहित्य आणि कला घडविल्या आहेत.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1. वेद म्हणजे _____.
2. वेद _____ भाषेत आहेत.
3. आर्ज समाजाच्या प्रमुखाला _____ असे म्हणत.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

4. चार वेद कोणते?
5. चार वर्णांची नावे लिहा.
6. वेद काळातील दोन महिला विद्वानांची नावे लिहा.
7. भारताची प्राचीन महाकाव्ये कोणती? त्यांची रचना कोणी केली?

III. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

8. पूर्व वेदकाळातील समाज आणि उत्तर वेद काळातील समाज यामधील फरक काय?



उपक्रम:

- मुलांचे सचित्र रामायण व महाभारत वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 5 नवीन धर्माचा उदय

I6B3L1

पाठाचा परिचय:

सुमारे 2500 वर्षापूर्वी वैदिक विचारसरणी मध्ये अनेक वेगवेगळे विचार पुढे आले. गौतम बुद्ध आणि महावीर हे दोघे अशा नवीन विचार सरणीचे उद्‌गाते होत. त्यांचे जीवन आणि त्यांची शिकवण याची माहिती येथे दिली आहे. त्याच बरोबर त्यांच्या काळातील सिंधू व गंगा नद्यांच्या खोऱ्यातील सोळा महाजनपद (राजतंत्र) आणि काही गणराज्य (गणतंत्र) कशा प्रकारे कार्यरत होती. याचे विवरण केलेले आहे.

सामर्थ्ये:

1. गौतम बुद्ध आणि महावीर याचे जीवन चरित्र समजून घेणे.
2. गौतम बुद्ध आणि महावीर यांची शिकवण (उपदेश) याचा अर्थ समजून घेणे.
3. बौध्द आणि जैन धर्माची तत्वे किती प्रमाणात आजही उपयुक्त आहेत हे समजून घेणे.
4. 2500 वर्षापूर्वी आस्तित्वात असलेल्या गणराज्य परंपरांचा गौरव करणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2600 वर्षापूर्वी गंगा नदीच्या खोऱ्यात सुमारे 06 नवीन धर्मांचा उदय झाला. यामध्ये जैन धर्म आणि बौद्ध धर्म प्रमुख होत. बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध तसेच जैन धर्माचे संस्थापक वर्धमान महावीर हे दोघेही गणराज्यांचा कुळातील क्षत्रिय होते.

बौद्ध धर्म

गौतम बुद्धानी स्थापन केलेला धर्म म्हणजेच बौद्ध धर्म होय. याची स्थापना सुमारे 2500 वर्षापूर्वी झाली.

बुद्धाचे जीवन: गौतम बुद्धाचा जन्म नेपाळ मधील कपिलवस्तू जवळील लुंबिनी येथे झाला. त्याचे बालपणीचे नाव सिद्धार्थ असे होते. त्यांचे वडील सिद्धोदन हे शाक्य गणराज्याचे प्रमुख होते. आईचे नाव मायादेवी असे होते. सिद्धार्थाच्या पत्नीचे नाव यशोधरा व मुलाचे नाव राहुल असे होते.

एकदा बालपणीच सिद्धार्थला पाहून असित नावाच्या महर्षीनी, हा बालक सर्व लोकांचा राजा होईल. शिवाय लोकांचे दु:ख निवारण करणारा संन्यासी होईल असे भविष्य वर्तविले होते. या महर्षीने सांगितलेली ही भविष्य वाणी ऐकून त्यांचे वडील सिद्धोदन यानी आपला मुलगा राजा व्हावा म्हणून सिद्धार्थला दु:ख, वैराग्य यांचा संबंध येणार नाही. अशा सुख समाधानाच्या वातावरणात सिद्धार्थला वाढविले. परंतु सिद्धार्थचे मन अशांतच होते. -बुध्दगुरूंच्या बालपणातील घटना.

एकदा शहराची प्रदक्षिणा घालताना त्यांना एक वृद्धमाणूस, एक रोगी, एक संन्यासी तसेच प्रेतयात्रा त्यांच्या दृष्टीस पडली. या चार घटनांनी त्यांच्यातील वैराग्य जागवून, दु:खाचे मूळ शोधण्याची प्रेरणा दिली. -हा बुध्दगुरूंच्या कथानकात येणरा अंश.

NOT TO BE REPUBLISHED @KBS

एके दिवशी रात्री सिद्धार्थ कोणालाही न सांगता आपले कुटुंब आणि राजवाडा सोडून घोड्यावरून निघाला. दु:खाच्या निवारणासाठी अनेक गुरुना भेटून त्यांचे मार्गदर्शन मिळविले. परंतु दु:खाचे मूळ कारण काय आहे याचे उत्तर त्यांना मिळाले नाही. शेवटी बिहार मधील गया येथे पोहोचला. तेथे एका वृक्षाखाली बसून अनेक दिवस ध्यान धारणा केली. शेवटी तेथेच त्याना ज्ञानप्राप्ती होऊन सिद्धार्थ हा 'बुद्ध' झाला. बुद्ध म्हणजे ज्ञानी, जाणणारा असा त्याचा अर्थ होतो. बुद्धानी ध्यान केलेले हे स्थळ बुध्दगया म्हणून प्रसिद्ध आहे.

बुद्धानी उत्तर प्रदेशातील वाराणसी जवळील सारनाथ येथे आपल्या पाच शिष्याना पहिला उपदेश केला. या घटनेला 'धर्मचक्र प्रवर्तन' असे म्हणतात. तेथून पुढे त्यानी बिहार आणि सभावेतालच्या प्रदेशात चाळीस वर्षे फिरून लोकांना उपदेश केला. बुद्धांची किर्ती सर्वत्र पसरली. अनेक राजामहाराजानी त्यांचा गौरव केला. शेवटी बुद्धानी बिहार मधील कुशीनगर येथे देहत्याग केला.

बुद्धांचे उपदेश: शुद्ध जीवन आणि चिंतन यांच्या सहाय्याने ज्ञान प्राप्ती करून घेणे हेच बुद्धांचे ध्येय होते. बुद्धानी याला 'धम्म' असे म्हटले आहे. जग प्रचंड दु:खाने भरले असून, आशा हेच दु:खाचे मूळ आहे. आशेवर जे विजय मिळवतील त्याना मोक्षप्राप्ती होईल. दु:ख निवारणासाठी त्यानी उत्तम जीवन, उत्तम संकल्प, उत्तम भाषा, उत्तम कार्य इत्यादी आठ मार्ग सुचविले. या मार्गाना 'अष्टांग मार्ग' असे म्हणतात.

बुद्धाच्या जीवनातील चार महत्वाचे: घटक महापरित्याग, ज्ञानोदय, धर्मचक्र प्रवर्तन व महानिर्वाण हे होत. बुद्धाची मूळ शिकवण म्हणजे चार आर्य सत्य व अष्टांगमार्ग होय. चार आर्य सत्य पुढील प्रमाणे आहेत. जग हे दु:खमय आहे, आशा हेच दु:खाचे मुळ आहे, आशेवर विजय मिळवून दु:खातून पार होऊ शकतो, अष्टांग मार्ग हा दु:ख दूर करण्याचा मार्ग आहे. सिद्धार्थ हे गौतम बुद्ध, तथागत 'शाक्यमुनी' या नावानीही ओळखले जातात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

या शिवाय बुद्धानी आपल्या अनुयायाना हिंसा, मद्यपान, भ्रष्टाचार न करणे, खोटे न बोलणे असा उपदेश केला. बुद्धांचे उपदेश सरळसोपे असल्यामुळे लोकप्रिय झाले. कारण त्यानी आपले उपदेश लोकांची बोली भाषा असलेल्या पाली भाषेमध्ये सांगितले. त्यानी केलेले उपदेश त्याच्या अनुयायानी तीन पिटकामध्ये संग्रह केला. ते म्हणजे विनय पिटक, सुत्त पिटक आणि अभिदम्म पिटक हे होय. बुद्धांच्या पवित्र अशा या ग्रंथाना त्रिपिटक असे म्हणतात.

सिद्धार्थनी राजवाडा सोडण्याचे नदी विवाद हे आणखी एक कारण होते. अशी माहिती आहे. दोन राज्यांच्यामधे नदीच्या पाण्याच्या वाटपावरुन विवाद होऊन सिद्धार्थच्या सल्लागारानी युद्धाला तयार राहण्यास सांगितले. हे सिद्धार्थला पटले नाही. त्याला विरोध करुन त्याने राजवाडा सोडला असे सांगतात. ही डॉ. आंबेडकराच्या पुस्तकातील माहिती आहे.

किसागोतमीला बुध्दांनी दिलेला संदेश: (बुध्दगुरुंशी संबंधीत ही कथा प्रचलित आहे) किसा गोतमीने आपला प्रिय लहान मुलगा गमावला होता. तिला इतके दु:ख झाले होते की ती आपल्या मुलाचा मृत देह घेऊन गल्लोगल्ली फिरून आपल्या मुलाला पुन:र्जिवित करा असा आक्रोश करत होती. तिचे हे दु:ख पाहून एका दयाळू व्यक्तिने तिला बुद्धांच्या कडे घेऊन गेला. बुद्धानी तिला सांगितले तुझ्या मुलाला मी पुन:र्जिवित करीन पण तुला मोहरी आणावी लागेल. पण ती अशा घरातील की ज्या घरात कोणाचाही मृत्यू झाला नाही. बुद्धाचे आश्वासन ऐकून आनंदाने बेभान झालेल्या किसा गोतमीने गावामध्ये मृत्यू न झालेल्या घराचा शोध घेण्यास सुरूवात केली. प्रत्येक घरामध्ये एक नाही तर दुसरा, वडील, आई, बहीण, भाऊ, पत्नी, मुलगा, मामा, आत्या, आजोबा, आजी, असे कोणीतरी मरण पावलेच होते. मरण हे अटळ आहे, सत्य आहे, याची जाणीव होऊन ती बुध्दाच्या शिकवणीचा अवलंब करु लागली.

@NTES NOT TO BE REPUBLISHED

बुध्दानी ग्रंथाची रचना केली नाही. त्यानी केलेले उपदेश त्यांच्या शिष्यानी स्मरणात ठेऊन एकमेकाकडून दुसऱ्याकडे जतन झाले. बुध्दांच्या उपदेशाचा प्राचीन ग्रंथ म्हणजे 'सुत पिटक' होय. हा पाली भाषेत आहे.

जैनधर्म

महावीरांचे जीवन: 24 वे तीर्थंकार असलेल्या महावीरांनी जैन धर्माचा प्रचार केला. महावीरांचा जन्म वैशाली शहराजवळील कुंद या गावी. सुमारे 2500 वर्षापूर्वी झाला. त्यांचे बालपणीचे नाव वर्धमान असे होते. त्यांचे वडील सिद्धार्थ हे एक जमातीचे (कुळ) प्रमुख होते. त्यांचा आईचे नाव त्रिशलादेवी असे होते. वर्धमानने दिव्यज्ञान प्राप्त करण्यासाठी घरातून बाहेर पडले. त्यानी काही काळ सर्वस्व त्याग करून दिगंबर मुनी



महावीर

म्हणून संचार केला. त्यानंतर बारा वर्षे तपश्चर्या करून दिव्य ज्ञान अखेर प्राप्त केले. लोक त्याना 'जीन' म्हणू लागले. जीन म्हणजे मोहावर विजय मिळविलेला असा त्याचा अर्थ होतो. त्यांचे अनुयायी हेच जैन होत. महावीरांनी सर्व वर्गातील लोकांना उपदेश केला. बिहारमधील पावापुरी येथे त्यानी देहत्याग केला.

महावीरांची शिकवण: वर्धमान महावीरांनी हिंसा, चोरी, संपत्तीचा संग्रह करू नये, खोटे बोलू नये असा उपदेश आपल्या अनुयायांना केला. त्याच बरोबर ब्रह्मचर्याचे पालन करण्यास सांगितले. अहिंसेला इतर कोणत्याही धर्मापेक्षा अधिक महत्व जैन धर्माने दिले आहे. महावीरांची शिकवण ही 23 वे तीर्थंकार पार्श्वनाथ याच्या शिकवणीचा भाग होता.

पुढे जैन धर्मामध्ये श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन पंथ उदयास आले. पांढरे वस्त्र परिधान करणाऱ्या पार्श्वनाथाच्या अनुयायाना श्वेतांबर आणि अंगावर वस्त्र न वापरणाऱ्या महावीरांच्या अनुयायांना दिगंबर असे म्हणून ओळखू लागले. कर्नाटकातील श्रवणबेळगोळ हे जैनांचे प्रसिद्ध धार्मिक केंद्र बनले आहे.

जैन धर्मामध्ये 5 नैतिक तत्वे आहेत: अहिंसा, सत्य, अस्तेय, (चोरी न करणे), अपरिग्रह (आवश्यकतेपेक्षा अधिक संग्रह न करणे) आणि ब्रह्मचर्य (इंद्रियाना स्वतःच्या ताब्यात ठेवणे).

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

महाजनपदे आणि गणराजे

महाजनपदे: आता आपण 2500 वर्षापूर्वी काळात जाऊया. तो बुद्धांचा काळ होता. त्या काळात सिंधू-गंगा या नद्यांच्या खोऱ्यात 16 लहान मोठी राज्ये होती. बौद्धांच्या साहित्यात त्याना महाजनपदे असे म्हटले आहे. त्यामध्ये मगध, कोसल आणि वत्स ही प्रमुख महाजनपदे आहेत. येथे राजे राज्य करीत असत.

गणराज्ये: याच काळात अनेक राज्यांमध्ये लोकप्रतिनिधी राज्याचा राज्यकारभार चालवित होते. त्याना गणराज्य असे म्हणत होते.

गणराज्यामध्ये वज्जी (वैजी) हे प्रमुख गणराज्य होते. या गणराज्यामध्ये अनेक लहानमोठ्या गणराज्यांचा समावेश होऊन ते एक गणराज्य बनले होते. बिहारमधील वैशाली शहर ही त्याची राजधानी होती. वज्जी या गणराज्याच्या सर्व लहान थोर सदस्यांची एक सभा बनवून ती सभा या गणराज्याचा कारभार चालवत होती. या सभा सदस्याना राजा म्हणून संबोधले जात असे. सभेमध्ये गणराज्यातील सर्वांच्या संबधित प्रमुख प्रश्नांवर चर्चा करीत असत.

नवीन शब्द

वैराग्य : प्रापंचिक जीवनातील सर्व आशा-आकाक्षांचा त्याग करणे.

दिगंबर : सर्व दिशांनाच आपली वस्त्रे मानणारे.

मोक्ष : जन्म मरणाच्या फेऱ्यातून पार होणे.

हे तूला माहित असू दे

❖ बौद्ध धर्मामध्ये हीनयान व महायान असे दोन पंथ आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. योग्य शब्दांचा वापर करून रिकाम्या जागा भरा.

1. गौतम बुद्धाचा जन्म _____ येथे झाला.
2. बुद्धानी आपला उपदेश _____ या भाषेत सांगितला.
3. जीन म्हणजे _____ वर विजय मिळविलेला होय.
4. _____ हे जैन धर्माचे 23 वे तीर्थंकार होय.
5. जैन धर्मात पांढरे वस्त्र परिधान करणारे हे _____ पंथाचे होय.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

6. गौतम बुद्धाच्या आई-वडिलांचे नाव काय?
7. गौतम बुद्धानी आपला पहिला उपदेश कोठे केला?

8. धर्मचक्र प्रवर्तन म्हणजे काय?

9. महावीरांची शिकवण कोणती?

10. प्राचीन भारतातील प्रमुख गणराज्ये कोणती?

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

11. गौतम बुद्धांची शिकवण.

IV. खालील अ यादी ब यादीतील विषयांच्या जोड्या जुळवा.

अ	ब
1. गौतम बुद्ध	(अ) गणराज्य
2. महावीर	(आ) बुद्धांचे प्रवित्र ग्रंथ
3. वज्जी	(इ) जैनांचे धार्मिक केंद्र
4. श्रवणबेळगोळ	(ई) बौद्ध धर्माचे संस्थापक
5. त्रिपिटक	(उ) 24 वा तिर्थंकार

@KBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- तुमच्या आजूबाजूच्या परिसरातील जैन बस्तीबद्दल माहिती मिळवा.
- जैन बस्तींची चित्रे माहितीसह संग्रहीत करा.

पाठ 6 दक्षिण भारतातील प्राचीन राजघराणी

U5S5U3

पाठाचा परिचय

या पाठामध्ये संगम युगातील अव्दितीय साहित्यिक योगदानाचे वर्णन केले आहे. तसेच दक्षिण भारतातील प्राचीन राजघराणी सातवाहन, कदंब, गंग, बदामी चालुक्य कांचीचे पल्लव, राष्ट्रकूट आणि कल्याणचे चालूक्य यांच्या सांस्कृतिक काम गिरीचे वर्णन केले आहे. होयसळ आणि चोळ राजघराण्यातील महान सम्राटांचा आणि त्यांच्या शिल्पकला आणि साहित्य क्षेत्रातील विशेष योगदानाचा परिचय करून दिला आहे. चोळांच्या ग्राम व्यवस्थापन पध्दतीचे विवरण केले आहे.

सामर्थ्ये

1. संगम साहित्य आणि महाकवी तिरुवळ्ळुवर यांच्याबद्दल जाणून घेणे.
2. सातवाहन, कदंब आणि गंग वास्तुशिल्प मूर्तीशिल्प आणि साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची प्रशंसा करणे.
3. सातवाहन काळातील व्यापार आणि नगरजीवन विषयी समजून घेणे.
4. कदंब काळातील संस्कृतीबद्दल समजून घेणे.
5. बदामी चालूक्य काळातील वास्तुशिल्पाबद्दल समजून घेणे.
6. कांचीच्या पल्लवांचे शिल्पकलेतील योगदान जाणून घेणे.
7. गंगांचे वास्तूशिल्प कलेबद्दल समजून घेणे.
8. राष्ट्रकूटांचे कन्नड भाषेतील योगदान जाणून घेणे.
9. कल्याणचे चालूक्य यांच्या काळातील साहित्य, वस्तूशिल्प याबद्दल समजून घेणे.
10. प्राचीन किल्ले, गड आणि स्मारके ही आपली सांस्कृतिक चिन्हे आहेत. जागरूकतेने आपण त्यांचे संरक्षण केले पाहिजे. हे समजून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

11. होयसळ आणि चोळ यांच्या शिल्पकला, साहित्यातील योगदानाची माहिती घेवून त्याचे महत्व जाणून घेणे.

12. होयसळ विष्णुवर्धन तसेच तिसरा बल्लाळ आणि राजराज चोळ, राजेंद्र चोळ यांचे कर्तृत्व समजून घेणे. होयसळ आणि चोळांशी संबंधीत ऐतिहासिक ठिकाणे नाकाशावर चिन्हांकित करणे.

संगम साहित्य, संगम युग: 'शिलप्पदिगारम्' या प्राचीन तमिळ महाकाव्याची कण्णगी ही कथा नायिका होती. हे महाकाव्य भारतातील सर्वोत्तम साहित्यकृतीतील एक आहे.



महाकवी तिरुवळ्ळूवर

'मणिमेकलै' हे तमिळांचे आणखी एक महाकाव्य आहे. याची कथानायिका 'मणिमेकलै ती कोवलन आणि त्यांची दासी असलेल्या माधवीची मुलगी. तिने पुढे बौद्ध संन्याशी होऊन देशाच्या विविध भागामध्ये भ्रमण केले. गरीब, भुकेलेले, तसेच रोगींना आजारापासून मुक्त केले.

शिलप्पदिगारम् आणि मणिमेकलै ही दोन्ही महाकाव्ये असून या व्यतिरिक्त तमिळ लोकांमध्ये 'तिरुक्कुरळ' हे आणखी एक पुस्तक लोकप्रिय आहे. याचे रचनाकार तिरुवळ्ळूवर. ते संगम युगाचे श्रेष्ठ कवी होत. 'तिरु' म्हणजे 'श्री'. 'कुरळ' याचा अर्थ 'लहान'. कुरळ हे केवळ एका कडव्याचे पद्य असलेतरी ते अर्थाने अतिशय सुशोभित केलेले आहे.

कुरळबद्दल असे सांगितले जाते की, ''सात समुद्रामध्ये असलेले ज्ञान मोहरीच्या बारीक एका कणात समावलेले आहे''.

शिलप्पदिगारम्, मणिमेकलै आणि 'तिरुक्कुरळ' व्यतिरिक्त काही जुन्या काळातील साहित्य कृती आहेत. यांच्या संग्रहाला 'संगम साहित्य' म्हणतात. मदुराईच्या पांड्य राजानी आपली राजधानी मदुराई येथे तमिळ संगम (तमिळु साहित्य संघ) स्थापन करून कवीना आश्रय दिला होता. तसेच समिक्षेसाठी कवींनी त्यांची रचना तमिळ संगमला सादर करण्याची प्रथा होती.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

जवळपास पाच शतके ही साहित्य रचनेची प्रथा चालू होती. या कालखंडाला संगम युग असे म्हणतात. संगम साहित्य कृतीतून त्यावेळेतील राजेशाही चोळ, चेर, आणि पांड्य राजांच्या कारकिर्दिबद्दल आणि या काळातील जीवनाचे चित्रण करतात.

दक्षिण भारतातील प्रमुख राजघराणी

	राजघराणे		राजधानी		श्रेष्ठ राजा
1.	सातवाहण	-	महाराष्ट्रतील पैठण	-	गौतमीपुत्र सातकर्णी
2.	कदंब	-	बनवासी	-	मयुर वर्मा
3.	गंग	-	तलकाडू	-	दूर्विनित
4.	बदामी चाळुक्य	-	बदामी	-	इम्मडी पुलकेशी
5.	पल्लव	-	तमिळनाडमधलि कांची	-	नरसिंह वर्मा
6.	राष्ट्रकुट	-	मान्यखेड	-	अमोघवर्ष नृपतुंग
7.	कल्याण चालुक्य	-	बसवकल्याण	-	सहावा विक्रमादित्य
8.	होयसळ	-	द्वारसमुद्र	-	विष्णुवर्धन
9.	चोळ	-	तमिळनाडूतील तंजावूर	-	राजराजा चोळ

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सातवाहन



प्राचीन काळामध्ये सातवाहन (शातवाहन) हा राजवंश दक्षिण भारतातील कांही भागामध्ये राज्य करीत होता. महाराष्ट्रतील प्रतिष्ठानपूर (आताचे पैठण) ही त्यांची राजधानी (नकाशा पहा).

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गौतमीपुत्र सातकर्णी: सातवाहन वंशाचा प्रमुख राजा म्हणजे गौतमीपुत्र सातकर्णी. याने आपल्या पराक्रमाने शक, यवन व पल्लव या परकीय सत्ताधीशांना हरवून आपल्या साम्राज्यात समावून घेतला. त्याने शककालीन नहपान नाण्यावर स्वत:चे नांव मुद्रित केले. कोंकण, सौराष्ट्र, माळवा, बिरार इत्यादी प्रदेशात आपला राज्यविस्तार केला. त्याला त्रि समुद्रतोय पितवाहन (तीन समुद्राचे पाणी पिणारे घोडे ज्याचे वाहन आहेत) अशी पदवी होती.

धर्म आणि समाज: सातवाहन हे वैदिक धर्माचे अनुयायी होते. अश्वमेधासारखे यज्ञ ते करत असत. त्यांच्या राज्यात स्थायिक झालेल्या परकियांनी स्वत:हून हिंदू किंवा बौद्ध धर्म स्विकारला आणि आपली नावे देवदेवतांच्या नावावरून ठेवली. ते 'शिव' आणि 'विष्णू' यांची पूजा करत. सर्वजण समाजामध्ये एकत्रित नांदत. येथे स्त्रियांना मानाचा दर्जा होता. त्यांच्याकडे मालमत्तेची मालकी होती आणि त्यांनी धर्मदाय संस्थांना भरपूर दान दिले.

साहित्य आणि शिक्षण: प्राकृत भाषा ही सातवाहनांची राज्यभाषा होती. त्यांचे शिलालेख प्राकृत भाषेत आणि ब्रम्ह लिपीत आहेत. हल राजाने प्राकृत भाषेत गाथासप्तशती नावाचा ग्रंथ रचला. गुणाढ्यने वड्डुकथा आणि सर्ववर्मनने कातंत्र व्याकरण कृतीची रचना केली. शिक्षणासाठी अग्रहारांची स्थापना झाली. त्यापैकी शिवमोगा जिल्हयातील ताळगुंद (स्थानकुंडूर) हे शिक्षणाचे महत्वाचे केंद्र होते.


वास्तुशिल्पकलेतील योगदान: सातवाहनानी वास्तुशिल्प कलेला अपार योगदान दिले. त्यांच्या काळात चैत्य, विहार व स्तूपांची निर्मिती केली. चैत्य म्हणजे बौध्दांचे प्रार्थना मंदिर होय. बौध्द भिक्षूक राहत त्याला 'विहार' म्हणत.

सातवाहनांच्या काळात भारी दगड कोरुन चैत्य आणि विहारांची निर्मिती केली. महाराष्ट्रातील कार्ले येथील चैत्य भव्य आहे. तसेच सुंदरही आहे. कण्णेरी येथील चैत्य प्रसिद्ध आहे. चैत्याच्या बाजूलाच कोरून विहाराची निर्मिती केली आहे. आंध्र प्रदेशातील अमरावती येथील अमृतशिला स्तूप कलात्मक आहे. कर्नाटकात सातवाहन काळातील वास्तुशिल्प रचनेचे अवशेष कलबुर्गी, जिल्ह्यातील सन्नती आणि उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवासी येथे पाहू शकतो. सातवाहनांच्या काळामध्ये हजारो नाणी सापडली आहेत.


© KSBS NOT TO BE REPUBLISHED

व्यापार आणि शहरे: सातवाहनांचा काळ आर्थिक समृध्दीचा होता. याचे मुख्य कारण म्हणजेच वेगाने चाललेला अंतर्गत व बाह्य व्यापार होय.

साम्राज्याची काही शहरे व्यापारी केंद्रे होती अशा शहरांना 'निगम' म्हणत.



कार्ले येथील चैत्य (महाराष्ट्र)



अमरावती येथील स्तूपाचा नमुना

महाराष्ट्रातील पैठण, कार्ले, कन्हेरी, जुन्नर आणि नासिक आंध्रप्रदेशातील धान्यकटक (धरणीकोटे) आणि उत्तर कन्नड़ जिल्हयातील वैजयंती (बनवासी) इत्यादी प्रमुख व्यापारी केंद्रे (निगम) होती.

नगरामध्ये 'श्रेणी' नावाचे संघ होते. श्रेणी म्हणजे व्यापाऱ्यांनी आणि विविध कामगारांनी आपल्या हितासाठी स्थापन केलेले संघ होय. उदा: 'धानिक श्रेणी' नावाचा धान्य व्यापाऱ्यांचा संघ होता. अशारितीने तेली, लोहार, सोनार, कुंभार इत्यादी आपापल्या श्रेणी स्थापन केल्या होत्या. श्रेणीत एक वयस्कर असायचा त्यांना 'श्रेष्ठी' अथवा 'सेठ' (शेट्टी) म्हणत.



सातवाहनांची नाणी

श्रेणी हे आधुनिक बँकासारखे आर्थिक व्यवहार करत असत, ते उद्योगधंदे आणि आर्थिक व्यवसायिक व्यवहारांना देखील विशेष समर्थन देत. एका श्रेष्ठीने कार्लेचे प्रसिद्ध चैत्य निर्माण केले होते.

© MSBTE NOT TO BE REPUBLISHED

साम्राज्याच्या पूर्व आणि पश्चिमकिनारपट्टीवर असलेल्या बंदरातून विदेशी व्यापार चाले. पश्चिम किनाऱ्यावरील भरुकच्छ (आताचे बोच), मुंबई-जवळील सोपारा आणि कल्याण ही मुख्य बंदरे होती. पूर्व किनाऱ्यावर सुद्धा अनेक बंदरे होती.

सातवाहनांच्या काळात युरोपातील रोमन साम्राज्या बरोबर भारताचे व्यापारी संबंध उत्तम होते. भारतातून जितक्या वस्तू युरोपात निर्यात केल्या जात होत्या तितक्याच मोबदल्यात सोने आयात केले जायचे. पूर्व किनाऱ्यावरील बंदरातूनही परकिय व्यापार होत असे. परदेशी व्यापारातून सातवाहन साम्राज्याची आर्थिक भरभराट झाली होती.

बनवासीचे कदंब

कदंब राजवंश हे कन्नडचे पहिले राजघराणे होते सातवाहन घराण्यानंतर वायव्य कर्नाटकात यांची भरभराट झाली. कदंब वंशाचा संस्थापक मयुरवर्म हा होता. त्याच्या घराजवळ कदंब वृक्ष होता, त्यामुळे त्यांच्या वंशाला कदंब हे नाव पडले. मयुरवर्म कदंब वंशाचा संस्थापक, तसेच प्रसिद्ध राजा होता. कदंबाची राजधानी उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवासी ही होती. 'सिंह' हे या वंशाचे प्रतिक होते.

मयुर वर्मा

ब्राम्हण असलेला मयुरवर्मा कांचीला जात असताना पल्लवाच्या घोडदळाच्या सेनापतीने त्याचा अपमान केला. अपमान सहन न झाल्यामुळे मयुरवर्मा ब्राम्हणत्व सोडून क्षत्रीय बनला. डोंगर भागातील लोकाना एकत्रीत करुन पल्लवावर आक्रमण केले शेवटी पल्लव राजांनी त्याचे मांडलीकत्व स्विकारले व कर्नाटकातील बराचसा प्रदेश मयुरवर्माला दिला मयुरवर्माने चित्रदुर्ग मधील चंद्रवल्ली जवळील तलावाची दुरुस्ती केली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कदंब काळात प्राकृत, संस्कृत आणि कन्नड या भाषा प्रचलित होत्या. सुरवातीला प्राकृत भाषा आणि नंतर संस्कृत भाषा खूप लोकप्रिय झाली. संस्कृत ही प्रशासनाची भाषा होती. आणि तिचा वापर शिक्षणात केला जात होता. पुढे कन्नड भाषेला अधिक मान्यता मिळाली.



कदंब प्रतिक-सिंह

- हासन जिल्ह्यातील हल्मिडी या गावात कदंबांचा कन्नड भाषेतील अती प्राचीन शिलालेख आढळला आहे.
- शिवमोग्गा जिल्ह्यातील ताळगुंद येये कदंब काळातील संस्कृत शिलालेख आढळला आहे. याची रचना कुब्ज या कवीने केली आहे. कर्नाटकातील सर्वात जुने संस्कृत कवी हेच असून ताळगुंदचा शिलालेख कर्नाटकात सापडलेला पहिला संस्कृत शिलालेख आहे.



हल्मिडी शिलालेख

कदंबानी कर्नाटकातील वास्तुशिल्प आणि मूर्तीशिल्प याला विशेष योगदान दिले. त्यांनी बनवासीमध्ये अनेक मंदिरे बांधली. मधुकेश्वर येथील भगवान 'मधुकेश्वर' हे कदंबांचे कुलदैवत होते. बनवासी येथे परशुरामाची आकर्षक मूर्ती आहे.



बनवासीचे मधुकेश्वर देवालय

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तलकाडूचे गंग




गंगांचे चिन्ह - हत्ती

कर्नाटकाच्या वायव्येला जेंव्हा कदंब राजघराणे राज्य करत होते. तेव्हा दक्षिण कर्नाटकात गंग घराणे भरभराटीला आले. कृषी समुदायाची पर्श्वभूमी असलेल्या गंग घराण्याने कर्नाटकात दीर्घकाळ राज्य केले. त्यांनी सुमारे 650 वर्षे राज्य केले. कोलार (कुवलालपुर) आणि 'तलकाडू' (तलवनपुर) या गंग घराण्याच्या राजधान्या होत्या. कोंगणीवर्म हा गंग घराण्याचा संस्थापक होता. हत्ती गंगाचे प्रतिक होते. दुर्विनित हा गंग घराण्यातील प्रसिध्द राजा होता.

दूर्विनित

सुमारे पंधराशे वर्षापूर्वी राज्य करणारा दुर्विनित हा वीर आणि विद्धान होता. त्याची आई जेष्टादेवी पुन्नाट राजघराण्यातील होती. पुन्नाट राजघराण्यात मुलगा नसल्यामुळे दुर्विनित पुन्नाट राजाचा वारस झाला. त्याने शेजारील शंत्रुंचा पराभव करुन गंग राज्याचा विस्तार केला. पाणी पुरवठ्यासाठी त्याने अनेक तलावे बांधली.



त्यागाचे प्रतिक गोमटेश्वर पुतळा

तो संस्कृत व कन्नड भाषेत विव्दान होता. दूर्विनिताने संस्कृत कवी भारवीच्या किरातार्जुनिया च्या 15 व्या सर्गावर भाष्य (विमर्श) लिहिले. गुणाड्यच्या वड्डकथेचा त्यांनी संस्कृतमध्ये अनुवाद केला. कन्नड प्रमुख गद्य लेखकांपैकी दुर्विनित एक आहेत. असे श्रीविजय आपल्या कविराज मार्ग मध्ये सांगतात. कविराज मार्ग हे कन्नड भाषेतील पहिले उपलब्ध पुस्तक आहे.

दुर्विनित नंतर श्रीपुरुष व रचमल्ल यांनी राज्य केले. रचमल्ल राजाचा प्रधान चाऊंडराय यांनी हासन जिल्हयातील श्रवणबेळगोळ येथे विंध्यगिरी टेकडीवर उभी असलेली जगप्रसिध्द 17.6 मी उंचीची (58 फूट) गोमटेश्वरची मूर्ती बनविली.

साहित्य: गंग राजांपैकी काही विव्दानही होते. दुर्विनित हा संस्कृत आणि कन्नड भाषेत विव्दान होता. श्रीपुरुषाने 'गजशास्त्र' नावाचा ग्रंथ लिहिला. गंगाचा प्रधान असलेल्या चाऊंडरायांनी कन्नडमध्ये 'चाऊंडराय पुराण' ही कृती रचली.

© KSEEB NOT TO BE REPUBLISHED


वास्तुकला आणि शिल्पकला: वास्तुकला आणि शिल्पकले मध्ये गंगाचे योगदान मोठे आहे. मन्नेचे कपिलेश्वर (नेलमंगल तालूका), तलकाडूचे पाताळेश्वर, कोलारचे कोलरम्मा मंदिर, श्रवणबेळगोळ येथील जैन वस्ती, कंबद हळळीची (नागमंगल तालूका) पंचकुट बस्ती. या गंगकालीण महत्वाच्या वास्तु आहेत. श्रवणबेळगोळ येथील 58 फूट उंच असलेली एका दगडातील गोमटेश्वर मूर्ती हे त्यांचे शिल्पकलेतील महत्वाचे योगदान आहे.

बदामीचे चालुक्य

बदामी चालूक्यांनी कर्नाटकात सुमारे 200 वर्ष वैभवात राज्यकारभार केला. बागलकोट जिल्ह्यातील बदामी (वातापी) ही चालुक्यांची राजधानी होती. 'वराह' हे चालूक्याचे प्रतिक होते.



बदामी चालुक्यांचे प्रतिक वराह




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इम्मडी पुलकेशी: बदामी चालुक्य घराण्यामध्ये इम्मडी पुलकेशी हा श्रेष्ठ राजा होता. आपल्या पराक्रमाच्या बळावर त्याने राज्याचा विस्तार करण्यासाठी मोहीम हाती घेतली.

कदंब आणि गंग राजे पुलकेशीला आपणहून शरण आले. उत्तर भारतातील सम्राट हर्षवर्धन व पुलकेशी यांच्यामध्ये नर्मदा नदीच्या काठावर झालेल्या घनघोर युध्दात हर्षवर्धनाचा पराजय झाला. ही महत्वाची घटना होती. पूर्व प्रांतातील कोसल आणि कलिंग राजे युद्धाविना पुलकेशीला शरण आले. दक्षिण भारतातील पुलकेशीने कांचीच्या पल्लवांचा पराभव केला. तेथून कावेरी नदी ओलांडून चोळ, केरळ आणि पांड्य यांचा पराभव केला. या चारी दिशेत विजय मिळवून पुलकेशी वातापीला पोहोचला. त्याचे राज्य अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरलेले होते.

पुलकेशीची किर्ती भारताच्या बाहेर पसरली. त्याने आपला दूतमंडळ परशीयाचा राजा खुस्त्रोकडे पाठविला. त्याच्या सोबत अमूल्य वस्तू व उत्तम हत्ती भेट म्हणून दिला. प्रत्युत्तरादाखल खुस्त्रोने आपला दूतमंडळ पुलकेशीच्या राज्यात पाठविला. अजंठा येथील एका गुहेत असणाऱ्या चित्रामध्ये पुलकेशी आणि त्याची राणी खुस्त्रोच्या राजदूताचे स्वागत करतानाचे चित्र काढले आहे.

चालुक्यांचे वास्तुशिल्प: बदामी, ऐहोळे, पट्टदकल, महाकूट आणि नागराळ ही बदामीचे चालुक्य यांची प्रमुख वास्तुशिल्प केंद्रे आहेत. ऐहोळे आणि बदामी येथे चालुक्य काळातील गुहालये आहेत.



बदामीचे गुहालय

© KSBS NOT TO BE REPUBLISHED



नटराज बदामीचे गुहालय

ऐहोळेच्या देवालयामध्ये सूर्य (लाडखान), मेगुती, कार्तिकेय (हुच्चीमल्ली) आणि दुर्गा अशी मुख्य देवालये असल्यामुळे ऐहोळेला 'देवालयांच्या वास्तूशिल्पांचा पाळणा' असे म्हणतात. बदामीच्या गुहेत असलेल्या नटराज आणि विष्णूची मूर्ती अद्‌भूत आहे.

पट्टदलकल येथील देवालयामध्ये विरुपाक्ष देवालय सुंदर व भव्य आहे. आतासुध्दा हे एक विश्वपरंपरेच्या श्रेणीतील मंदीर आहे.



शेषनागावर विराजमान विष्णू, बदामी देवालय



विरूपाक्ष देवालय, पट्टदकल्ल

© CRTS NOT TO BE PUBLISHED

नवीन शब्द:

विश्वपरंपरेची स्मारके- जगातील काही अपूर्व, अमूल्य स्मारके विश्वपरंपरेत समविष्ठ केलली आहेत अशी घोषणा युनेस्कोने केली आहे यांना विशेष संरक्षण आहे. कर्नाटकातील हंपी पट्टदकल्लू आणि बेलुरु. हळेबीडू. सोमनाथपुर मधील होयसळांच्या पवित्र डिकाणांचा यात समावेश आहे.

कांचीचे पल्लव

पल्लव घराणे हे दक्षिण भारतातील एक प्रसिद्ध घराणे होय. तमिळनाडू मधील कांची ही पल्लवांची राजधानी होती. त्यांनी सुमारे 300 वर्षे राज्य केले.

नरसिंहवर्मा: पल्लवांमधील नरसिंहवर्म हा श्रेष्ठ राजा होता. नरसिंहवर्मला महामल्ल ही पदवी होती. पराक्रमी नरसिंह याने बदामी चालुक्यावर हल्ला करून इम्मडी पुलकेशीचा पराभव केला व बदामी ताब्यात घेतले. या विजयाची आठवण म्हणून 'वातापीकोंड' ही पदवी धारण केली. नरसिंहवर्मने मामल्लपूर (आताचे महाबलिपुरम्) येथील 'रेवू' नगराचे सुंदर शहरात रूपांतर केले.

पल्लवांचे शिल्पकलेतील योगदान: शिल्पकलेला पल्लवांनी अमूल्य योगदान दिले. महाबलीपुरम् येथील नरसिंहवर्मच्या काळातील आठ एकशिला दगडी रथ यांची साक्ष देतात. जगप्रसिद्ध असे हे रथ एकेका दगडात कोरलेले आहेत. महाबलिपुरम् येथे 'गंगावतरण' हे फुगीरदर्शनी शिल्प आहे. या चित्रात भगिरथाने तपस्या करून गंगेला जमिनीवर आणण्याचा प्रयत्न केलेले दृष्य आहे. हे एक प्रसिद्ध फुगीरदर्शनीशिल्प आहे.

पल्लवांनी भव्य देवालयांची निर्मिती केली. त्यापैकी महाबलीपुरमच्या समुद्र किनाऱ्यावरील शिव देवालय एक होय. पल्लवांनी निर्माण केलेली आणखी दोन प्रसिद्ध देवालये म्हणजे कांचीमधील कैलासनाथ आणि वैकुंठ पेरुमाळ देवालय होत.



महाबलीपुरम देवालय

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्द:

उब्बूशिल्प- फुगीर भागावर केलेले नक्षीदार काम.

राष्ट्रकूट



राष्ट्रकूटांचे प्रतिक

बदामी चालुक्यांच्या नंतर राष्ट्रकूट घराणे आधिकारावर आले. राष्ट्रकूटांच्या काळातील लक्षात राहण्यायोग्य कविराजमार्ग, आदिकवी पंप आणि एल्लोरचे कैलास देवालय हे होत.

- 'कविराजमार्ग' हा कन्नडमधील सर्वप्रथम लक्षणग्रंथ राष्ट्रकूटांच्या काळातील आहे. याची रचना श्रीविजय यांनी केली. हा आतापर्यंत मिळालेल्या कन्नड ग्रंथामधील अतिप्राचीन ग्रंथ होय. हा नवव्या शतकातील ग्रंथ आहे.

प्रसिद्ध चक्रवर्ती

- **तिसरा गोविंद:** तिसरा गोविंद हा राष्ट्रकूट घराण्यातील श्रेष्ठ राजा होता. याने दक्षिण भारतात सगळीकडे प्रभुत्व मिळविले. नंतर हिमालयाच्या पायथ्यापर्यंत यशस्वी आक्रमण केले. या महान कार्याचा उल्लेख केलेल्या शिलालेखावर ''गोविंदाच्या युध्दातील हत्तीनी गंगानदीच्या पुण्यतिर्थाची चव पाहिली'' असा मनमोहक उल्लेख त्याच्या संस्थानातील कवीने केलेली आहे.

- **अमोघवर्ष नृपतुंग:** अमोघवर्ष नृपतुंग मुम्मडी गोविंदाचा मुलगा वयाच्या 14 व्या वर्षी तो गादीवर बसला. त्याने सुमारे 60 वर्षापेक्षा जास्त काळ राज्यकारभार केला. तो स्वत: विद्वान होता. 'श्रीविजय' हा विद्वान त्याच्या दरबारात होता.

  अमोघवर्ष नृपतुंगला आपल्या प्रजेचे हीत पाहणे फार आवडत असे. त्याने मान्यखेड नगर (सध्याचे मळखेड, जिल्हा कलबुर्गी) निर्माण केला. ती राष्ट्रकूटांची राजधानी होती. त्या काळातील चार विशाल साम्राज्यापैकी राष्ट्रकूटाचे साम्राज्य एक होते. असा उल्लेख विदेशी प्रवासी सुलेमान याने केला आहे. (इतर तीन म्हणजे रोमन, अरब आणि चिनी साम्राज्य.)

- **तिसरा कृष्ण:** तिसऱ्या कृष्णाच्या काळात राष्ट्रकूटांचे साम्राज्य पुन्हा भारतीय राजकियदृष्ट्या अग्रस्थानी आले. कृष्णाने चोळांचा पराभव केला. रामेश्वरपर्यंत आपली विजय पताका फडकविली. या विजयाची आठवण म्हणून तेथे विजय स्तंभ आणि देवालयाची स्थापना केली. शिवाय याने पांड्य, चेर यांचा पराभव केला. सिंहळच्या राजाकडून खंडणी संग्रहीत केली. एवढेच नाही तर तिसऱ्या गोविंदाप्रमाणे उत्तर भारतात अत्यंत यशस्वी आक्रमण केले.

  कवी पोन्न हा कृष्ण राजाच्या आश्रयाला होता. तिसऱ्या कृष्णाच्या नंतर राष्ट्रकूट घराण्याला उतरती कळा लागली.

लक्षणग्रंथ म्हणजेच भाषा, शैली, छंद इत्यादी लक्षणे विवरण केलेला ग्रंथ.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पंप: पंप कन्नडमधील श्रेष्ठ कवी. त्यांनी कन्नडमधील पहिले महाकाव्य रचले. म्हणून त्यांना 'कन्नड आदिकवी' म्हणतात. पंपानी पूर्वी रचलेल्या कविता आजवर उपलब्ध नाहीत. पंप हे राष्ट्रकुट मांडलिक वेमुलवाद अरिकेसरीच्या दरबारात होते. 'आदिपुराण आणि विक्रमार्जुन विजय' ही पंपाची महान महाकाव्ये आहेत. कन्नडमधील प्रमुख कवींच्यावर पंपांचा फार प्रभाव होता. त्या काळातील पोन्न हे आणखी एक मुख्य कन्नडकवी होत.

पंप हा वेमुलवाड येथील मांडलिक अरिकेसरीच्या दरबारात होता.

एल्लोर आणि एलिफंटा



एल्लोरचे कैलास देवालय



महेशमूर्ती, एलिफंटा, याला त्रिमूर्ती असे म्हणतात.

एल्लोरचे कैलास देवालय शंभर फूट उंच दगडात कोरलेले एकशिला देवालय आहे. याची निर्मिती करण्याचे श्रेय राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण याला जाते. जगात यासारखे वास्तुशिल्प कुठेही पाहायला मिळत नाही. येथील मूर्तीशिल्प पाहणे हा सुखद अनुभव असतो. वास्तुशिल्पात रावणाने कैलास पर्वत उचललेली कथा, हा प्रसंग रमणीय आहे.


राष्ट्रकूटांच्या साम्राज्यात आताचा महाराष्ट्रातील बराचसा भाग समाविष्ट होता. एल्लोर आणि एलिफंटा महाराष्ट्रात आहेत.

राष्ट्रकूटांचे मूर्तीशिल्प कलावैभव एलिफंटा गुहामध्ये पाहू शकतो. एलिफंटा गुहा मुंबई बंदराजवळील एका बेटावर आहेत. येथील भव्य आकाराची तीनमुखी महेशाची मूर्ती विस्मयकारक आहे.

NOT TO BE RE

राष्ट्रकूटांचे साम्राज्य

(9 वे शतक)



NOT TO BE REPUBLISHED @KTBS

कल्याणचे चालुक्य

राष्ट्रकुटानंतर चालुक्य वंश पुन्हा एकदा सत्ताधिकारी बनले. बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण ही त्यांची राजधानी.

सहावा विक्रमादित्य: सहावा विक्रमादित्य हा कल्याणचे चालुक्य या वंशातील श्रेष्ठ चक्रवर्ती राजा होता. याच्या प्रदीर्घ राज्यकारभाराच्या काळात कर्नाटक राज्य प्रगतीपथावर आले. त्याने अधिकारावर आलेली आठवण म्हणून चालुक्य विक्रम शकाची सुरुवात केली. विक्रमादित्याने अनेक विद्वानांना आश्रय दिला. याच्या आश्रयाला असलेल्या पंडित बिल्हणने 'विक्रमांकदेवचरित' या महाकाव्याची रचना केली. यात विक्रमादित्याचा जीवन वृतांत आहे. विज्ञानेश्वर हा आणखीन एक श्रेष्ठ विद्वान होय. याने 'मिताक्षर संहिता' या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ हिंदू कायदा पद्धतीचा प्रमाण ग्रंथ म्हणून प्रसिध्दीस आला.

मुम्मडी सोमेश्वर: विक्रमादित्यानंतर त्याचा मुलगा मुम्मडी सोमेश्वर यांच्या काळामध्ये साम्राज्यात शांती, समृद्धी नांदत होती. राजा साहित्य व कलेचा भोक्ता होता. त्याने मानसोल्लास या प्रसिद्ध संस्कृत ग्रंथाची रचना केली, यात सर्व शास्त्रांचा समावेश आहे. सोमेश्वर हा महान विद्वान होता. 'सर्वज्ञ चक्रवर्ती' या नावाने तो प्रसिद्ध होता.

साहित्य: कल्याणचे चालुक्य यांच्या काळात साहित्याला फार प्रोत्साहन मिळाले.

- कवी चक्रवर्ती अशी पदवी मिळालेल्या रन्नने 'साहसभीमविजय' अथवा 'गदायुद्ध' या वीर काव्याची रचना केली. पंप, पोन्न आणि रन्न यांना कन्नड साहित्यातील त्रिरत्न असे म्हणतात.
- वचन साहित्य हे चालुक्यांच्या काळातील विशिष्ट योगदान होय. वचनकारांनी साध्या, सोप्या कन्नडमध्ये वचनांची रचना केली.

जेडर दासीमय्य, बसवण्णा, अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, चन्नबसवण्णा सिद्धराम, मडिवाळ माचय्य, इत्यादी त्या काळातील प्रसिद्ध वचनकार होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

वास्तुशिल्प: कल्याणचे चालुक्य यांच्या काळात अनेक देवालयांची निर्मिती करण्यात आली. तशी ती ललित कलेची केंद्रे होती. कोप्पळ जिल्ह्यातील इटगीचे 'महादेव देवालय' त्या काळातील अत्युत्तम वास्तुशिल्प होते. याचे वर्णन तेथील शिलालेखावर 'देवालयांचा चक्रवर्ती' असे केले आहे.



महादेव देवालय-इटगी

NOT TO BE REPUBLISHED

कालगणना (सा.श)

राष्ट्रकूटांच्या साम्राज्याचा काळ	-	सुमारे 750 ते 950
कल्याण चालुक्यांचा साम्राज्याचा काळ	-	सुमारे 970 पासून 1150
तिसरा गोविंद	-	793 पासून 814
अमोघवर्ष नृपतुंग	-	814 - 878
मुम्मडी कृष्ण	-	939 - 967
सहावा विक्रमादित्य	-	1076 - 1127
चालुक्य विक्रम शके	-	1076
मुम्मडी सोमेश्वर	-	1127 - 1137

होयसळ



होयसळांचे प्रतिक

माविनकेरे शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या शिक्षकांनी बेलूरचा चन्नकेशव देवालय पहाण्याचा निर्णय घेतला आणि जेव्हा बसमधून देवालयाच्या समोर येवून थांबाले तेव्हां त्यानी काय पाहीले? पहाटेच्या सूर्यप्रकाशात नयनमनोहर देवालयाचे दृष्य पाहीले.


शिक्षक : मुलांनो हे होयसळांचे विश्वविख्यात देवालय. या मंदिराची दोन वैशिष्टये म्हणजे. ते उंच व्यासपीठावर (जगली) बांधलेले आहे आणि व्यासपीठाचा आकार नक्षत्राकार आहे.

विद्यार्थी : मंदिर व्यासपीठावर का बांधले आहे?

शिक्षक : कारण मंदिराची भव्यता पाहताना डोळ्यांना उठून दिसण्यासाठी आणि सदाकाळ स्मरणात राहण्यासाठी बांधलेले असते.

विद्यार्थी : व्यासपीठ नक्षत्राकाराचे का आहे?

शिक्षक : केवळ व्यासपीठ नाही तर भिंती, गर्भगृह आणि शिखर देखील नक्षत्राकाराचे आहेत. नक्षत्र आकाराच्या भिंतीच्या पृष्ठभागामुळे प्रकाश आणि सावलीच्या खेळाला अतिशय प्रभावीपणे वाव मिळतो. परिणामी शिल्पे तीक्ष्ण आणि बाहेरून अधिक प्रक्षेपित दिसतात.




बेलूरचे चन्नकेशव देवालय

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

होयसळांनी असंख्य देवालये चुनखडीच्या मऊ दगडाचा वापर करून रचली आहेत. शिल्पकारांनी अलंकरणावर अधिक भर दिला आहे. मंदिराच्या बाहेरच्या खालच्या भागात हत्ती, घोडेस्वार, लतातोरणे, सिंहाचे चेहरे अशा फुगीर कोमल पट्ट्या आहेत. सूक्ष्म कलाकुसरीत होयसळांच्या शिल्पकारांची बरोबरी कोणीही करू शकत नाही.

विद्यार्थी : गुरुजी आता आपण देवालयात जाऊया का?

शिक्षक : हो ! अवश्य. आत या, हे 'नवरंग'. पूजा काळातील संगीत, नृत्य या सारख्या कलासेवेचे असलेले ठिकाण. नवरंगाच्या चारी खांबाकडे लक्ष द्या, हे खांब चरकी यंत्रापासून (Lathe Turned) बनविलेले आहेत. ते आरशाप्रमाणे चकाकत नाहीत का? नवरंगाच्या नाजूक कोरीव छताकडे पहा. तिला भुवनेश्वरी म्हणतात. हे अद्‌भूत आहे ना!



भुवनेश्वरी बेलूर

मुलानो, अजून आत या. हे मंदिराचे गर्भगृह आहे. येथून मनमोहक विजयनारायणाची मूर्ती पहा, बेलूर देवालयाचे मुख्य आकर्षण म्हणजे मदनिका शिल्पे आणि वेगवेगळ्या आसनामध्ये नाजूक पणे कोरलेल्या स्त्रीमूर्ती आहेत.



मदनिका

विद्यार्थी : होयसळ मंदिरे ही एक प्रसिद्ध शिल्पकार 'जकणाचारी' यांची हस्तकला होती असे लोक म्हणतात. त्यांच्याबद्दल सांगा.

शिक्षक : आपल्याला त्यांच्याबद्दल काहीही माहिती नसली तरी त्यांच्या बद्दल एक अख्यायिका प्रसिद्ध आहे.

जकणाचारी: जकणाचारी यांनी आपली पत्नी आणि मुलगा यांना सोडून गावोगावी भटकंती करून अनेक मंदिरे बांधण्यात अनेक वर्षे घालविली. एकदा होयसळांच्या राजधानीत मंदिर बांधत असताना त्यांचा मुलगा डंकणाचारी वडिलांच्या शोधात तेथे आला. तोही आता शिल्पकलेत निपुण झाला होता. मंदिरात प्रतिस्थापनेसाठी जकणाचाऱ्यानी तयार केलेली मूर्ती त्याला दिसली. डंकणाचारीने त्या मूर्तीत त्रुटी असल्याचे सांगितले. तेव्हा जकणाचारीनी त्रुटी असल्यास मी माझे हात कापून टाकेन असे वचन दिले. त्यानंतर डंकणाचाऱ्यांनी मुर्तीच्या पोटावर चंदनाचा लेप लावला. लेप सुकल्यावर नाभी भोवतीची जागा ओली राहिली. जेव्हा नाभीचे क्षेत्र उघडले तेव्हा ते पोकळ असल्याचे आढळले. आणि त्यात थोडे पाणी, वाळू आणि बेडूक हे असलेले पाहून जकणाचाऱ्यांनी पटकन आपला हात कापला. या दुर्घटनेनंतरच दोघे पितापुत्र असल्याचे समजले. पुढे जकणाचाऱ्यांनी आपल्या गावी एका हाताने केशव मंदिर बांधले. ते पूर्ण होत असतानाच त्याचा हात पूर्वीसारखा वाढला म्हणे!

शिक्षक : उशीर होत आहे चला जाऊया.

विद्यार्थी : ठीक आहे गुरुजी. होयसळ शैलीची शेकडो मंदिरे आहेत. त्यापैकी हसन जिल्ह्यातील बेलूर आणि हळेबिडू तसेच म्हैसूर जिल्ह्यातील सोमनाथपूर देवालय अत्यंत प्रसिद्ध आहेत. बहुतेक होयसळ मंदिरे हासन, तुमकूर आणि मंडया जिल्ह्यात आहेत.



केशव देवालय, सोमनाथपूर

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

हळेबीडू येथील विशाल प्राचीन तलाव 'दोरसमुद्र' या नावावरून त्यांच्या राजधानीला दोरसमुद्र असे संबोधन्यात आले. अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफर (कपूर) याने 1310 मध्ये दोरसमुद्र ताब्यात घेतले. पुन्हा होयसळांना दोरसमुद्र ताब्यात घेता आला नाही. दोरसमुद्राचे आताचे नांव 'हळेबीडू' होय.

होयसळांनी दक्षिण कर्नाटकात आणि तमिळनाडूच्या भौगोलिक प्रदेशाचा समावेश असलेल्या विशाल प्रदेशात 300 वर्षापेक्षा जास्त काळ वैभवपूर्ण कारभार केला. पहिल्यांदा बेलूर व नंतर दोरसमुद्र ही त्यांची राजधानी होती. वाघाला ठार मारणाऱ्या 'सळाचे चित्र' हे होयसळाचे प्रतिक होते.

होयसळ राजवंशाचे प्रमुख राजे


- **विष्णुवर्धन:** विष्णुवर्धन होयसळ राजवंशाचा प्रमुख राजा होता. त्याने चोळ आणि पांड्यांचा पराभव करून त्यांच्या ताब्यात असलेला कन्नड प्रदेश जिंकून घेतला. त्यांनी जैन धर्माचे आचरण केले. त्यानंतर 'श्री वैष्णव' धर्म स्विकारला. त्याची राणी शांतलेने जैन धर्माचे आचरण पुढे चालू ठेवले. धर्मसंहिष्णू असलेल्या विष्णुवर्धनाने शैव व जैन धर्माना अपार प्रोत्साहन दिले.

- **तिसरा बल्लाळ:** तिसरा बल्लाळ हा होयसळ घराण्यातील शेवटचा प्रमुख राजा होता. त्याने 50 वर्षे दिर्घकाल राज्यकारभार केला त्याच्या काळात दिल्लीच्या सुलतानांनी वारंवार दक्षिण भारतावर आक्रमण केले. देवालयांची नासधूस केली येथील संपत्तीची लूट केली. आक्रमणामुळे होयसळ तसेच दक्षिण भारतातील प्रमुख राजघराणी अस्ताला गेली.

पण सुलतानना होयसळ राज्य जिंकता आले नाही. या भयंकर परिस्थितीचा तिसरा बल्लाळ याने एकेरी समर्थपणे प्रतिकार केला.

यावेळी दिल्लीच्या सुलतानाचा प्रतिनिधी असलेल्या मथुरेच्या सुलतानाचे क्रौर्य वाढले. वय झालेला बल्लाळ त्यांना धडा शिकविण्यास गेला. परंतु युद्धात सुलतानाकडून फसवणूकीने क्रूरपणे मारला गेला. बल्लाळ तिसरा एकमेव असा राजाया होता जो परकिय आक्रमणाच्या अंधारमय काळात तेजस्वी ताऱ्याप्रमाणे प्रकाशीत झाला होता. यानंतर त्याचा मुलगा चौथा बल्लाळ सा. श. 1346 मध्ये मदुराईच्या सुलताना कडून मारला गेला यासह होयसळ राजवंशाचा अंत झाला. पण तोपर्यंत विजयनगर साम्राज्याची स्थापना झाली होती.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS



© BKTBS NOT TO BE REPUBLISHED

होयसळांचे कन्नड साहित्यातील योगदान

जन्न, हरिहर आणि राघवांक हे होयसळ काळातील श्रेष्ठ कवी होते. जन्न हा त्या काळातील महान कवी होता. त्याला कवीचक्रवर्ती ही उपाधी दिली होती. हरिहर यांनी रगळे (रागयुक्त) आणि महाकाव्ये लिहिली. राघवांकाने अनेक काव्ये रचली. यामुळे भाषेच्या विकासातील नवीन दालने मोकळी झाली.

अंडय्या यांनी कन्नडमध्ये अप्रतिम कृती रचना केल्या. याच काळात बसवेश्वर आणि इतर शरणांनी वचने लिहून कन्नड साहित्य संपत्तीमध्ये भर घातली.

कवी आणि काव्य: जन्न - 'यशोधर चरित'; हरिहर - 'गिरीजा कल्याण'; राघवांक - 'हरिश्चंद्र काव्य'; अंडय्या - 'कब्बीगर काव्यं'.

चोळ



चित्र 1



चित्र 2

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चोळांच्या काळातील वरील कास्यशिल्पे ओळखू शकाल?

ते नटराज आणि कालिया मर्दन करणारा बालकृष्ण आहेत. कास्यशिल्प हे चोळांनी भारतीय मूर्ती शिल्पकलेला दिलेले अपार योगदान होय.

कास्य हे तांबे आणि कथील धातूंचे मिश्रण आहे. कास्य कठीण आणि चमकदार असते. साच्यात गरम कास्य द्रव टाकून ब्राँझच्या मूर्ती बनवल्या जातात. ही पध्दत आजही वापरली जाते.

चोळांनी वास्तुशिल्प क्षेत्रातही विशेष योगदान दिले आहे. चोळांनी तंजावूरमध्ये निर्माण केलेले बृहदीश्वर देवालय जगप्रसिद्ध आहे. याची निर्मिती एक हजार वर्षापूर्वी झाली होती.

बृहदीश्वर देवालयाच्या कळसाकडे लक्ष द्या. कळस म्हणजे देवालयाच्या गाभाऱ्याचा वरचा भाग. या देवालयाच्या गाभाऱ्यावरील कळस तेरा मजली असून आभाळाला भिडल्याप्रमाणे वाटतो. कळसाची उंची 61 मी. (200 फूट) आहे, बृहदीश्वर हे भारतातील सर्वात उंच व भव्य देवालय आहे. याचा समावेश जागतिक वारसा स्थळ म्हणून केलेला आहे.




बृहदीश्वर देवालय, तंजावूर

सर्व शिवालयांच्या समोरील भागात नंदीची मूर्ती असणे हे वास्तुशिल्पाचे एक वैशिष्टय आहे. येथील नंदीची मूर्ती ही दक्षिण भारतातील सर्वात मोठी मूर्ती आहे. चोळांच्या काळातील आणखी एक भव्य देवालय गंगैकोंड चोळपुरम येथील शिवमंदिर होय.

भारतीय रिझर्व्ह बँकेने 2010 मध्ये 'सहस्त्रवर्ष पूर्ण झालेले बृहदीश्वर देवालय' या नावाने 1000 रु किंमतीचे नाणे चलनात आणले आहे.

प्रमुख चोळ राजे

चोळांनी दक्षिण भारतात प्रबळ राजकीय शक्ती म्हणून सुमारे चार शतके राज्य केले. तंजावूर (तमिळनाडू) ही चोळांची राजधानी होती. चोळ साम्राज्यात राजराजा चोळ आणि राजेंद्र चोळ हे प्रमुख होते.



© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

- **राजराजा चोळ:** राजराजा हा पराक्रमी व दक्ष राजा होता. त्याचे विशाल साम्राज्य तुंगभद्रा नदीच्या व दक्षिणेकडील सर्व प्रदेशात, श्रीलंका आणि मालदीव पर्यंत पसरले होते. साम्राज्याच्या रक्षणासाठी शक्तीशाली भूसेना व नौकादलाची उभारणी केली. बृहदीश्वराच्या भव्य देवालयाची निर्मिती राजराजा चोळ याची देणगी आहे.

- **राजेंद्र चोळ:** राजराजा नंतर त्याचा मुलगा राजेंद्र चोळ हा चोळ साम्राज्याचा उत्तराधिकारी झाला. उत्तर भारतातील आक्रमण ही त्याची विशेष साधना होय. त्याने विजयाच्या आठवणीसाठी 'गंगैकोंड' ही पदवी धारण केली. तसेच 'गंगैकोंड चोळपुरम' ही नवीन राजधानी व तेथे एक भव्य देवालय निर्माण केले. राजधानीच्या जवळ पाणीपुरवठ्यासाठी उपयुक्त 'चोळगंगम' नावाचा भव्य असा तलाव तयार केला.

अग्नेय आशियातील सुमात्रा येथील श्रीविजय याचे राज्य जिंकले हे राजेंद्र चोळचे आणखी एक महान कार्य आहे.

साहित्य: चोळांच्या काळात तमिळ साहित्य आणि संस्कृतीचा सुवर्णकाळ होता. त्यांच्या काळात भक्ती साहित्यामध्ये भरभराट झाली. 'पेरियपुराणम' याचे भक्ती साहित्यामध्ये प्रमुख स्थान होते. त्या काळातील कंबन याने लिहिलेले रामायण आजही लोकप्रिय आहे.

ग्रामीण कारभार: चोळांच्या काळात ग्रामीण कारभाराची पद्धत आदर्शवत होती. गावचा कारभार त्याच गावातील ग्रामसभेचे निवडलेले सदस्य चालवित असत. ग्रामसभा सदस्यांची निवड केली जात होती. काही सदस्यांचा समावेश असलेल्या समितीची रचना करून ठराविक कार्य निवडत असत. समितीचे अर्थविषयक हिशोब त्या समितीला द्यावे लागत असे. भ्रष्ट सदस्यांना ग्रामसभेतून काढून टाकत. चोळांच्या काळातील ग्राम कारभाराची व्यवस्था सामान्यपणे आताच्या पंचायती व्यवस्थेप्रमाणे होती.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

भारतावर राज्य केलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यानी चोळांच्या दक्ष कारभाराची प्रशंसा केली. चोळांच्या काळातील गावाना 'लहान गणराज्ये' म्हणून संबोधले गेले.

उपक्रम: चोळांच्या काळामधील ग्रामीण कारभार आणि सध्याची ग्रामपंचायत व्यवस्था यामध्ये असणाऱ्या समान वैशिष्ट्यांविषयी लिहा.

व्यापार: चोळांचे साम्राज्य समृद्ध होते. परकीय व्यापार चांगला चालला होता. चोळांनी चीन, सुमात्रा, जावा आणि अरेबिया इ. देशांशी व्यापारी संबंध ठेवले होते. व्यापारी संघटना देशांतर्गत आणि देशाबाहेरील व्यापारी व्यवहार चालवत होत्या.

कालगणना (सा.श.)

चोळांच्या राजवटीचा काळ	-	सुमारे 850 - 1200
राजराजा चोळ	-	985 - 1014
होयसळांच्या राजवटीचा काळ	-	1006-1346
राजेंद्र चोळ	-	1015 - 1044
विष्णूवर्धन	-	सुमारे 1108 - 1141
तिसरा बल्लाळ	-	सुमारे 1291 - 1343
विजयनगरची स्थापना	-	1336

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

हे तुम्हाला माहित असू द्या.

- तिरुक्कुरळमध्ये 1300 श्लोक आहेत. यामध्ये अनेक नितिवाक्ये आहेत. धर्म म्हणजे निष्कलंक मन. सर्व मानव जन्माने समान आहेत. राजाला विजय मिळवून देणारा भाला नसून त्याचा नि:पक्षपाती राज्यकारभार होय.
- संगम साहित्याच्या रचनेची सुरुवात 2300 वर्षापूर्वी झाली आणि पुढे सुमारे 500 वर्षे अशीच सुरु होती.

- ❖ वैजयंती या नावाने बनवासी ही सातवाहनांची प्रांतीय राजधानी होती. सातवाहन काळात प्राकृत ही लोकप्रिय भाषा होती.
- ❖ सातवाहनांनी सुमारे 2300 वर्षापूर्वीपासून राज्य केले आणि ते सुमारे चार शतके सुरु राहिले होते.
- ❖ कदंबांची कारकीर्द 1650 वर्षापूर्वी सुरु झाली. त्यांनी सुमारे 190 वर्षे राज्य केले. हल्मिडी आणि ताळगुंद शासन सुमारे 1550 वर्षापूर्वीचे आहेत.
- ❖ गंगांच्या काळात शेतजमिनीचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्यात आला. गंगराजाने तलावांची निर्मिती केली आणि त्यामुळे शेतीसाठी त्याचा उपयोग झाला. सामान्यपणे प्रत्येक 'गावासाठी एक तलाव' असायचा. भात, नाचणा आणि कापूस ही मुख्य पिके होती. पशुपालन मोठ्याप्रमाणत करत. म्हैशी, गायी, घोडे, कुक्कुटपालन (बैल, गाय, घोडे, कोंबड्या) हे राज्यात जास्त प्रमाणात पाळत असत.
- ❖ गंगांच्या काळात काही महिला अधिकारी होत्या. ते स्वतःहून देणगी देत असत. सत्यनिष्ठा, स्वामीनिष्ठा, शौर्य आणि संयम ही या काळातील सामाजिक मूल्ये होती.
- ❖ श्रवणबेळगोळ येथील छोट्या टेकडीवर चंद्रगुप्त बस्ती आहे. ती चंद्रगुप्त मौर्य यांनी बांधली. त्या छोट्या टेकडीला 'चंद्रगिरी' म्हणतात. तर मोठ्या टेकडीला 'इंद्रगिरी' असे म्हटले जाते.
- ❖ कर्नाटकातील कार्कळ (उडुपी जिल्हा), वेणूरु (दक्षिण कन्नड), गोम्मटगिरी (म्हैसूर जिल्हा), बस्तीहळळी (मंडया जिल्हा) आणि इतर ठिकाणी गोमटेश्वराच्या प्राचीन मूर्ती आहेत. धर्मस्थळ येथील गोमटेश्वराच्या मूर्तीचे शिल्पकार कार्कळ येथील रंजाळ गोपाळ शेणै हे आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. तिरुक्कुल्लची रचना _____ यांनी केली.
2. संगम काळातील महान कवी _____ होते.
3. सातवाहन वंशाचा प्रसिद्ध राजा _____.
4. कदंबांची राजधानी _____ होती.
5. कन्नड मधील सर्वात जुना शिलालेख _____.
6. उत्तर भारतातील _____ सम्राटाचा पराभव इम्मडी पुलकेशी यांनी केला.
7. देवालय वास्तुकलेचा पाळणा असे _____ ठिकाणाला म्हणतात.
8. श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराची मूर्ती _____ यांनी निर्माण केली.
9. गंग घराण्याचा प्रसिध्द राजा _____.
10. चाऊंडरायानी _____ साहित्य कृतीची रचना केली.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

11. शिलप्पदिगारम् या महाकाव्याची कथा नायिका कोण होती?
12. संगम काळातील दोन महाकाव्यांची नावे सांगा.
13. 'चैत्य' म्हणजे काय?
14. सातवाहन काळातील 'चैत्य' कोठे आहेत?
15. कर्नाटकात सातवाहन काळातील शिल्पकलेचे अवशेष कोठे आढळतात?
16. 'श्रेणी' म्हणजे काय?
17. कदंबांचा प्रसिद्ध राजा कोण होता?
18. चालुक्यांची राजधानी कोणती? ती कोणत्या जिल्ह्यात आहे?
19. वास्तुकला असलेली चालुक्यांची तीन ठिकाणे लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

20. कांचीच्या पल्लवांचा प्रसिद्ध राजा कोण होता? त्याने कोणती पदवी धारण केली होती?

21. गंगांची राजधानी तलकाडू ही कोणत्या जिल्ह्यात आहे?

III. गटामध्ये चर्चा करा आणि उत्तरे द्या.

22. 'सर्व व्यक्ती जन्माने समान असतात' असे तिरुवळ्ळूवर यांचे म्हणणे आपल्यासाठी महत्वाचे का आहे?

23. सातवाहनांच्या काळात आर्थिक समृध्दीमध्ये योगदान देणारे अंश.

24. सामान्यपणे प्राचीन काळातील राजघराणी कोणत्या कारणाने अधोगतीला गेली?

25. पंप आणि पोन्न यावर टिपा लिहा. श्रीविजय कवीबाबत पाढान उल्लेख नसण्याने श्रीविजय काढणे.

26. एलोराचे कैलास मंदिर आणि एलिफंटा गुहा का प्रसिद्ध आहेत?

27. तिसऱ्या गोविंदाच्या सैन्य कामगिरीचे वर्णन करा.

28. अमोघवर्ष नृपतुंगाला महान सम्राट का म्हणतात?

29. सहावा विक्रमादित्य हा कल्याण चालुक्य वंशाचा महान सम्राट आहे असे का म्हटले जाते?

30. 'विक्रमांकदेव चरित, 'मिताक्षर संहिता' आणि 'मानसोल्हास' या विषयी टिपा लिहा.

31. कोणत्या देवालयाला 'देवालयांचा सम्राट' म्हणूनही ओळखले जाते? का?

32. होयसळ देवालयांच्या कोणत्याही दोन वैशिष्ट्यांचा उल्लेख करा.

33. 'भुवनेश्वरी' म्हणजे काय?

34. होयसळांच्या काही श्रेष्ठ देवालयांची नांवे सांगा.

35. होयसळ काळातील प्रसिद्ध कवी आणि त्यांच्या साहित्य कृतींची नावे सांगा.

36. बृहदीश्वर देवालय का प्रसिद्ध आहे?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

37. राजराजा चोळची कामगिरी लिहा.

38. चोळांच्या काळातील ग्राम प्रशासनाची वैशिष्टये कोणती आहेत?



उपक्रम:

- पल्लव आणि चालुक्य काळातील कलाकृतींची चित्रे संग्रहीत करा.
- हर्षवर्धन आणि दुसरा पुलकेशी यांची जीवन चरित्रे वाचा (स्त्रोत: भारत भारती पुस्तक संपदा).
- राष्ट्रकूट आणि चालुक्य काळातील वास्तुशिल्पांची चित्रे संक्षिप्त वर्णनासह संग्रह करा.
- नकाशावर राष्ट्रकूट आणि कल्याणच्या चालुक्यांच्या राजधान्या आणि वास्तुशिल्पकेंद्रे चिन्हांकित करा.
- चिनी माती किंवा कोणत्याही वस्तू घेऊन गोमटेश्वराची प्रतिकृती तयार करा.
- संधी मिळाल्यास श्रवणबेळगोळला जाऊन तेथील शिल्पकलाकृतींचे सौंदर्य पहा.
- आपल्या परिसरातील पराक्रमी व्यक्तींची माहिती कोरलेल्या शिलालेखाचे निरिक्षण करुन त्यांची माहिती संग्रहित करा.
- होयसळ आणि चोळांच्या मुर्तीशिल्प आणि वास्तुशिल्प कलेची छायाचित्रे मिळवून त्यांची माहिती संग्रहित करा.
- होयसळ आणि चोळ यांच्याशी संबंधित ऐतिहासिक ठिकाणे नकाशावर चिन्हांकित करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नागरिक शास्त्र

पाठ 7 नागरिक आणि नागरिकत्व

N6P3C7

पाठाचा परिचय

या पाठात नागरिक आणि नागरिकत्वाची संकल्पना, नागरिकत्व मिळविण्याच्या पध्दती आणि नागरिकत्व गमावण्याचे संदर्भ, याची माहिती दिली आहे. आणि आदर्श नागरिकांची लक्षणे सांगितली आहेत.

सामर्थ्य

1. नागरिक आणि नागरिकत्व याचा अर्थ जाणून घेणे.
2. नागरिकत्व मिळविण्याच्या आणि गमावण्याच्या संदर्भांचा अर्थ समजून घेणे.
3. आदर्श नागरिकांची लक्षणे जाणून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ प्रवेश



अ म्हैसूरचा राजवाडा ब

मांगील पानावरील चित्राचे निरिक्षण करा:

1. म्हैसूरचा राजवाडा पाहण्यासाठी पर्यटक कोठून येतात?
2. चित्र 'अ' मधील सर्व लोक भारतीय आहेत का?
3. तुम्ही विदेशी लोकांना कसे ओळखाल?

सरिताची शंका

सरिता दसऱ्याच्या सुट्टीत आईवडिलांसोबत बेलुरु, हळेबिडू आणि म्हैसूरला पाहण्यास गेली होती. प्रत्येक ठिकाणांची अधिक माहिती जाणून घेण्यास ती उत्सुक होती. त्यामुळे ती प्रश्न विचारत होती. त्यांनी म्हैसूरला भेट दिली त्यावेळी तिची नजर दुसरीकडे वळली, हे पाहून तिच्या वडिलांनी असे प्रश्न केले.

वडील : बाळ, तू कोणाला पाहत आहेस?

सरिता : तिकडे बघा, त्यांचा रंगरुप, शरीरयष्टी, वेशभूषा, भाषा देखिल भिन्न दिसत आहे. बाबा, ते कोण आहेत?

वडील : होय, ते दुसऱ्या देशांचे रहिवासी आहेत. विदेशी लोक. ते भारतात पर्यटनासाठी आले आहेत. ते दुसऱ्या देशांचे नागरिक आहेत.

सरिता : आई नागरिक म्हणजे कोण?

आई : देशात कायमस्वरूपी रहाणाऱ्या जबाबदार सदस्यांना आपण नागरिक म्हणतो. उदाहरणात आपला देश भारत. आम्ही भारतीय आहोत. आमचे आजोबा, पणजोबाही इथेच जन्मले आणि राहिले. आपण इथले कायमचे रहिवासी आहोत. या कारणास्तव आपण भारताचे नागरिक बनतो आपण आपल्या कुटूंब सदस्याप्रमाणे या देशाचेही सदस्य आहोत. ''एखाद्या देशाच्या घटनात्मक सदस्यत्वाला नागरिकत्व म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सरिता : आमच्यात आणि विदेशी लोकांमध्ये काय फरक आहे?

वडील : आम्हा भारतीय नागरिकांना काही हक्क दिलेले आहेत. विदेशी लोकांना असे कोणतेही हक्क नाहीत.

सरिता : नागरिकत्व म्हणजे काय?

आई : आम्ही आमच्या कुटुंबातील सदस्य आहोत. तसेच आपल्या देशाचेही सदस्य आहोत. एका देशाच्या सदस्यत्वाला 'नागरिकत्व' म्हणतात.

सरिता : देशाचे नागरिकत्व मिळविण्याच्या कोणकोणत्या पध्दती आहेत?

वडील : एखाद्या देशाचे नागरिकत्व मिळविण्याच्या सामान्यतः दोन पध्दती आहेत.

(1) नैसर्गिक सहज नागरिकत्व (2) सहजस्वीकृत नागरिकत्व

सरिता : नागरिकत्व मिळविण्याच्या पध्दती कोणकोणत्या?

वडील : बाळ नागरिक एका देशाचे नागरिकत्व खालील पध्दतीने प्राप्त करु शकतो.

1. **जन्मानुसार नागरिकत्व:** कोणतीही व्यक्ती ज्या देशामध्ये जन्म घेतो किंवा जन्म घेते, ते त्या देशाचे नागरिकत्व प्राप्त करतात. अशा व्यक्तीचे आई वडिल कोणत्या देशाचे आहेत हे लक्षात न घेता नागरिकत्व दिले जाते. एखाद्या देशाचे नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी जन्म हा मुख्य आधार आहे. उदा: भारतामध्ये 26 जानेवारी 1950 पासुन अथवा नंतर भारतामध्ये जन्मलेल्या व्यक्तीला भारतीय नागरिकत्व प्राप्त होते.

2. **वंशपरंपरेनुसार नागरिकत्व:** या पध्दतीनुसार एखाद्या व्यक्तीचे आई ¬वडिल कोणत्या देशाचे आहेत. या आधारावर नागरिकत्व प्राप्त करु शकतात. उदा: 26 जानेवारी पासुन अथवा नंतर भारताबाहेर भारतीय कुटुंबामध्ये जन्म घेतलेल्या व्यक्तीला भारतीय नागरिकत्व प्राप्त होते. या दोन पध्दतीना सहज नागरिकत्व म्हणतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. **नोंदणीव्दारे नागरिकत्व:** एखाद्या देशाचे नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी योग्य पध्दतीने संबंधीत कार्यालयात अर्ज देवुन नोंदणीद्वारे नागरिकत्व प्राप्त करु शकतो. प्रत्येक देशाच्या काही अटींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. उदा: भारतामध्ये कमीत कमी 5 वर्षे रहिवासी असलेली व्यक्ती भारताचे नागरिकत्व नोंदणी करुन मिळवू शकते. या पध्दतीला सहजस्वीकृत (सहजीकृत) नागरिकत्व म्हणतात.

सरिता : आई, असे असेल तर कोणत्या संदर्भात एखादी व्यक्ती आपल्या देशाचे नागरिकत्व गमावते?

आई : नागरिकत्व गमावण्याच्या काही पध्दती. एखाद्या देशाचे नागरिकत्व गमावण्याचे काही संदर्भ खालील प्रमाणे आहेत.

1. **परित्याग (Renunciation):** एखाद्या भारतीय नागरिकाने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारलेले असल्यास स्वईच्छेने नोंदणीद्वारे भारतीय नागरिकत्वाचा त्याग करु शकतो.

2. **संपुष्टात आणणे (Termination):** एखाद्या भारतीय नागरिकाने परदेशाचे नागरिकत्व स्विकारल्यास त्याच्या अर्जाची वाट न पाहता त्याचे भारतीय नागरिकत्व कायदेशीररित्या संपुष्टात आणु शकतो.

3. **अस्विकार (By Deprivation):** जर एखाद्या व्यक्तीने फसवणूक करुन भारताचे नागरिकत्व मिळविले असेल किंवा तो / ती देशविरोधी कृत्यांमध्ये सहभागी असल्यास किंवा भारतीय राजघटनेचे उल्लंघन करत असेल तर भारत सरकार त्याला नागरिकत्व नाकारु शकते.

वडील : मुली, एकाचवेळी दोन देशांचे नागरिकत्व मिळणे शक्य नाही.

सरिता : बाबा, माझे भारत देशावर प्रेम आहे. मी भारतीय नागरिकच राहीन.

आई : खूप छान बाळा, चल आत जाऊन राजवाडा पाहून येऊया.

@MTBS NOT TO BE REPUBLISHED

आदर्श नारिकांची लक्षणे



प्रत्येक नागरिकाला त्याच्या देशात काही हक्क आहेत. मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविणे, सरकारी सेवेत काम करणे, संरक्षण दलात सामील होणे इत्यादी त्याचे हक्क आहेत. त्याचबरोबर त्याने जबाबदारीने करावयाची काही कर्तव्ये ही आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आदर्श नागरिकांची लक्षणे:-

1. संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत याचा आदर करणे आणि भारताच्या स्वातंत्र्य लढयातील बलीदानांचा आदर करणे.
2. वैज्ञानिक मनोभावना मानवीयता आणि सुधारण मनोभाव असणे.
3. संविधानाशी विश्वासु राहुन त्याचा आदर करणे.
4. निवडणूकीत मतदान करणे.
5. भाषा, धर्म, जात पंथ यांचा विचार न करता सर्वांशी बंधूतेने राहणे.
6. देशाच्या संकटकाळी रक्षणकार्यात सहभागी होणे.
7. नियमितपणे कर भरणे.
8. परिसर संरक्षण विषयी जागरुक राहणे
9. सार्वजनिक संपतीचे संरक्षण करणे आणि हिंसा त्याग करणे.
10. जेष्ठ नागरिकांना सहाय्य करणे.

11. प्रत्येक आई-वडिल/पालकांनी त्याच्या 6-14 वयोगटातील मुलांना शालेय शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

हे तुम्हाला माहित असू द्या.

❖ आपल्या देशात एक नागरिकत्व पद्धत आहे. राज्यवार नागरिकत्व नाही.

❖ नागरिकशास्त्र हे त्यांचे हक्क, कर्तव्ये, आणि सार्वजनिक जीवनात नागरिकांनी बजावणाऱ्या भूमिकेचे विवरण करते. नागरिकत्वाचे ज्ञान सर्वांना आवश्यक आहे.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. नागरिकत्व मिळविण्याच्या दोन सामान्य पध्दती _____ आणि _____.
2. स्वेच्छेने नागरिकत्व त्यागण्याला _____ म्हणतात.
3. भारतात _____ नागरिकत्व पध्दत आहे.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

4. नागरिक म्हणजे कोण?
5. तू भारतीय नागरिक आहेस का? कसे?
6. नागरिकत्व मिळविण्याच्या दोन पध्दती सांगा?
7. आदर्श नागरिकांची लक्षणे कोणती?
8. जेष्ठ नागरिकांना तुम्ही कशी मदत करु शकता?

NOT TO BE REPUBLISHED @KTRS

पाठ 8 आपले संविधान

X3D2Q6

पाठाचा परिचय

या पाठात संविधानाचा अर्थ, महत्व, रचना आणि मुख्य वैशिष्ट्याचे विवरण केले आहे.

सामर्थ्ये

1. संविधानाचा अर्थ आणि महत्व समजून देणे.
2. संविधानाच्या प्रस्तावनेचे महत्व समजून देणे.
3. भारतीय संविधानाची लक्षणे जाणून घेणे व प्रशंसा करणे.
4. संविधानाच्या रचना कार्यात भाग घेतलेल्या प्रसिद्ध व्यक्तीबद्दल समजून घेणे.
5. प्रजासत्ताक संकल्पना समजून घेणे.
6. धर्मनिरपेक्षता (सर्वधर्मसमभाव) या तत्वाचे महत्व जाणून दैनंदिन जीवनात या मूल्यांचा समावेश करण्यास सशक्त होणे.
7. संविधानाचा गौरव करण्याची प्रवृती वाढविणे.

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

सरकार म्हणजे काय? नागरिकांच्या कल्याणाला चालना देण्यासाठी एक संस्था असावी जी शिस्त लावेल आणि सुरक्षा, सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासाची हमी देईल अशा संस्थेला सरकार म्हणून ओळखले जाते.

संविधानाचा अर्थ आणि महत्व

एखाद्या देशाने अनुसरलेले मुलभूत कायदे म्हणजे संविधान होय. देशाच्या कारभारासाठी मार्गदर्शन करणारा हा दाखला आहे. यात सरकारची अंगे आणि त्यांच्या अधिकारांचे आणि कार्याचे स्पष्टिकरण असते. संविधानात नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचा उल्लेख असतो. सर्व निवडून आलेल्या सरकारांनी कायद्याच्या चौकटीत कार्य केले पाहिजे.

संविधानाचे महत्व: संविधानात देशाचे मुलभूत कायदे असल्यामुळे ते फार महत्वाचे आहे. त्याला सर्वजण कटीबद्ध राहतात. राष्ट्रपती, पंतप्रधान, खासदार, न्यायाधीश अधिकारी वर्ग आणि देशातील सर्वजण संविधानाचे पालन करण्यास कटीबद्ध आहेत.

1. संविधान हे लोकांचे आदर्श आणि आकांक्षा प्रतिबिंबित करते.
2. सुखी राज्याच्या स्थापनेसाठी संविधान मार्गदर्शन करते.
3. हे सरकारची धोरणे आणि कार्ये नियंत्रित करते.
4. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत हे सूत्र प्रजेच्या हक्कांच्या रक्षणाला महत्व देते.

कृती: डॉ. आंबेडकर हे कोण होते? त्यांना आपण आज कृतज्ञता पूर्वक स्मरण का करतो? गटात चर्चा करा.

भारताच्या संविधानाची रचना

भारताच्या संविधानासाठी 'संविधान रचना सभा' ही विशेष सभा तयार करण्यात आली. या सभेच्या सदस्यानी त्यांच्या दुसऱ्या अधिवेशनात डॉ. राजेन्द्र प्रसाद यांची अध्यक्ष म्हणून निवड केली.

संविधानाच्या सभेत 299 जण होते. 9 डिसेंबर 1946 रोजी त्यांचे प्रथम अधिवेशन झाले.

संविधान रचना सभेने आपले कार्य गतीशील करण्याच्या उद्देशाने 22 समित्यांची रचना केली. संविधानाची मसुदा प्रत तयार करण्यासाठी संविधान मसुदा समिती नेमली, या समितीचे अध्यक्ष डॉ. बी. आर. आंबेडकर होते. सरदार वल्लभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली मुलभूत हक्क सल्लागार समिती व जे बी कृपलानी यांच्या अध्यक्षतेखाली मुलभूत हक्क उपसमिती तसेच उपसमित्या रचण्यात आल्या. राजकुमारी अमृता कौर, लिलाराय, मालती चौधरी, सरोजीनी नायडू, बेगम ऐजाज रसूल, विजयलक्ष्मी पंडित, द्राक्षायणी, वेलायुधन अशा 15 महिला सदस्या तसेच कर्नाटकातील केंगल हणुमतंय्या, एस् निजलिंगप्पसह अनेकांनी संविधान रचण्यात महत्वाची भूमिका बजावली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



भारताच्या संविधान रचना समितीत सहभागी महिला सदस्या

- सदस्यानी संविधानाची मसुदा प्रत परिशिलन करून 2473 दुरुस्त्या सुचविल्या मसुदा संविधान आणि दुरुस्त्यावर संविधान रचना सभेत सविस्तर चर्चा केली. या प्रमाणे संविधानाला अंतिम रूप देण्यासाठी सुमारे 2 वर्षे 11 महिने 18 दिवस इतक कालावधी लागला.
- डॉ. आंबेडकर 15-8-1947 पासून 06-10-1951 पर्यंत कायदा मंत्री होते.

भारताचे संविधान 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आले. या संविधानाने भारताला प्रजासत्ताक असे घोषित केले. त्याच्या आठवणीसाठी आम्ही प्रत्येक वर्षी 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन हा राष्ट्रीय सण म्हणून साजरा करतो. प्रत्येक वर्षी 26 नोव्हेंबर रोजी 'संविधान दिन' साजरा करतो.



प्रजासत्ताक दिनाचा परेड, नवीदिल्ली


संविधानाच्या मार्गदर्शी सुचनेनुसार भारतात सा.श. 1951-52 साली प्रथम निवडणूक झाली. राज्यसभा आणि लोकसभा या दोन सदनात प्रथम लोकनियुक्त संसद (पार्लमेंट) सा.श. 1952 साली अस्तित्वात आली.

© KSEBS NOT TO BE REPUBLISHED

आमच्या संविधानाची व्याप्ती: भारतीय मुळ संविधानात 395 कलमे, 22 भाग आणि 8 परिच्छेदांचा समावेश होता. सप्टेंबर 2023 पर्यंत संविधानात 106 वेळा घटना दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यामुळे आता आपल्या संविधानात 471 कलमे, 25 भाग आणि 12 परिच्छेदांचा समावेश आहे.

प्रस्तावना

आपल्या संविधानाच्या प्रारंभी सविस्तर प्रस्तावना आहे. ही प्रस्तावना संविधानाच्या हृदयाप्रमाणे असून ती भारतीयांचे आदर्श आणि आकांक्षा प्रतिबिंबित करते. न्याय, स्वातंत्र्य, समानता, व्यक्ती गौरव, बंधुत्व, राष्ट्रीय एकात्मता या आदर्शांचा उल्लेख यामध्ये केला आहे.




© KTB NOT TO BE REPUBLISHED

संविधानाची प्रमुख लक्षणे

1. **लिखित संविधान:** भारताचे संविधान लिखित स्वरुपात आहे. भारताचे संविधान जगातील अती विस्तारीत संविधान आहे. त्यामध्ये शासकांग, कार्यांग व न्यायांग अशा शासनाच्या विविध अंगांची रचना अधिकार आणि कर्तव्यांचा समावेश आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यासाठी एकच संविधान आहे.

2. **गणराज्य:** भारत हे एक प्रजासत्ताक गणराज्य असल्याचे संविधानाने सुचविले आहे. प्रजासत्ताक गणराज्यात कोणा एका राजाचा कारभार चालत नसतो तर प्रजेकडून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी मार्फत कारभार चालविला जातो. अशी राजकीय व्यवस्था असलेला भारत देश हा एक 'प्रजासत्ताक गणराज्य' आहे.



डॉ. राजेंद्र प्रसाद
'संविधान रचना समिती'चे अध्यक्ष,
भारताचे प्रथम राष्ट्रपती अध्यक्ष



डॉ. बी.आर. आंबेडकर
'संविधान मसुदा समिती'
चे अध्यक्ष



जवाहरलाल नेहरू भारताचे
पहिले पंतप्रधान

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

3. **मूलभूत हक्क व कर्तव्यांचा उल्लेख:** संविधानामध्ये सहा मूलभूत हक्क प्रजेला दिले आहेत. ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणलाही नाही. त्याच प्रमाणे तसा कोणताही कायदा नियम आणि उपक्रम करण्याचा अधिकार कोणत्याही राज्य सरकारला नाही. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याचे संरक्षण करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. नागरिकानी आपल्याला मिळालेल्या हक्कांचा मनाला वाटेल तसा वापर करून सामाजिक अशांतीस कारणीभूत होऊ नये किंवा कायदा उल्लंघन करु नये. संविधानामध्ये नागरिकांनी करावयाच्या अकरा कर्तव्यांचा उल्लेख आहे.

4. **धर्मनिरपेक्षता (सर्वधर्मसमभाव):** संविधानाने सर्वधर्मसमभाव धर्म निरपेक्षता या तत्वांचा अंगिकार केला आहे. संविधानात्मक सर्वधर्मसमभावाला धर्मनिरपेक्षता असे म्हणतात यामध्ये जात, पंथ, धर्म यात भेदभाव नसतो. सरकारने कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता सर्व धर्मियांना समान भावनेने पाहणे होय. सरकारने कोणत्याही धर्माला राष्ट्रीय धर्म म्हणून मान्यता दिलेली नाही. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे व चालीरीती प्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. सामाजिक हिताच्या दृष्टीने धार्मिक स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार सरकारला आहे.

5. **स्वतंत्र न्यायांग:** आपली न्याय व्यवस्था शासकांग व कार्यांग यापासून स्वतंत्र असून अनेक अधिकार त्याच्याकडे आहेत. शासकांग, कार्यांग व न्यायांग व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू शकत नाही. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. न्याय मिळविण्याचा अधिकार सर्वाना आहे. या तत्वांचा पुरस्कार न्यायांगाने केला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सर्वानी पाळलाच पाहिजे. तोच अंतीम निर्णय होय.

6. **प्रौढ मतदान पद्धत:** प्रौढ मतदान पध्दत लोकशाहीचे मूळ तत्व आहे.सर्व प्रौढ मतदार (18 वर्षा वरील) मतदानाद्वारे लोकप्रतिनिधींची निवड करतात. या पद्धतीला प्रौढ मतदान पद्धत म्हणतात. नागरिक कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मतदान करुन सरकार निवडतात. त्या कारणाने आपल्या संविधानाने प्रौढ मतदान पध्दतीला मान्यता दिली आहे.

7. **अस्पृश्यता निवारण:** जन्मावरून अस्पृश्यता ही समाजाला लागलेली वाईट पध्दत आहे. म्हणूनच अस्पृश्यतेतून वाढीस लागलेले जातीभेदाचे निर्मूलन करुन सामाजिक न्याय स्थापन करणे हे आमच्या संविधानाचे मुख्य ध्येय आहे.

© KTS NOT TO BE REPUBLISHED

8. **सुखी राज्य स्थापना:** कल्याणकारी राज्याची (वेल्फेअर स्टेट) स्थापना करणे हेच भारतीय संविधानाचे मुख्य ध्येय आहे.

सर्वांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा मिळवून देण्याचे ध्येय ठेवलेल्या राज्याला सुखी व कल्याणकारी राज्य असे म्हणतात.

9. **निवडणूक पद्धत:** भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. गेल्या सहा दशकामध्ये वेळोवेळी सार्वजनिक निवडणूका झाल्या आहेत. या काळात लोकशाहीची मुळे खोलवर रुजली आहेत.

नवीन शब्द:

संविधान मसुदा समिती: संविधान सभेत तयार केलेली संविधानाची कच्ची प्रत (दुरुस्ती करावयाची प्रत).

अनुच्छेद -संविधानाचा एक भाग

प्रजासत्ताक -प्रजेच्या हातात सत्ता असणे होय.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष _____ होते.
2. आपले भारतीय संविधान _____ रोजी आमलात आले.
3. संसदेची दोन सदने _____ आणि _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

4. संविधान म्हणजे काय? याचा आम्हाला काय फायदा आहे?
5. संविधान रचना समितीचे अध्यक्ष कोण होते?
6. डॉ.बी.आर. आंबेडकर यानी संविधान रचना कार्यात कोणते योगदान दिले?

7. गणराज्य म्हणजे काय?

8. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?

9. संविधान दिन कोणत्या दिवशी साजरा करतात?

10. भारतीय संविधान रचना सभेतील महिला सदस्यांची नांवे सांगा.

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

11. प्रस्तावनेत उल्लेख असलेल्या तत्वासंबंधी चर्चा करा.



उपक्रम:

- आपल्या संविधानाने आम्हाला हक्क व कर्तव्ये दिलेली आहेत. हक्क व कर्तव्ये यामध्ये तुमच्या मते कोणते मुख्य आहेत? गटात चर्चा करून तुमचा अभिप्राय लिहा.
- संविधान रचना समितीतील सदस्यांच्या चित्रांचा संग्रह करा.

@KBRS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 9 शासनाचे (सरकार) प्रकार

I8E5Z7

या पाठाच्या अध्ययनानंतर पुढील अंश समजून घ्याल.

1. शासनाचा अर्थ जाणून घ्याल.
2. लोकशाही सरकारचा अर्थ जाणून घ्याल.
3. हुकूमशाही सरकारचा अर्थ जाणून घ्याल
4. तिन्ही प्रकारच्या शासनांमधील (सरकार) फरक ओळखाल.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

सरकारचा अर्थ:

एखाद्या राष्ट्रातील नागरिकांनी सुखी, शांत आणि समाधानी जीवन जगण्यासाठी एका पद्धतशीर प्रशासनाची आवश्यकता असते. प्रशासनाची नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार प्राप्त असलेल्या व्यवस्थेलाच शासन किंवा सरकार असे म्हणतात. नागरिकांच्या हितासाठी विविध कायद्यांची रचना करून त्या कायद्यांची अंमलबजावणी करणे तसेच शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखणे ही सरकारची जबाबदारी आहे.


सरकारचे प्रकार:

1. लोकशाही सरकार
2. हुकूमशाही सरकार
3. समतावादी सरकार

1. **लोकशाही सरकार:** ही एक व्यवस्था आहे. लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीमार्फत चालविण्यात येणाऱ्या सरकारला लोकशाही सरकार असे म्हणतात. जनतेच्या पाठिंब्यावर देशाची जनताच (प्रजा) सरकार चालवत असते म्हणून लोकशाहीला प्रजासत्ताक सरकार असेही

म्हणतात. आपल्या प्रतिनिधींना निवडून देण्याचे देशाच्या जनतेला असणारे हे निवडणुकीचे स्वातंत्र्यच लोकशाहीचा प्राण आहे. खऱ्या अर्थाने एखाद्या व्यक्तीला आवश्यक असणारे व्यक्ती स्वातंत्र्य अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संघ-संस्था स्थापन करण्याच्या स्वातंत्र्याची हमी देऊन राज्यासोबत त्या व्यक्तीचे संबंध प्रस्थापित करणारी व्यवस्था म्हणजेच लोकशाही होय. अब्राहम लिंकन यांनी ''लोकांनी लोकांचे लोकांसाठी असलेले सरकार म्हणजे लोकशाही'' असे म्हटले आहे.

लोकशाही सरकार असलेले देश: भारत, अमेरिका आणि इंग्लंड प्रमाणे जगातील बहुतेक देशांमध्ये लोकशाही सरकार अस्तित्वात आहे.



मतदान केंद्र

2. **हुकूमशाही सरकार:** या व्यवस्थेत राज्याच्या संपूर्ण सत्तचे आणि अधिकारांचे एकाच व्यक्ती किंवा एकाच छोट्याशा गटामध्ये केंद्रीकरण झालेले असते. कोणाचेही नियंत्रण आणि कसल्याही प्रकारचे निर्बंध नसलेल्या एका व्यक्तीच्या किंवा एकाच छोट्याशा गटाच्या एकाधिकारशाहीला हुकूमशाही सरकार असे म्हणतात. लोकशाहीत स्वातंत्र्याला प्राधान्य दिले जाते तर हुकूमशाहीत स्वातंत्र्याचा विरोध केला जातो हुकूमशहा आपल्या इच्छेनुसार सरकार चालवू शकतो. न्याय, धर्म, आर्थिक, नियोजन आणि सामाजिक प्रथा सर्वकाही हुकुमशहाच्या आज्ञेनुसार निश्चित केले जातात. त्यांचा विरोध करण्याचा अधिकार जनतेला नसतो.



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हुकूमशाही सरकारला हिटलर प्रशासन उदाहरण

3. **समतावादी सरकार:** समाजातील उत्पादनाचे स्त्रोत म्हणजेच जमीन कामगारांचे श्रम आणि भांडवल ही समाजाचीच संपत्ती आहे असा सिद्धांत मांडून प्रत्येक व्यक्ती आपल्या शक्ती प्रमाणे कष्ट करून

आपल्या गरजेनुसार ते प्राप्त करून शकतो. या तत्वाचे प्रतिपादन करणाऱ्या सरकारला समतावादी सरकार असे म्हणतात. येथे खाजगी मालमत्ता बाळगण्याची संमती नाही. समतावादी सरकार हे समानतेच्या तत्वांच्या आधारावर उभे असून समाजातील गरीब- श्रीमंत, उच्च-निच्च अशा भेदभावांपासून अलिप्त असते. ते मानवतेच्या बाजूने कार्यरत असते. खाजगी संपत्ती हळूहळू श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढवून असमानता निर्माण करते. शेवटी बहुसंख्यांक श्रमजीवी लोकांचाच विजय होतो तेव्हा कोणताही भेदभाव नसलेला समानतेचा समाज निर्माण होतो. येथे सर्वांमध्ये सर्वांसाठी सर्वजण श्रम करण्याची संस्कृतीत वाढीस लागते. सर्वजण सुखी समाधानी जगण्याची व्यवस्था निर्माण होते. या व्यवस्थेचे प्रतिपादन जर्मनीचा तत्वज्ञानी कार्ल मार्क्स यांनी केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. लोकप्रतिनिधीमार्फत चालविण्यात येणाऱ्या सरकारला _____ सरकार म्हणतात.
2. आपण सर्व एक आहोत ही भावना _____.
3. एका व्यक्तीच्या किंवा एका छोट्याशा गटाच्या एकाधिकारशाहीला _____ सरकार म्हणतात.
4. समतावादी सरकारचे प्रतिपादन _____ यांनी केले.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. शासन (सरकार) म्हणजे काय?
6. हुकूमशाही सरकार म्हणजे काय?
7. समतावादी सरकार म्हणजे काय?

III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

8. भारत एक प्रचंड लोकशाही देश आहे लोकशाहीची मूलभूत तत्वे येथे कशी लागू केली जातात शिक्षकांच्या मदतीने चर्चा करा
9. एक नागरिक म्हणून तुम्ही लोकप्रतिनिधी झाला तर सरकार कसे चालवाल? याबाबत वर्गात चर्चा करा.
10. तुमच्या आवडीचा सरकारचा प्रकार कोणता आहे? देशाच्या भरभराटीला कसा हातभार लागतो ते लिहा?
11. हुकूमशाही सरकार बद्दल अधिक माहिती गोळा करा?



उपक्रम:

- लोकशाही, हुकूमशाही आणि समतावादी सरकारे यामधील फरकांची यादी करा
- लोकशाही सरकारात प्रजा हीच प्रभू असते हे विधान तुम्हाला मान्य आहे का? वर्गात चर्चा करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

भूगोल

पाठ 10 ग्लोब आणि नकाशे

T9F1I7

पाठाचा परिचय

भूगोलाचा योग्य अभ्यास करण्यासाठी आणि भूगोल समजून घेण्यासाठी ग्लोब आणि नकाशे ही उत्तम साधने आहेत. यांच्या सहाय्याने भूगोल शिकणे आणि शिकवणे सोपे होते. ग्लोबचा अर्थ आणि उपयोग, नकाशाचे उपयोग, त्यांचा अर्थ आणि पद्धती, नकाशे बनविण्यासाठी महत्वाच्या भौगोलिक संकेतांचा वापर आणि नकाशा वाचन कसे करावे? याचे या पाठात विवरण केले आहे.

सामर्थ्ये

1. ग्लोबचा वापर आणि महत्व समजून घेणे.
2. नकाशे बनविण्याकरिता लागणारी विविध सामुग्री आणि नकाशांचे प्रकार समजून घेणे.
3. नकाशात असलेली प्रमुख सांकेतिक चिन्हे व त्यांचा उपयोग समजून घेणे.
4. नकाशातील भौगोलिक संकेत व चिन्हे यांचा संग्रह करणे.
5. नकाशा वाचनाची कला समजून घेणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. ग्लोब (पृथ्वीचा गोल)

अर्थ: विज्ञान विषयामध्ये आपण पृथ्वीचा आकार आणि व्याप्तीचा अभ्यास केला आहे. पृथ्वी जियॉड (Geoid) आकारात असून हे ग्लोबच्या सहाय्याने सिध्द करु शकतो. कृत्रिम उपग्रहावरून घेतलेल्या पृथ्वीच्या छायाचित्राद्वारे पृथ्वीचे खरे आणि पूर्ण रूप आपल्याला माहित होते. परंतु आम्ही पृथ्वीच्या एकाच बाजूचा आकार पाहू शकतो. ग्लोब ही पृथ्वीचीच प्रतिकृती असल्यामुळे आम्ही पृथ्वीची दुसरी बाजू ग्लोब फिरवून पाहू शकतो.



पृथ्वीची प्रतिकृती (ग्लोब)

नमूना ग्लोबची वैशिष्ट्ये

'ग्लोब' ही पृथ्वीची लहान प्रतिकृतीच आहे. पृथ्वीच्या प्रत्यक्ष आकाराची ही प्रतिकृती असून, नकाशावर सपाट दिसणाऱ्या आकाराप्रमाणे ती नाही. पृथ्वीच्या अनेक अंगांची माहिती ग्लोबमुळे आपल्याला मिळते. हे एक अत्यंत सोपे शिकण्याचे आणि शिकवण्याचे उपकरण आहे. ते आपण टेबलवर ठेवून फिरवू शकतो. त्यामुळे आपल्याला अनेक भौगोलीक विषयांची माहिती घेता येते.

ग्लोबचे उपयोग

अ) पृथ्वीच्या आकाराचा अभ्यास करण्यासाठी उपयोग होतो.

आ) प्रदेशाचा आकार, व्याप्ती, खंड, समुद्र आणि महासागर यांची माहिती मिळते.

इ) ग्लोबवरील अक्षांश रेखांश, आपल्याला निश्चित प्रदेश आणि राजकीय सीमा पाहण्यास मदत करतात.



सॅटेलाईट वरून घेतलेले पृथ्वीचे छायाचित्र

ई) उत्कृष्ट दर्जाच्या ग्लोबमुळे आपल्याला पृथ्वीच्या अक्षाच्या हालचाली म्हणजेच पृथ्वीच्या गती व त्यांचे परिणाम समजून घेण्यास मदत होते. उदा: दिवस-रात्र, ऋतू.

उ) ग्लोबवरून पृथ्वीवरील विविध भौगोलिक, सामान्य माहिती समजते. ग्लोब आपल्याला टेकड्या, पठारे, मैदाने, वाळवंटे, नद्या, गवताळी प्रदेश, अरण्ये व बेटांची माहिती देतात.

2. नकाशे

ग्लोब आपल्याला पृथ्वीची सर्वसाधारण माहिती देतो. परंतु एखादा प्रदेश, राज्य, देश आणि इतर भौगोलिक लक्षणांच्या सविस्तर माहितीसाठी नकाशे आवश्यक असतात.

@KEBS NOT TO BE REPUBLISHED

जगाच्या पूर्ण आकृतीचे किंवा विभागाचे सपाट रुपात आणि मोजमापात केलेले प्रदर्शन म्हणजेच नकाशा. नकाशा तयार करण्याची कला आणि विज्ञान यालाच नकाशा शास्त्र (Cartography) असे म्हणतात. विविध प्रकारच्या नकाशांचा एकत्रित संग्रह असलेल्या पुस्तकाला 'ॲटलास किंवा नकाशा पुस्तक' असे म्हणतात.


नकाशांचे प्रकार

माप आणि उपयुक्तता त्यांच्या आधारे नकाशांचे खालील प्रकारे वर्गीकरण केले जाते.

(i) मोजमापावर आधारित नकाशे

मोजमापावर आधारित दोन प्रकाराचे नकाशे आहेत,


(अ) मोठ्या आकाराचे नकाशे: लहान प्रदेशाची माहिती या प्रकारच्या नकाशाद्वारे मिळते. यांचे भौगोलिक व महसूल नकाशे असे वर्गीकरण करता येते. महसूल नकाशा एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक संपत्तीची पूर्ण माहिती देणारे नकाशे आणि भौगोलिक किंवा भूभागांची संपूर्ण बारकाव्या सहीत माहिती देणारे नकाशे है भौगोलिक नकाशे.



मोठ्या आकाराचे नकाशे

© NOT TO BE REPUBLISHED

(आ) लहान आकाराचे नकाशे: हे जगातल्या मोठ्या देशांची किंवा प्रदेशांची माहिती देणारे नकाशे होय. उदा. जगाचा नकाशा, खंड, देश. यामध्ये भिंतीवर लटकविण्याचे नकाशे आणि ॲटलास असे दोन प्रकार असतात.



लहान आकाराचे नकाशे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भिंतीवर लटकणारे नकाशे ॲटलासपेक्षा आकाराने मोठे असतात. वर्गात शिकविण्यास त्यांचा उपयोग होतो. राजकीय विभाग, भौगोलिक लक्षणे इत्यादी सामान्य आणि प्रमुख माहिती पुरवणारे हे नकाशे असतात.

'ॲटलास नकाशे' जरी आकाराने लहान असले तरीही ते आपल्याला काही विवरणात्मक व उपयुक्त माहिती पुरवितात.

(ii) उपयुक्तता आधारित नकाशे

हे विषयवार नकाशे असतात. ते खालील प्रमाणे,

(अ) स्वाभाविक नकाशे: याप्रकारचे नकाशे नैसर्गिक विषयाशी संबंधित पृथ्वीवरील पर्वत, पठार, डोंगराळ प्रदेश, शिखरे, सपाट भूप्रदेश, नदी इत्यादी भौगोलिक लक्षणे दर्शवितात.

(आ) राजकीय नकाशे: याप्रकारचे नकाशे राज्य, देश, खंड आणि त्यांचे स्थान, विस्तार इत्यादी दर्शवितात.

(इ) वर्गीकृत नकाशे: या नकाशाद्वारे वैविध्यपूर्ण वर्गीकरणाची माहिती मिळते. उदा. वापरात असलेला भूभाग, हवामान, पर्ज्यन्यमान, लोकसंख्या, मातीचे प्रकार, नैसर्गिक वनस्पती, पिके, खनिजे, औद्योगिक कारखाने, रेल्वेमार्ग, रस्ते, जलमार्ग इत्यादींची माहिती मिळविण्यासाठी यांचा उपयोग होतो.

नकाशांचे प्रमुख अंश: शीर्षक, मोजमापन, अक्षांश व रेखांश, दिशा आणि संकेत (सूची) हे उत्तम नकाशाचे प्रमुख अंश होत.

1. **शीर्षक:** प्रत्येक नकाशाला त्यात असणाऱ्या विषयासंबंधी समर्पक शीर्षक हवे. तो आम्हाला आवश्यक माहिती पुरवितो. उदा: राजकीय भारत, भारत स्वाभाविक विभाग,

2. **मोजमापन:** प्रत्यक्ष जमिनीवरचे अंतर आणि त्यानुसार नकाशातले अंतर हे प्रमाणानुसार दर्शविलेले असते. यामुळे आपल्याला जमिनीवरील दोन ठिकाणाचे प्रत्यक्ष अंतर कळून येते. नकाशामध्ये दोन स्थळे जवळ दिसत असली तरी प्रत्यक्षात ती दूर असतात.

3. **अक्षांश-रेखांश:** हे मोजमापाच्या काल्पनिक रेषांचे जाळे असून त्याच्या आधारे आपल्याला निर्दिष्ट ठिकाणे, अंतर आणि दिशा याचे ज्ञान मिळते.

4. **दिशा:** नकाशामध्ये दिशा, बाणाची खूण करून निर्दिष्ट केलेली असते. नकाशाच्या वरील बाजूस उत्तर (N) अक्षर लिहिलेले असते. बाणाचे टोक उत्तर दिशेकडे असते. एकदा आपल्याला उत्तर दिशा नेमकी सम जली तर इतर दिशा सहज समजू शकतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. **संकेत (सूची):** एखाद्या विषयासाठी एखादी विशिष्ट खूण जेव्हा वापरली जाते तेव्हा त्याला संकेत (सूची) असे म्हणतात. संकेत (सूची) हे नकाशांचे प्रमुख अंश, अशा सूचीद्वारे आपल्याला नकाशाम ध्ये दिलेल्या विषयांचे, रंग किंवा विशिष्ट खुणाद्वारे सहज ज्ञान होते. **उदा:** पाण्याकरिता निळा रंग, मैदानांकरिता हिरवा रंग इत्यादी.



उत्तर दिशा दाखविण्याची पध्दत



नकाशा सूची

नकाशांचे फायदे: नकाशांचे आपल्याला अनेक प्रकारे फायदे आहेत.

- नकाशे आपल्याला नगर, जिल्हे, राज्ये, देश आणि खंड यांच्यातील स्थळ निश्चित करण्यास मदत करतात.
- नकाशे आपल्याला भौगोलिक स्थितीची माहिती देतात. उदा. टेकडी, पर्वत, पठारे, डोंगराळ प्रदेश, अरण्ये, वाळवंटी प्रदेश, किनारपट्टी आणि बेटे दर्शविण्यासाठी सहाय्यक ठरतात.
- प्रदेशातील भूमार्ग, जलमार्ग व वायूमार्ग यांची माहिती देतात.
- नकाशे आपणास पिके, खनिजे व उद्योगधंदे यांचे वर्गीकरण समजून घेण्यास मदत करतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

- युद्धकाळात लष्करास नकाशांचा उपयोग सुरक्षितता आणि बेत आखणीस होतो.
- नकाशे प्रवाशांना नियोजित स्थळी पोहोचण्यास मदत करतात.
- वर्गात शिकविण्यास व शिकण्यास नकाशे हे उत्तम शैक्षणिक साधन आहे. हाताळण्यास आणि ने-आण करण्यास सुलभ असतात.

3. भौगोलिक संकेत

विशिष्ट वस्तू निश्चित करण्याकरिता खूणांचा वापर केला जातो. नकाशामध्ये वापरणाऱ्या खूणा या संपूर्ण जगात एकाच पद्धतीच्या असतात. या खुणामुळे आपल्याला खूप माहिती मिळते.


रंग: आपण जर भिंतीवर टांगलेल्या नकाशाकडे पाहिले तर आपल्याला अनेक रंगाच्या खूणां आढळून येतात. हे रंग नकाशावर विविध नैसर्गिक अंश दर्शवितात. प्रत्येक रंगाचा अर्थ निराळा असतो. नकाशात वापरण्यात येणारे महत्वाचे रंग पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) निळा रंग: निळा रंग हा समुद्र, महासागर, नदी, तळे व सरोवरे जल भाग दर्शविण्यास वापरतात.

(आ) हिरवा रंग: हिरवा मैदानी प्रदेश किंवा सखल प्रदेश आणि उतार दर्शविण्यास वापरला जातो.

(इ) पिवळा रंग: मैदाना पेक्षा उंच भाग म्हणजेच पठारी प्रदेश, डोंगराळ भाग दर्शविण्यासाठी.

(ई) तपकिरी रंग: टेकड्या आणि उंच पर्वत शिखरांच्या खालील भागाचा प्रदेश.




वर्ण संकेत

(उ) गडद तपकिरी रंग: उंच शिखरांचा उंच प्रदेश दाखविण्यासाठी करतात.

(ऊ) पांढरा रंग: पांढरा रंग बर्फाच्छादित प्रदेश दर्शविण्यासाठी करतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

या व्यतिरिक्त राजकीय नकाशामध्ये विविध राज्ये, जिल्हे दर्शविण्यासाठी विविध रंग वापरले जातात.



भौगोलिक संकेत


विविध रेषा: नकाशावर रेल्वे, रस्ते, वायुमार्ग इत्यादींचे जाळे दाखविण्यासाठी विविध रेषा वेगवेगळ्या रंगांनी दाखविल्या जातात. काळ्या रेषांनी सीमाभाग, लालरंगानी रस्ते इत्यादी दाखविण्यास या रेषा उपयोगी पडतात.

4. नकाशांचे वाचन

नकाशांचे वाचन करण्यासाठी किंवा आकलन करून घेण्यासाठी आपल्याला काही खूणांचे अर्थ समजणे आवश्यक असून, त्यातील ठराविक अक्षरांचे ज्ञान असणे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे कोणत्या गोष्टीसाठी कोणता रंग वापरला जातो, रेषा आणि खूणा कशासाठी वापरल्या जातात हे ही माहीत असणे जरुरीचे आहे.

नकाशा वाचणे ही एक कला आहे. नकाशावरील स्थळे आणि विविध लक्षणे यांचा अर्थ समजण्यासाठी आपल्याला काही महत्वाच्या सर्वसाधारण गोष्टींचे आकलन होणे जरुरीचे आहे. ते खालील प्रमाणे

© MTBS NOT TO BE REPUBLISHED



नकाशाचे वाचन करण्याची पध्दत

वि.सू. मापनाच्या आधारे कलबुरगी आणि बागलकोट जिल्हा केंद्रामधील थेट अंतर 222 कि.मी. आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. **निर्दिष्ट स्थळे ओळखण्यासाठी:** एखादे निर्दिष्ट स्थळ नकाशावर ओळखण्यासाठी आपल्याला अक्षांश आणि रेखांशाची माहिती असणे जरुरीचे आहे.

2. **दिशा ओळखण्यासाठी:** उत्तरेकडे रेखांकित केलेले बाणाचे टोक आपल्याला इतर दिशा ओळखण्यासाठी मदत करते.

3. **दोन स्थळातील अंतर ओळखण्यासाठी:** नकाशावर दिलेले अंतराचे माप आपल्याला दोन ठिकाणामधील अंतर समजण्यासाठी मदत करते.

नवीन शब्द:

ग्लोब, नकाशे, स्थळे, भौगोलिक लक्षणे, ॲटलास, नकाशा शास्त्र, संकेत (सूची), शीर्षक, चिन्हे, दळणवळणाचे मार्ग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तुम्हाला माहिती असू द्या.

- बेबीलोनिया येथे 2300 (ख्रि.पू.) मध्ये आढळून आलेला नकाशा हा अतिप्राचिन नकाशा होय. ग्रीक खगोलशास्त्रज्ञ क्लाउडियस टॉलेमी यानी ख्रि. शक 90-168 मध्ये पहिला ॲटलास तयार केला.
- मोठ्या मापाचे नकाशे लहान जागा दर्शवितात आणि लहान मापाचे नकाशे मोठ्या जागा दर्शवितात.
- भौगोलिक अभ्यास करण्यासाठी नकाशांचा उपयोग होतो. शिकविण्याचे हे एक उत्तम शैक्षणिक साधन आहे.

❖ पृथ्वीवरील दोन ठिकाणातील अचूक अंतर शोधण्यासाठी नकाशावरील सेंटी मीटरचे किलो मीटर मध्ये आणि इंचाचे मैलामध्ये रूपांतर करून अचूक अंतर शोधता येते.

❖ होका यंत्रातील सुई नेहमी उत्तर दिशा दर्शविते.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. पृथ्वीच्या प्रतिकृतीला _____ म्हणतात.
2. विविध प्रकारचे नकाशे संग्रहित असलेल्या पुस्तकाला _____ म्हणतात.
3. नकाशांमध्ये मैदान दर्शविण्यास _____ रंग वापरला जातो.
4. पृथ्वीगोलावर काढलेल्या काल्पनिक रेषा _____ आणि _____.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

5. ग्लोबचे दोन उपयोग सांगा.
6. नकाशा म्हणजे काय?
7. नकाशांचे विविध प्रकार कोणते?
8. नकाशांचे दोन उपयोग सांगा.
9. ॲटलास म्हणजे काय?
10. मोजमापन म्हणजे काय?
11. भौगोलिक संकेत म्हणजे काय?
12. नकाशांचे प्रमुख अंश कोणते?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



उपक्रम:

- रबरी चेंडू, पुठ्ठा, कागद वापरून ग्लोबची प्रतिकृती तयार करा.
- निरनिराळे नकाशे पहा आणि त्यातील फरक ओळखा.
- भारत देशाच्या नकाशामध्ये खालील बाबींना रंग द्या.

(अ) भारताचे प्रमुख स्वाभाविक विभाग.

(ब) भारताच्या शेजारील महासागर आणि समुद्र यांना रंग देऊन नावे द्या.

@KTDS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 11 पृथ्वीचे स्वरूप

W8K8P6

पाठाचा परिचय

या पाठातून आपण पृथ्वीचा पृष्ठभाग तिचे भूस्वरूप शिकणार आहोत. पर्वत, पठार मैदान, वाळवंट, बेट यांचा अर्थ आणि महत्व त्यांची उत्पत्ती आणि प्रामुख्यता, जगातील प्रमुख नैसर्गिक स्वाभाविक विभाग यांचा परिचय करून घेणार आहोत.

सामर्थ्ये

1. भूस्वरूपांचा अर्थ समजून घेने.
2. पृथ्वीवरील प्रमुख भूस्वरूपांची उत्पत्ती आणि महत्त्व जाणून घेणे.
3. जगातील प्रमुख स्वाभाविक विभागांची माहिती जाणून घेणे.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

1. प्रमुख भूस्वरूपे

आपण आपल्या आजूबाजूला पाहिले तर आपल्याला असे आढळून येईल की भूप्रदेश सर्व ठिकाणी एकाच प्रकारचे नाहीत. काही ठिकाणी ते उंच तर काही ठिकाणी ते खोलगट आहेत. काही प्रदेशाचा भाग पठाराचा आहे तर काही ठिकाणी डोंगर टेकड्या आढळून येतात. आणखी काही भाग खोल दऱ्यांनी बनलेला आढळतो. यामुळे आपल्याला भूकवच्यावर अनेक प्रकारचे भूस्वरूप आढळून येतात. यामध्ये टेकड्या, मैदाने, दरी, पर्वत, वाळवंटे इत्यादिंचा समावेश आहे. भूकवच्यावरील वैविध्यपूर्ण भौगोलिक लक्षणांना भूस्वरूपे म्हणतात.

कोणतेही भूस्वरूप नेहमी एकसारखे राहत नाही. ते सतत बदलत असतात. आज आपण जे भूस्वरूप पहात आहोत ते पूर्वी असे नव्हते. भूप्रदेशातील बदल हे पृथ्वीच्या अंतर-बाह्य घडामोडींमुळे घडत असतात.

भूस्वरूपांचा मानवी जीवनावर आणि दैनंदिन घडामोडींवर परिणाम होत असतो.

भूस्वरूपांचे प्रकार:

भूस्वरूपांचे मुख्य तीन प्रकार आहेत.


ते म्हणजे: (i) पर्वत, (ii) पठार आणि (iii) मैदान.

(i) पर्वत

पर्वत हे अतिभव्य आणि स्फूर्तीदायक असतात. सभोवतालच्या परिसरापेक्षा हे उंच असतात. ते पृथ्वीच्या उत्तुंग स्वरुपाचे दर्शन घडवितात. ते खोल निमुळते उतार आणि पर्वत शिखरे असून, समुद्रसपाटीपासून त्यांची उंची साधारणपणे 1000 मीटरपेक्षा जास्त असते. पर्वताच्या अति उंचावरील टोकाला 'शिखर' म्हणतात.

टेकड्या यासुद्धा पृथ्वीवरील एक नैसर्गिक उंच भाग असतात. पण त्या पर्वताएवढ्या उंच नसतात. त्यांची उंची 600 मीटर पर्यंत असते. त्यांची उतार पर्वताएवढी खोल नसते.

शिखरासह किंवा बिनाशिखरांच्या सलग रांगेत असलेल्या पर्वतांना पर्वतरांगा म्हणतात. उदा. हिमालय (अशिया), आल्पस पर्वत (युरोप), अँडीज (दक्षिण अमेरिका), रॉकी (उत्तर अमेरिका) इत्यादी.



पृथ्वीवरील विविध भूस्वरूपे

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पर्वतांचे प्रकार:

पृथ्वीच्या आंतरिक घडामोडी खडकांच्या थरांमध्ये बदल आणि ज्वालामुखी यांच्यामुळे पर्वत निर्माण होतात. सामान्यता कठीण खडकापासून ते बनलेले असतात. ते नवे किंवा जुने असू शकतात. हिमालय आणि अल्पस हे नवे पर्वत होत तर आप्लेशियान (उत्तर अमेरिका) आणि अरवली (भारत) या प्राचीन पर्वतरांगा आहेत. सर्वात उंच पर्वतांचा सर्वात उंच भाग बर्फाच्छादित असतो.

पर्वतांच्या घडणीच्या धरतीवर त्यांची तीन प्रकारात विभागणी होते.

(अ) घड्यांचे पर्वत

(ब) स्वाभाविक (खंड) पर्वत

(क) ज्वालामुखी पर्वत

(अ) घड्यांचे पर्वत: खडकांच्या घड्यांमुळे घड्यांचे पर्वत बनतात. अति उंच असे हे पर्वत असतात. उदा: हिमालय आणि अल्पस.

(ब) स्वाभाविक (खंड) पर्वत: जमिनीच्या भूभागाचा प्रदेश दुभंगून जेव्हा वर येतो तेव्हा हे पर्वत तयार होतात. हे खूप उंच नसतात. उदा: सियेर् ्निवेड (उ.अमेरिका) व वासजेस् (तरीसशी) पर्वत (युरोप).

(क) ज्वालामुखी पर्वत: लावारसाच्या उद्रेकाने अशा पर्वतांची निर्मिती होते. ते भव्य तळाचे असतात आणि त्यांचे शिखर शंकू आकाराचे असतात. उदा: जपानमधील फुजियामा आणि टांजानिया किलीमांजारो पर्वत.

पर्वतांचे महत्व: पर्वतांना खूप महत्व आहे.

- दोन देशांमधील नैसर्गिक सीमा तयार करतात.
- पर्वत हे नैसर्गिक संसाधनाचे भांडार आहेत.
- जल विद्युत उत्पादनासाठी पाणी पुरवठा करतात.
- नद्यांचे उगम स्थान आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KSRS

- वातावरणावर उत्तम परिणाम करतात.
- येथे निसर्गरम्य स्थळे आहेत, जी पर्यटकांचे आकर्षण आहेत.
- पिके लागवड करण्यासाठी पूरक आहेत.

(ii) पठारी प्रदेश

सपाट भूभाग आणि उतरत्या खोल कडा असलेल्या प्रदेशाला 'पठार' किंवा प्रस्थभूमी असे संबोधले जाते.

साधारणता जमिनीपेक्षा यांची पातळी उंच असते ते थोड्याशा चढउतारांनी बनलेले असतात. काही पठारे विशाल आकाराची आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपल्या भारतातील दख्खनचे पठार. काही पठारे ही समुद्रसपाटीपासून उंच असतात. उदा. तिबेटचे पठार, याला 'जगाचे छप्पर' म्हणून ओळखले जाते. काही पठारे खोल भूभागावर असतात. ही पठारे कडक खडकाने बनलेली असल्यामुळे यांच्यामध्ये अनेक मूल्यवान खनिजे आढळून येतात. कर्नाटकाचा नैऋत्येकडील एक भाग असाच पठराचा भाग आहे.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

पठारी प्रदेशांचे प्रकार:

पठारी प्रदेशांचे तीन प्रकार आहेत.

(अ) अंतर पर्वतमय पठार

(ब) पर्वत पादप्रस्त पठार आणि

(क) खंडप्राय पठार.

(अ) अंतर पर्वतमय पठार: ही पठारे पर्वतरांगांनी युक्त असतात. उदा. तिबेटचे पठार (आशिया) आणि बोलिविया पठार (दक्षिण अमेरिका).

(ब) पर्वतपाद पठार: या पठाराच्या एका बाजूला पर्वत व दुसऱ्या बाजूला महासागर किंवा मैदानी प्रदेश असतो. उदा: पॅटागोनिया पठार (दक्षिण अमेरिका).

(क) खंडप्राय पठार: लावारसाने किंवा नैसर्गिकरित्या उंचावलेल्या प्रदेशाचा यात समावेश होतो. उदा. वायव्य दख्खन पठार (भारत).

पठारांचे महत्व:

- पठार खनिजांचे भांडार असतात.
- जल विद्युत निर्मिती करण्यास यांचा फार उपयोग होतो.
- येथील माती सुपीक असल्याने शेतीस अत्यंत उपयुक्त असते.
- पशु संवर्धनास अतिउत्तम.

(iii) मैदाने

विशाल सपाट भूमी अथवा थोडासा चढ-उतार असलेला खोलगट नसलेल्या स्वरूपाच्या जमिनीच्या भागांना मैदान म्हणतात. अशा मैदानांना आर्थिक दृष्ट्या खूप महत्व असते.

नद्यांच्या प्रवाहांनी वाहून आणलेल्या गाळानी व किनाऱ्यावर होणाऱ्या स्थित्यंतरानी काही सुपीक मैदाने तयार होतात. तर काही मैदाने हिमनद्या, वारे आणि लाटा यापासून तयार होतात. तुम्ही नदी किनारे व समुद्राच्या बाजूला मैदाने पाहू शकता. उदा. गंगा नदीचे खोरे आणि त्याचा मुख प्रदेश.

मैदानांचे प्रकार: रचना मैदाने, झीज मैदाने आणि गाळाची मैदाने हे मैदानांचे तीन प्रकार आहेत.

(अ) रचना मैदाने: समुद्राचा तळ वर येतो किंवा काही भाग खाली जातो. त्यामुळे अशा मैदानांची उत्पत्ती होते उदा: अमेरिकेच्या संयुक्त संस्थानातील (यु.एस.ए.) आग्नेय मैदाने.

(ब) झीज मैदाने: या प्रकारात पर्वतांची किंवा पठारांची झीज होवून खोलगट अशा मैदानांचा उगम होतो. पश्चिम सैबेरियाचे मैदान.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

(क) गाळाची मैदाने: नदी, हिमनदी यांनी वाहून आणलेल्या गाळाने, वाऱ्याने आणि यासारख्या नैसर्गिक कारणांमुळे अशा मैदानांची निर्मिती होते. उदा: सिंधू-गंगा मैदानी प्रदेश.

मैदानांचे महत्व:

- मैदाने विस्तीर्ण आणि सुपीक असतात.
- शेती आणि औद्योगिकतेसाठी उपयुक्त असतात.
- दळणवळणाच्या प्रगतीला प्रोत्साहदायक असतात.
- नागरिकत्वाचे उत्कृष्ट केंद्र ठरतात आणि वाळवंटे सामावलेली असतात.
- शहर आणि शहरांच्या वाढीस प्रोत्साहक ठरतात.

वाळवंटे: पर्वत, पठारे आणि मैदाने ही पृथ्वीच्या कवच्यावरील भूस्वरूपाने एकमेकांपासून वेगवेगळी असतात. वाळवंटे आणि मैदाने भिन्न स्वरूपाची असतात. हवामानाच्या परिणामामुळे वाळवंटे तयार होतात. वाळवंटे दिवसा अत्यंत उष्ण आणि रात्री अत्यंत थंड असतात. वाळवंटात पाऊस फारच कमी प्रमाणात होत असल्याने हा प्रदेश नेहमी कोरडा असतो. म्हणून हा एक विस्तारीत कोरडा प्रदेश असतो. या प्रदेशास वाळवंट असे संबोधले जाते. पृथ्वीचा एक पंचमांश भाग वाळवंटी प्रदेश आहे. वाळवंटे खडकाळ पाषाणयुक्त किंवा वाळूची असू शकतात. युरोप व अंटार्क्टिका व्यतिरिक्त जगाच्या सर्व खंडात वाळवंटे आढळून येतात. सहारा वाळवंट हे जगातील सर्वात मोठे वाळवंट आहे.

काही वाळवंटांमध्ये ओयासिस आहेत. ज्याठिकाणी भूजल वाळवंटातून बाहेर पडते त्याला ओयासिस म्हणतात. त्यामुळे तेथील वनस्पती आणि मानवी वसाहतींचा विकास होण्यास मदत होते.

वाळवंटाचे महत्व: वाळवंटात भटक्या जमातीचे लोक जास्त आढळतात. ती माणसे आपल्या पाळीव प्राण्यांच्या समवेत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करीत असतात. वाळवंटातील जमीन ही सुपीक नसते आणि जिथे पाण्याचासाठा

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

असेल तेथे पिके घेऊ शकतात. उदा: ईजिप्तमधील नाईल नदीचे खोरे. बहुतेक वाळवंटातून खनिजसंपत्ती आढळून येते. उदा: सौदी अरेबियातील कुवेत येथील पेट्रोलियम इत्यादी.



वाळवंट



ओयासिस

बेट (व्दीप): बेट म्हणजे महासागर, समुद्र, सरोवर किंवा नद्यांनी वेढलेल्या जमिनीचा एक छोटासा भाग. हा एक विविधतेचा भुप्रदेश आहे. सर्वात लहान बेटांना लहानबेटे (आयलेट्स) म्हणतात. नदी आणि सरोवरांमधील बेटांना 'मध्यम बेट' म्हणतात. भौगोलिक दृष्टीतून अनेक बेटांच्या एकाच ठिकाणाला व्दीप समूह (आयलँडस्टोमा) म्हणून ओळखला जातो. उदा: टीयर-डेलपुएगो, इंडोनेशिया.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED





बेट

बेटांचे प्रकार: भूखंड आणि महासागरी बेटे असे प्रामुख्याने बेटांचे दोन प्रकार आढळतात. भूखंडबेटे ही एका भूभागाच्या प्रमुख भागापासून वेगळी झाल्याने तयार होतात. उदा. ग्रीनलँड, आइसलँड वगैरे. महासागरात ज्वालामुखीमुळे, ज्वालामुखी वस्तुपासून जी बेटे सागरमध्यात तयार होतात त्यांना ज्वालामुखी बेटे असे संबोधतात. उदा: सुमात्रा बेट (इंडोनेशिया). काही बेटे ही प्रवाळापासून तयार होतात. त्यांना प्रवाळ बेटे असे संबोधले जाते. उदा: लक्षद्वीप बेटे (भारत),


अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप बेटे ही भारताची मुख्य बेटे होत. कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या भागांमध्ये काही बेटे आढळून येतात. उदा: सेंटमेरी बेटे (कोकोनट बेट) वगैर.

बेटांचे महत्व: बेटांवर अतिशय अनुकूल हवामान असते. ती आकर्षक पर्यटन स्थळे आहेत. येथे मासेमारी हा लोकांचा मुख्य व्यवसाय आहे.

2. जगातील प्रमुख स्वाभाविक प्रदेश

अर्थ: समान नैसर्गिक लक्षणे आढळून येणाऱ्या विभागास नैसर्गिक प्रदेश असे म्हणतात. प्रत्येक स्वाभाविक प्रदेशाचे विभिन्न गुणधर्म असतात. त्यातील हवामान, स्वाभाविक गुणधर्म, माती, वनस्पती, प्राणी जीवन, मानवी व्यवसाय ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. अशा स्वाभाविक प्रदेशातील फरक एकसारखा नसतो. अशा दोन स्वाभाविक प्रदेशांच्या सीमा व्यवस्थित निश्चित करता येत नाहीत. यांच्यातील विस्तार आणि सीमा या अंदाजावर अवलंबून असतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



प्रमुख स्वाभाविक प्रदेश

महत्व: जगाच्या विविध भागांतील स्वाभाविक वातावरणाची तुलना करण्यासाठी आणि मानवी प्रतिसाद समजून घेण्यासाठी स्वाभाविक क्षेत्रांचा अभ्यास खूप उपयुक्त आहे.

प्रकार: सर्वात महत्त्वाच्या हवामानाच्या आधारावर भूभाग अनेक स्वाभाविक प्रदेशात विभागलेला आहे. प्रमुख स्वाभाविक प्रदेश खालीलप्रमाणे आहेत.

1. विषुववृत्तीय प्रदेश किंवा ॲमेझॉन खोऱ्यातील नमुना.
2. उष्ण कटिबंधातील गवताळ प्रदेश किंवा सुदान प्रकार.
3. उष्ण कटिबंधातील मान्सून प्रदेश.
4. उष्ण कटिबंधातील सागरी प्रदेश.
5. उष्ण कटिबंधातील वाळवंटी प्रदेश किंवा सहारा नमुन्याचा प्रदेश.
6. समशीतोष्ण कटिबंधातील वाळवंटे.
7. मेडीटरेनियन प्रदेश (भूमध्य प्रदेश)
8. उबदार समशीतोष्ण कटिबंधातील पूर्व किनारपट्टीचा प्रदेश (चीन नमुना)
9. शीत समशीतोष्ण कटिबंधातील सामुद्रिक प्रदेश (प. युरोप नमुना)
10. समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ प्रदेश किंवा प्रेअरी प्रदेश नमुना
11. शीत समशीतोष्ण कटिबंधातील पूर्व किनारपट्टीचे प्रदेश (सेंट लॉरेन्स नमुना)
12. शीत कटिबंधातील प्रदेश किंवा तैगा प्रदेश.
13. टंड्राप्रदेश किंवा शीत कटिबंधातील वाळवंट.

नवीन शब्द:

भूस्वरूप, पर्वत, टेकडी, पठार, मैदाने, दरी, वाळवंट, बेट, शिखर, घडीचे पर्वत, महाद्वीपीय पर्वत, ज्वालामुखी पर्वत, खोरे, खनिज प्रवाळ, स्वाभाविक प्रदेश, हवामान.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

हे तुम्हाला माहीत असू दे.

- ❖ माउंट एव्हरेस्ट हे जगातील सर्वात उंच शिखर आहे.
- ❖ आफ्रिका खंड सोने आणि हिऱ्यांच्या खाणीसाठी प्रसिद्ध आहे.
- ❖ गंगा नदीचा मुख प्रदेश जगातील सर्वात मोठा आहे आणि त्याला सुंदबन म्हणूनही ओळखले जाते.
- ❖ समशीतोष्ण उष्ण कटिबंधातील गवताळ प्रदेशांना आफ्रिकेत स्टेपीस, उत्तर अमेरिकेत प्रेअरी, दक्षिण अमेरिकेत पंपास, ऑस्ट्रेलियात डाउन्स आणि दक्षिण आफ्रिकेत वेल्स असे म्हणतात.
- ❖ भारताच्या वायव्य भागात उष्ण कटिबंधातील थरचे वाळवंट आहे.

अभ्यास

I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. भूकवच्यावरील वैविध्यपूर्ण भौगोलिक लक्षणांना _____ म्हणतात.
2. पर्वताच्या अती उंचावरील टोकाला _____ म्हणतात.
3. हिमालय पर्वत _____ पर्वतांचे उदाहरण आहे.
4. भूजल वाळवंटातून बाहेर पडते त्याला _____ म्हणतात.
5. सपाट भूमी आणि थोडासा चढ - उतार असलेल्या जमिनीच्या भागांना _____ म्हणतात.

II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

6. पर्वत म्हणजे काय?
7. पर्वतश्रेणी म्हणजे काय?
8. पठारे म्हणजे काय?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

9. जगातील सर्वात उंच पठार कोणते आहे?

10. मैदाने म्हणजे काय?

11. वाळवंट म्हणजे काय?

12. भारताला संबंधित एका बेटाचे नांव सांगा.

13. स्वाभाविक प्रदेश म्हणजे काय?



उपक्रम:

- विविध प्रकारच्या भूस्वरूपाचे नमुने तयार करा.
- जगातील प्रमुख पर्वत, पठार आणि मैदानांच्या छायाचित्रांचा संग्रह करा.
- तुमच्या शिक्षकांच्या मदतीने तुम्ही जगाच्या नकाशावर विविध खंडातील प्रमुख पर्वत, पठारे आणि मैदाने ओळखा.

@KSEB NOT TO BE REPUBLISHED